आधुनिक केसरी
MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● MONDAY 15 AUGUST 2022
adhunikkesari.com Adhunik Kesari






वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# तुफानातील दीप : डॉ टायरॉन हेज

आधुनिक केसरी

कीटकनाशकं आणि तणनाशकं यांचा वापर आपल्याकडे अनेक वर्षांपासून शेतकरी करीत आहेत. ही उत्पादनं निर्माण करणाऱ्या अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनाची उपयुक्तता पटवून देऊन ते वापरण्यासाठी राजी करतात. परंतु टण आणि कीटक यांचा नाश करतानाच ही रसायनं मानवी जीवनावर आणि पर्यावरणावर भयंकर घातक परिणाम करतात याची जाणीव बहुतेकांना असत नाही. स्वित्झर्लंडमधील सिंजेटा ही अशीच उत्पादनं निर्माण करणारी बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपनी. या कंपनीने निर्माण केलेले अट्रॅझिन हे तणनाशक अमेरिकेत फार मोठ्या प्रमाणावर वापरले जात होते. त्याचा वापर केवळ अमेरिकेतच नव्हे तर जगातील इतर अनेक देशात आणि आपल्या भारतातही ऊस आणि मका पिकवणारे शेतकरी मोठ्या प्रमाणात करतात. या अट्राझीनच्या वापराबद्दल आणि त्याच्या दुष्परिणामांबद्दल संशोधन करून जगाला त्याचे दुष्परिणाम पटवून दिले ते अमेरिकेतील कृष्णवर्णीय शास्त्रज्ञ डॉ टायरॉन हेज यांनी. त्यांच्या या लढ्याची कहाणी मोठी रोचक आहे.

फारसे शिक्षण न घेतलेल्या कृष्णवर्णीय आईवडिलांच्या पोटी टायरॉन यांचा जन्म झाला. त्यांच्या घरची परिस्थिती जेमतेमच होती. अमेरिकेत कृष्णवर्णीय माणसांना वर्णभेदाचे चटके सोसावे लागत होते. मात्र अशाही परिस्थितीत आपल्या मुलाने चांगले शिक्षण घ्यावे असे टायरॉन यांच्या आईवडिलांना वाटत होते. त्याप्रमाणे त्यांनी त्याला प्रोत्साहनही दिले. टायरॉन मुळातच हुशार आणि कुशाग्र बुद्धिमत्ता घेऊन जन्माला आला होता. शिक्षणात चमक दाखवल्याने त्याची निवड सहावीनंतर एका हुशार मुलांच्या शाळेत करण्यात आली. या शाळेत काळे आणि गोरे विद्यार्थी एकत्र शिक्षण घेत होते. टायरॉन कृष्णवर्णीय असल्याने त्याला गोरे मित्र तर जवळ करत नव्हतेच पण त्याची हुशारी पाहून हा काय विशेष करणार आहे असे कृष्णवर्णीय मुलांना वाटायचे. त्यामुळे त्याला त्याच्या कृष्णवर्णीय मित्रांनीही दूर लोटले. टायरॉन यांच्या संवेदनशील मनाला या गोष्टीमुळे यातना होत होत्या पण त्यांनी शिक्षणावर लक्ष केंद्रित करून विज्ञान शाखेचे उच्च शिक्षण घ्यायचे असे आपले ध्येय ठरवले. इतर मुलांपेक्षा टायरॉन यांची आवड वेगळी होती. त्यांचे मित्र ज्यावेळी निरनिराळ्या खेळांमध्ये दंग असत तेव्हा ते आपल्या घरासमोरील झाडे, प्राणी, पशुपक्षी यांचे निरीक्षण करत. उंदीर, साप, पाली, बेडूक आणि सरडे यांच्याबद्दल त्यांना कुतूहल होते. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## आपल्या मनाचा विचार मनापासून करावा

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले मन. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली मनाची शक्ती. ह्या मनाच्या शक्तीचा थेट संबंध आपल्या भाव भावनांशी असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या तीन मुलभूत गरजांची पूर्तता खरे तर शरीरासाठीच होत असते. पण मनाचे काय? ते दिसत नसले तरीही असतेच. आपल्या जगण्यापलीकडच्या जीवनाला मनामुळे वेगळे असल्याची प्रचीती येते. काहीवेळा असे वाटते की, अनेकांकडून केवळ शरीरासाठीच सर्वकाही केले जाते. पण मनाचा, मनातल्या मनात, मनमुरादपणे किंवा मनमारून मनपसंद असा कधी विचार खररेच होतो का? निदान तसे दिसत तरी नाही. मनंच आपल्याला जगायला शिकवते, मनंच आपल्याला पदोपदी अनेकविध निरनिराळ्या प्रसंगांची अनुभूती देते. दुसऱ्याच्याच काय पण आपल्या स्वतःच्या मनाचा सुद्धा थांग पत्ता लागणे मुश्कील असते. आपल्या शरीरावर ताबा ठेवून त्याला स्थिर करू शकतो पण मनावर नियंत्रण ठेवणे मोठे कठीण काम असते.



आधुनिक केसरी

## चरणी निवांत | ज्ञानाईच्या ||

पोसियला गर्भ | नऊ मास जीने ||
प्रसविले तीने | विश्वंभरा ||१||

फेडण्यास पांग | काया प्रगटली ||
विश्वाची माऊली | ज्ञानेश्वर ||२||

सांदिपान झाला | नाथ हा विरक्त ||
विष्णु झाला भक्त | ज्ञाना माझा ||३||

काय मी पामर | झालो भाग्यवंत ||
चरणी निवांत | ज्ञानाईच्या ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# “निरूपण”

आधुनिक केसरी

**परित्यक्ता देवा विविधविधसेवाकुलतया**
**मया पञ्चाशीतेरधिकमपनीते तु वयसि।**
**इदानीं चेन्मातस्तव यदि कृपा नापि भविता**
**निरालम्बो लम्बोदरजननि कं यामि शरणम् ॥५॥**

गणेशाला जन्म देणाऱ्या हे माता पार्वती! अन्य देवतांची आराधना करण्याच्या वेळी मला अनेक प्रकारच्या सेवांमध्ये व्यस्त राहावे लागे. त्यासाठी पंच्याऐंशी वर्ष आयु व्यतीत झाल्यानंतर मी अन्य देवतांची आराधना सोडून दिली. आता त्यांची पूजा, सेवा माझ्याने होत नाही. त्यामुळे त्यांचेकडून साहाय्याची अपेक्षा नाही. यावेळी तू तुझी कृपा माझ्यावर केली नाहीस, तर आई, निराधार असा मी कोणाला शरण जाऊ? || ५ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# शाश्वत आनंद फक्त भगवंताजवळच



आधुनिक केसरी

जगात प्रत्येक मनुष्य स्वतःला आनंद मिळावा म्हणून धडपडतो आहे. किंबहुना, आनंद नको असे म्हणणारा मनुष्य मिळणारच नाही. म्हणजे मनुष्याला आनंद हवाच असतो. मग इतक्या धडपडीतून त्याला आनंद, समाधान, का बरे न मिळावे ? याला कारण असे की, हा शाश्वत आनंद एका भगवंतावाचून दुसऱ्या कुठेही मिळणे शक्य नसल्याकारणाने त्याचे प्रयत्न व्यर्थ आहेत. त्या आनंदासाठी, मला भगवंत पाहिजे असे मनापासून वाटले पाहिजे; आणि त्यासाठीच, आपण सर्वांनी नाम घेणे आवश्यक आहे. आपले मन भगवंताच्या चरणावर चिकटवून ठेवावे, आणि देह प्रारब्धाच्या प्रवाहामध्ये सोडून द्यावा. कधी तो सुखात राहील तर कधी दुःखात राहील; कधी तो बरेच दिवस सरळ जाईल, तर कधी मध्येच गचका खाऊन बुडायच्या बेताला येईल; पण त्याच्या कोणत्याही अवस्थेमध्ये आपला आनंद कायम राहील. तुम्ही सर्व माणसे फार चांगली आहात, भगवंताचे नाम घेता, हे मला माहीत आहे. परंतु नामाचे प्रेम तुम्हाला येत नाही हे पाहून मला फार वाईट वाटते. तुमच्यापैकी प्रत्येकाने मनापासून विचार करून ठरवा, की मला नामाचे प्रेम येण्याच्या आड काय येत असेल बरे ? तुमची परिस्थिती आड येते का ? इथे मंदिरात राहणाऱ्या माणसांनी तरी नामाचे प्रेम यायला परिस्थिती आडवी येते असे म्हणणे बरोबर नाही. तुम्ही इथे आनंदाने राहा, मंदिरात जेवा, आणि 'राम, राम' म्हणा असे मी सांगतो. पण या लोकांनीसुद्धा नामाचे प्रेम यायला परिस्थिती आड येते असे म्हटले तर बाहेरून येणाऱ्या लोकांना मी काय सांगू?

खरोखर मनुष्य आनंदासाठी न जगता वस्तूसाठी जगतो असेच म्हणावे लागते. वस्तू ही सत्य नसल्यामुळे तिचे रूप अशाश्वत असते. अर्थात तिच्यापासून मिळणारा आनंद हा देखील अशाश्वत असतो. खरा आनंद हा वस्तूमध्ये नसून वस्तूच्या पलीकडे आहे. आपण भगवंताजवळ आनंद मागावा. त्याने वस्तू आणि आनंद दोन्ही दिले तर फारच बरे. मात्र चिरकाल टिकणारा आनंद हा नेहमी वस्तूरहितच असतो. एका स्टेशनवर पेरू चांगले मिळतात म्हणून एकजण गाडीतून खाली उतरला; तो पेरू घेण्याच्या नादी किती लागेल, तर आपली गाडी न चुकण्याइतका ! हे जसे खरे, त्याप्रमाणे आनंदाच्या आड येणाऱ्या वस्तूंच्या मागे लागणे बरे नाही. आनंद जोडणाऱ्या गोष्टींचा आपण विचार करू या, आणि नामस्मरणात राहू या. काल जे झाले त्याबद्दल दुःख करू नये; उद्या काय होणार याची काळजी करू नये; आज मात्र आनंदात आपले कर्तव्य करावे.

**आजचे बोधवचन :** वेळ सापडताच तो व्यर्थ गप्पागोष्टीत न घालविता नामस्मरण करावे.

**- श्री सद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# श्रीक्षेत्र औदुंबरचा महापूर

आधुनिक केसरी

आज औदुंबर क्षेत्री श्री कृष्णामाईचे पाणी देवांच्या मुख्य गाभाऱ्यात आले. भगवान नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या औदुंबर क्षेत्री पूर आणि महापूर हे समीकरण कायमचे आहे. येथील पुजारी वर्ग हा दत्त सेवेचा ध्यास घेऊन ऊन, थंडी, वारा, पाऊस यांची परवा न करता नित्य महाराजांची सेवा करत असतो.पुजारी वर्गाची संख्या पाहिली तर इन-मीन चौदा.

मनुष्यबळ कमी असून सुध्दा रात्रंदिवस महाराजांच्या सेवेत तत्पर असणारा पुजारीवर्ग म्हणजे एक अजब रसायन आहे. अगदी पहायला गेल तर २०१९, २०२१ साली महाभयंकर महापूर येवून गेला. त्यानंतर आत्ताचा २०२२ साली हा पूर. कोणतीही आपत्ती असली तरीसुध्दा त्रिकाल पुजेत कधीच खंड पडत नाही.

पावसाळा चालू झाल्यावर संथ वाहणारी कृष्णामाई भयानक रौद्ररुप धारण करते व दत्तमंदिरामध्ये पाणी येऊ लागते मग पाणी गर्भगृहात गेल्यानंतर मंदिरातील परिवार देवता या वरती असलेल्या देवघर मंदिरात आणून तीथे त्रिकाल पुजा आर्चा नित्य सेवा चालू होते व मुख्य पादुकांची कुष्णेच्या माध्यमातून पुजा केली जाते. हे महापुराचे पाणी



बहुतांश पुजातर्यांच्या घरात येत असते. त्यांच्या कुटुंबियांना स्थलांतरीत व्हावे लागते, पण नियम असा की कितीही प्रलय येवो पण पुजाऱ्यांनी देवाबरोबर थांबायचे. अर्थात हे सर्व महाराजांची पुजारी वर्गावर असणार्या कृपेमुळेच शक्य होते. २०१९ साली तर औदुंबरच्या इतिहासात कधीच न घडलेली घटना घडली ती अशी की मंदीरात पाणी आल्यावरा ज्या वास्तूत देवांची पुजा चालू असते त्या वास्तूत १० फूट पाणी आले त्यामुळे देव पुजाऱ्याच्या घरी नेण्यात आले व पुजा चालू झाली. महाराज किती दयाळू व कृपाळू आहेत याची प्रचीती आम्हा पुजारी वर्गाला त्या महापुरात आली.

आत्ताचा हा २०१९ महापुर तशीच काही परिस्थिती होती पण पाणी एवढे वाढले नाही देवघराच्या उंबर्याला लागून पाणी ओसरु लागाले. जस जसे पाणी उतरुन मंदिरात जाईल व मुख्य गर्भगृहातून पाणी बाहेर येईल त्यावेळी देवता मंदिरात नेल्या जातात व विमल पादुंकांवर उष्णोपचार केले जातात व नित्य क्रम खाली मंदिरात चालू होतो.

पाणी येणे व जाणे ही क्रिया पावसाळ्यात अनेक वेळा होते असे असूनही पुजारीवर्ग न थकता ही सेवा पिढ्यान् पिढ्या करत आहेत. अशीच निरंतर सेवा आम्हा पुजारी वर्गाकडून व्हावी व ती त्यानी करून घ्यावी ही महाराजांच्या चरणी प्रार्थना.

या महापुरात महाराज आमचे कायमच रक्षण करत असतात. प्रलयाने देव सोडून जाण्याची परिस्थिती आली तर पाणी उतरायला लागते आ २०१९ आमचा पुजारी वर्गाचा अनुभव आहे. आणखी महाराजांच्या कृपेबद्दल व पुजार्यांच्या श्रध्देबद्द सेवेबद्दल लिहावे. .कमी मनुष्यबळ असतानाही अशी तत्पर सेवा करणार्या पुजारी वर्गाची यथामती गौरवगाथा महाराजांच्या कृपाछत्रामुळे आम्ही सर्व सुखरूप आहोत. अशा अनेक महापुरातून महाराज आमचे रक्षण नक्कीच करतील.

**सोमनाथ संदीप जोशी (पुजारी)**
**दत्त क्षेत्र औदुंबर, मो. 8888638017**

सोमवार, 15 ऑगस्ट 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 21
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • MONDAY 15 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-21 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-14 • PRICE-5

## नाथसागरावर 'तिरंगा' रोषणाई



पैठण येथील नाथसागर धरण शनिवारी जवळपास ९५ टक्के भरले असून धरणाच्या १६ दरवाजे दिड फुट उचलले असून दरवाजातून २९ हजार क्युसेक वेगाने गोदावरीच्या नदी पात्रात पाणी सोडण्यात येत आहे. स्वतंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर १६ दरवाजावर तिरंग्याच्या रंगांत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असुन नाथसागर पर्यटकाचे आकर्षण ठरत आहे. अशिषा खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण म्हणून प्रसिध्द असलेले पैठणचे नाथसागर धरण यंदा लवकरच पुर्णक्षमतेने भरल्याने मराठवाड्याला दिलासा मिळाल्याने सिंचन तसेच पिण्याचा पाण्याचाही प्रश्न सूटला असून शेतकरी समाधानी आहेत. नाथसागरावर विद्युत रोषणाई पाहण्यासाठी पर्यटकांनी दुपारपासूनच गर्दी केली होती. त्यामुळे संध्याकाळी ट्राफिक जाम झाली होती.

## शिंदे सरकारचे खातेवाटप जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात मंत्रीमंडळ विस्तार आणि त्यानंतर खातेवाटप या दोन गोष्टींवरून जोरदार राजकीय चर्चा रंगल्याचे पाहायला मिळाले. आधी मंत्रीमंडळ विस्ताराला झालेला उशीर चर्चेत राहिला. त्यानंतर खातेवाटप लांबल्यामुळे विरोधकांकडून सरकारवर जोरदार टीका केली जात होती. अखेर राज्य सरकारकडून खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार शपथ घेतलेल्या १८ मंत्र्यांमध्ये खाती वाटण्यात आली आहेत.

**मुख्यमंत्र्यांकडे १३ तर उपमुख्यमंत्र्यांकडे ८ खाती**

खातेवाटपानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सामान्य प्रशासन, नगर विकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, सार्वजनिक बांधकाम( सार्वजनिक प्रकल्प ), परिवहन, पणन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन, मृद व जलसंधारण, पर्यावरण व वातावरणीय बदल, अल्पसंख्याक व औकाफ तसेच इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह, वित्त व नियोजन, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा, राजशिष्टाचार ही खाती असतील.

**इतर मंत्र्यांकडे देण्यात आलेली खाती पुढीलप्रमाणे**

राधाकृष्ण विखे-पाटील – महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास, सुधीर मुनगंटीवार – वने, सांस्कृतिक कार्य, व मत्स्य व्यवसाय, चंद्रकांत पाटील – उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य, डॉ. विजयकुमार गावित – आदिवासी विकास, गिरीष महाजन – ग्राम विकास आणि पंचायती राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, गुलाबराव पाटील – पाणीपुरवठा व स्वच्छता, दादा भुसे – बंदरे व खनिकर्म, संजय राठोड – अन्न व औषध प्रशासन, सुरेश खाडे – कामगार, संदीपान भुमरे – रोजगार हमी योजना व फलोत्पादन, उदय सामंत – उद्योग, तानाजी सावंत – सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, रवींद्र चव्हाण – सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम वगळून ), अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अब्दुल सत्तार – कृषी, दीपक केसरकर – शालेय शिक्षण व मराठी भाषा, अतुल सावे – सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण, शंभूराज देसाई – राज्य उत्पादन शुल्क, मंगलप्रभात लोढा – पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता, महिला व बालविकास. गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेले खातेवाटप आता झाले असून यावरून राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

## दिल्लीत दहशतवादी हल्ल्याचे सावट

### गुप्तचर यंत्रणांकडून हाय अलर्ट जारी; चोख सुरक्षा व्यवस्था तैनात

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशाच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राजधानी दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. येत्या १५ ऑगस्टला दिल्लीत दहशतवाद्यांकडून ड्रोन हल्ला केला जाऊ शकतो, असा इशारा गुप्तचर यंत्रणांकडून देण्यात आला आहे. दिल्लीत सध्या हाय अलर्ट जारी करण्यात आला असून राजधानीला छावणीचे स्वरुप प्राप्त झाले आहे.**

पंजाबसह देशातील इतर राज्यांमधून काही दिवसांपूर्वी दहशतवाद्यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या चौकशीमधून राजधानी दिल्लीत ड्रोन हल्ल्याची योजना आखली जात असल्याचे निष्पन्न झाले होते. पाकिस्तानच्या सीमेवरून स्फोटकांनी भरलेले ड्रोन भारतात विविध ठिकाणी पाठवण्यात आल्याचे तपासात समोर आले होते. पिस्तुल, हँड ग्रॅनेड, AK-47 हे शस्त्रात्रही ड्रोनच्या साहाय्याने भारताच्या सीमेमध्ये दाखल करण्यात आले आहे. धारदार शस्त्र किंवा गाडीच्या मदतीने आत्मघाती हल्लेखोरांकडून हल्ला केला जाऊ शकतो, असा इशाराही गुप्तचर यंत्रणांनी दिला आहे.
दहशतवादी संघटना एसएफजे, जैश-ए-मोहम्मद, आयसीस या संघटनांकडून दिल्लीत घातपात घडवला जाण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील सुरक्षा व्यवस्था चोख करण्यात आली आहे. दिल्लीच्या आठही



सीमांसह बाजारांमध्ये पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लाल किल्ल्यावरील सुरक्षेची विभागणी अनेक स्तरांमध्ये करण्यात आली आहे. या किल्ल्यावर रडार बसवण्यात आला आहे. याशिवाय अलार्म कॅमेरेही ठिकठिकाणी बसवण्यात आले आहे. लाल किल्ल्यात संशयास्पद हालचाल दिसल्यास वाजणाऱ्या अलार्ममुळे पोलिसांना मदत मिळणार आहे.
ड्रोन हल्ल्यांपासून संरक्षणासाठी अँन्टी ड्रोन यंत्रणेचा वापर केला जाणार आहे. भारत इलेक्ट्रॉनिक्स आणि डीआरडीओने ( DRDO ) ही यंत्रणा विकसित केली आहे. ड्रोन हल्ल्यापासून संरक्षणासाठी दिल्ली पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.

### सलाउद्दीनच्या मुलासह चार कर्मचारी बडतर्फ

सोमवारी स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी दिल्लीत जवळपास २५० मोठ्या आसामी हजेरी लावणार आहेत. याशिवाय आठ ते दहा हजार दिल्लीकरही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या सोहळ्यावर एक हजार कॅमेरांच्या मदतीने लक्ष ठेवले जाणार आहे. स्वातंत्र्यदिन सोहळ्यादरम्यान लाल किल्ला परिसरात पतंग उडवण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.

## दिवसेंदिवस माणुसकी रसातळाला चालली आहे... !

आधुनिक केसरी

भारतीय स्वातंत्र्याला पंचाहत्तर वर्षे होत आहेत या निमित्तानं आरंभी आनंदच व्यक्त करुयात. 'नेशन फस्ट' म्हणाले बाबासाहेब आणि 'नेशनच लास्ट'. त्यामुळं ज्या मातीत जन्मलो आपण त्या मातृभूमीला वंदनच आणि राष्ट्रध्वजालाही सलामच. आपण आपल्या मातीत आहोत आणि आपली माणसं आहेत आपल्या सोबत हा भागही महत्वाचाच.
अजूनही आपली लोकशाही टिकून आहे आणि आजही आपण राष्ट्रगीत सुरु झालं की सावधान पोजिशन मध्ये येतो. आपल्याला हसता येतं हवं तेंव्हा आणि रडताही येतं हवं तेंव्हा, हे आपलं स्वातंत्र्य अजूनही अबाधीत आहे, त्यामुळं आपण आनंदच व्यक्त करायला हवा, ही कोणी दंडीमुडपी केली नाही कोणी आपल्यावर की कोणी आरेरावीची भाषाही बोललेलं नाही कोणी.
आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत आणि अजून तरी हवेवर टॅक्स लावलेला नाही. परंतू मधल्या काळात आपण स्वातंत्र्यानंतर केलेल्या प्रगतीचा परीनाम आपलं झालेलं शहरीकरण, औद्योगिकरण आणि त्यातून झालेला पर्यावरणाचा -हास यामुळं ऑक्सिजन सिलेंडर्स लावावे लागले लोकांना. शहरं तनावाखाली वावरत आहेत. गोरगरीब लोकसंख्या जी कारखान्यांच्या आवारात पालं थाटून राहिली तिचे प्रश्न कधीच नीटपणे हाताळले जात नाहीत, आणि त्यामुळं कोव्हीड काळात या लोकांचे अगतीक तांडेच्या तांडे आपापल्या गावाकडं निघाले तेंव्हा त्यांचे बेहाल पाहून आपण आपल्याच देशात रहातो की अजून कुठल्या, हे जानवल्या शिवाय राहिलं नाही.
देशाला स्वातंत्र्य मिळून आज पंचाहत्तर वर्षे होत आहे. नाविलाजास्तव राजकिय आरक्षण सुरु आहे. निवडनुकींना उभे असलेले लोक किती सुशिक्षीत आहेत आणि किती जनकल्याणकारी आहेत, हे न बोललेलं बरं. राजकीय पक्ष बरोबर यौग्य वेळी जाती धर्माच्या चुलींना इंधण पुरवठा करतात आणि लोक होरपळून निघतात. जातीय दंगली, जातीय तेढ यामुळं माणसात माणुस राहिला नाही. आरक्षणातला दुबळा मनुष्य कुटका टाकून पोसला जातो आणि जर का त्यानं स्वाभिमानाची भाषा केली तर मानगुटीवर आपटला आतो. नावाला उरतं व्यक्तीस्वातंत्र्य अशा वेळी आणि आपण सरळ माघार घेऊन पलायनवाद स्विकारतो. शोषण करणाऱ्या व्यवस्थेच्या विरुद्ध शब्द जरी उगारला तरी कत्तली होताहेत हे जुणं नाही. शिक्षण जे वाघिणीचं दूध म्हणाले बाबासाहेब ते खरंच तसं राहिलंय का ? पाणी मिसळून दुधं विकणारे, भेसळ करुन दुधं विकणारे आपण फलान्याला फसवल्याचा आनंद मानंत असतील तर मानुसकी पार तळागाळाला पोंचली म्हणायचं. नैतिकतेचं



प्रा.डॉ.मुकुंद राजपंखे




अधःपतन झालं आहे आणि निष्ठूर लोक घेऊ पहात आहेत अवघं जग ताब्यात. शिक्षणाच्या बाजारिकरणामुळं इथून पुढं मध्यमवर्गी लोक आणि गोरगरीब लोक शिक्षण आणि ते ही गुणवत्तेचं शिक्षण हा विषय बाद होत चालला आहे. सुरु असलेल्या जिल्हा परिषदांच्या शाळा बंद पाडून संस्था उभ्या केल्या जात आहे.
ना स्त्रीयांचा सन्मान सुरक्षीत आहे ना देशातला शेतकरी, कष्टकरी मनुष्य सुखात. आयुष्यभर राबराब राबलेल्या कन्डाक्टर, ड्रायवरचा पगार किती आणि पेन्शन किती? जो देश आमदार आणि खासदारांनी पाच वर्षाची एक टर्म जरी काढली तरी त्यांना लाखोंनी पेन्शन मंजूर करतो आणि आयुष्यभर मरमर केलेल्या कर्मचाऱ्याला वाऱ्यावर सोडून देतो म्हणजे महाभयंकरंच की. रोज पाच पन्नास रुपये कमावनाऱ्या माणसांपासून ते रोज हजारो रुपये रोज कमावणारे कर्ममारी, व्यापारी, उद्योजक, कारखानदार, नेते, अभिनेतेही याच देशात आहेत. एका बाजूला ऐंशी टक्के नंगे भूखे कंगाल गरीब भारतात तर दुसऱ्या बाजूला हायफाय आयुष्य जगणारे करोडोपती सोन्याच्या महालांनी ऐशोआरामात. ही विषमतेची दरी मिटवायची कशी ? गरीब गरीबीच्याच खाईत रुतत चाललाय आणि श्रीमंतांच्या घरांनी सोन्याचा धूर निघतो आहे. क्रूर अन्याय अत्याचार वाढंत चालले आहेत दिवसेंदिवस आणि दिवसेंदिवस माणुसकी रसातळाला चालली आहे. सत्तेसाठी हापापले आहेत लोक आणि कृघ्नतेने कळस गाटला आहे. कार धस्कटांनी ठेवली आहेत गावं पिढ्यान् पिढ्या आपल्या ताब्यात आणि प्रशासन नाचतं आहे त्यांच्याच तालावर. भारतीय स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीत आपण ही अशी प्रगती केली आहे आणि तरी देशच आपली पहिली आणि देशच आपली शेवटची ओळख सांगणाऱ्या वंदनीय भारतरत्न बाबासाहेबांप्रती मला आदरभावच आहे. देशाची राज्यघटना बहाल करताना त्यांनी व्यक्त केलेली मतं किती समर्पक होती, याचं प्रत्यंतर पावलोपावली येतं आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहूती दिलेल्या शूर वीर देशभक्तांना मी विनम्रतेने भावपूर्ण अभिवादन करतो.

**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**

# सेवातत्पर राजकारणी : शिवाजीराव आढळराव पाटील



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**आढळराव पाटील हे खरोखरच एक आदर्श, कार्यक्षम, सेवातत्पर आणि तळमळीचे राजकारणी आणि सच्चे समाजसुधारक नेते आहेत. दादांची सावली, घट्ट , दृढ मीत्र, धडाडीचे नेते आणि परखड विचार मांडून रोखठोक बोलणारे, कायम दिलीप वळसे पाटलांवर स्वतःला पून्हा पून्हा आरशात पाहायला लावणारे, तालूक्यातील निर्भीड आणि यशस्वी उद्योजक श्री लक्ष्मणराव मनाजी काचोळे यांचे आग्रहावरून दादांचे राजकीय क्षेत्रातील महत्व अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न आहे. खरे तर दादांची उद्योग व्यवसायातील भरारी आणि त्यासह राजकारणातील जिद्द त्यांचे चरित्र शुध्द ठेवते. आणि दादांनी ज्या शिवसेनेला इथे वाढवलं जोपासलं त्याच सेनेला पक्षा पेक्षा माझे कार्य याला जबाबदार आहे हे सिध्द करायचे आहे, करावे लागणार आहे.**

सलग पंधरा वर्षे खासदार राहीलेले आढळराव पाटील 2019 मध्ये पहिल्यांदा पराभूत झाले ते डॉ. अमोल कोल्हे यांच्यामुळे. डॉ. अमोल कोल्हे यांनी छत्रपती संभाजीराजेंची भूमिका दूरदर्शनवर गाजवली आणि त्याचं फळ त्यांना मिळाले. पण तत्पूर्वी खऱ्या अर्थाने श्री शिवाजीराव आढळराव पाटील (दादा ) यांनी पुणे जिल्ह्यात, शिरूर लोकसभा मतदारसंघात आणि पिंपरी चिंचवड जिल्ह्यात शिवसेना वाढवली, जोपासली. पाळेमुळे खोलवर रूजवली. दादा दिल्ली ते गल्ली इतके सहज वावरत असत, संचार करत असत की खासदार म्हणून दुरी कधीच जाणवली नाही. सर्वसामान्य कार्यकर्त्यालाच काय, मतदार संघातील सामान्यातल्या सामान्य नागरिकांना ते कायम सहज उपलब्ध असत.

दादा प्रथम खासदार झाले ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा त्याग करून शिवसेनेचा भगवा दिमाखात खांद्यावर घेऊनच. नंतर सलग तीन टर्मस्, तब्बल पंधरा वर्षे आपल्या मतदारसंघाची मशागत करताना, शिवसेना तळागाळापर्यंत पोहोचवली. शिरूर लोकसभा मतदार संघात पिंपरी चिंचवड शहर व पुणे जिल्हा या पंचक्रोशीतील गावागावात शिवसेना पोहचवली. दिलीप वळसे पाटलांवर शरद पवार साहेबांचा वरदहस्त असताना, विशेष लोभ असतांना दादांनी कधी डोके वर काढू दिले नाही. आंबेगाव तालूक्यातील जनता ही खुप हुशार त्यांनी दादा आणि वळसे पाटील यांच्यात समंजस विभागणी केली. आमदारकीला दिलीप वळसे पाटील आणि लोकसभेला शिवाजीराव आढळराव पाटील दादा. शरद पवार साहेब स्वतःही दादांविरोधात लढायला घाबरले होते, त्यांच्या अधिपत्याखालचा जिल्हा असूनही दादांविरोधात न उतरता साहेब माढ्यात गेले. तिथून निवडणूक लढवली.

एक यशस्वी उद्योजक, उत्तम वक्ता, समाजकार्याची आवड, दांडगा जनसंपर्क अशी प्रतिमा असलेले दादा स्वयंभू नेते आहेत. दादा शिवसेनेमुळे मोठे नाही झाले, शिवसेनेला या दादांच्या कार्यक्षेत्रात नाव मिळाले, मतदार लाभले.

भगवा खांद्यावर घेताना, शरद पवार यांच्या कुटील डाव, कुरापती आणि डॉ अमोल कोल्हे यांची प्रतिमा वापरून दादांना साहेबांनी पराभूत केले ते कटकारस्थाने करून. तरीही दादा डगमगले नाहीत. शिवसेनेचे कार्य पूर्ण क्षमतेने करत राहिले.



एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे चाळीस आणि ईतर दहा आमदार आणि शिवसेनेचे बारा खासदार यांना सोबत घेऊन, विश्वासात घेऊन नेतृत्वा विरूध्द उठाव केला. तेंव्हा हलक्या कानाच्या आणि मनाच्या संजय राऊत यांनी उध्दव ठाकरेंच्या मनात दादांविषयी विष कालवले आणि परस्परच, काहीही चर्चा न करता, न बोलता, मुखपत्र सामनामध्ये दादांना शिवसेनेतून काढून टाकल्याची जाहीर वाच्यता केली आणि नंतर सावरासावर करून ती चुकीने छापल्या गेल्याची सर्वत्र वावडी उठवली. या घटनेने दादा दुखावले. तेच काय कोणीही दुखावलेच असते अशी ती बातमी होती.

उध्दव ठाकरेंच्या आणि आदित्य ठाकरेंच्या मनमानी वागणुकीने, सततच्या दुर्लक्षित करण्याच्या सवयीमुळे, शिवसेनेचे आमदार खासदार तसेच माजी आमदार खासदार आधीच निराश झालेले होते. महा विकास आघाडीसोबत जाऊन, मतदार जनतेचा विश्वासघात करून, मित्रपक्ष भाजपाचे पाठीत खंजीर खुपसून आणि एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री म्हणून एकमताने प्रमोट करूनही वेळेवर दोन्ही कॉंग्रेस च्या आग्रहावरून मीच मुख्यमंत्री होण्याचे ठरवल्याचे जाहीर केले. आपल्या पक्षाच्या आमदार खासदारांना तसेच पक्षाच्या उप नेत्यांना अंधारात ठेवत स्वतःच मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. नंतर कोरोना चा बाऊ करून सतत आजारपणाचे नाटक करत मातोश्रीवरच सुरक्षित राहून, पक्षाच्याच मंत्र्यांना, खासदारांना, आमदारांना, उपनेत्यांना भेट देणे बंद केले. तीन तीन महिने भेटीची वेळ मिळत नसे. आज मात्र नेतृत्वाच्या गंभीर उणिवा दाखवत स्वपक्षाच्या नेत्यांनी उठाव करताच उध्दव ठाकरे आणि आदित्य ठाकरे बापल्योक एकदमच तंदुरुस्त झाले. आदित्य तर महाराष्ट्रभर गद्दार गद्दार करत फिरत आहे. उध्दवजी देखील पब्लिकमध्ये मिसळत आहेत. याला उपरती म्हणतात, सर्वस्व गमावल्यानंतर आलेली.

ईकडे नामधारी मुख्यमंत्री मातोश्रीवर बसून राज्यकारभार उपमुख्यमंत्री अजित दादा पवारांना फ्रीहॅण्ड दिला. परिणामी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आमदार, मंत्री, माजी आमदार, पराभूत परंतू त्या त्या मतदार संघात दोन नंबरवर राहीलेले स्वपक्षाचे नेते यांना भरघोस फंडस् रिलीज करताना शिवसेना आणि कॉंग्रेस पक्षाच्या मंत्र्यांना, आमदारांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या. हे उघड उघड दिसत असूनही आपल्याच मंत्र्यांना, आमदार, खासदारांना मातोश्रीचे दरवाजे बंद होते. परिणामी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उठाव झाला. आणि शिवाजीराव आढळराव पाटील दादा यांना शिंदेंसोबत जावे लागले.

ही सर्व मंडळी बाळासाहेब ठाकरे यांचे अनुयायी आहेत. त्यांना पित्यासमान मान देणारी आणि दैवत मानणारी आहेत. आपल्या मतदार संघात सतत संपर्कात राहणारे, कायम उपलब्ध असणारे दादा येणाऱ्या निवडणूकीत निश्चितपणे पून्हा खासदार होणार आहेत. संसदेमध्ये अत्यंत चपखल आणि सातत्याने जनहीताचे प्रश्न विचारत असत. एवढा ॲक्टिव्ह खासदार, नेता शिवसेनेने संजय राऊत यांच्या गाढवपणाने गमावला आहे.असो

जयहिंद (एकच वादा शिवाजी दादा) अशा घोषणा आता सर्वत्र घुमतील. कारण आढळराव पाटील हे खरोखरच एक आदर्श, कार्यक्षम, सेवातत्पर आणि तळमळीचे राजकारणी आणि सच्चे समाजसुधारक नेते आहेत. दादांची सावली, घट्ट , दृढ मीत्र, धडाडीचे नेते आणि परखड विचार मांडून रोखठोक बोलणारे, कायम दिलीप वळसे पाटलांवर स्वतःला पून्हा पून्हा आरशात पाहायला लावणारे, तालूक्यातील निर्भीड आणि यशस्वी उद्योजक श्री लक्ष्मणराव मनाजी काचोळे यांचे आग्रहावरून दादांचे राजकीय क्षेत्रातील महत्व अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न आहे.

खरे तर दादांची उद्योग व्यवसायातील भरारी आणि त्यासह राजकारणातील जिद्द त्यांचे चरित्र शुध्द ठेवते. आणि दादांनी ज्या शिवसेनेला इथे वाढवलं जोपासलं त्याच सेनेला पक्षा पेक्षा माझे कार्य याला जबाबदार आहे हे सिध्द करायचे आहे, करावे लागणार आहे.

# चित्त्यांचे स्थलांतरण

आधुनिक केसरी

**गुजरातमधील आशियाई सिंहांच्या स्थलांतरणासाठी मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानाची निवड करण्यात आली होती. गुजरात सरकारच्या विरोधानंतर हा विषय न्यायालयात गेला. न्यायालयाने त्यांच्या विरोधात निर्णय दिल्यानंतरही तो अधांतरी आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी झाल्यास आफ्रिकन चित्त्यांचे काय, असा प्रश्न आहे. एकीकडे भारतातून चित्ता पूर्णपणे नाहीसा झाला तर दुसरीकडे आशियाई सिंहाची वाटचालदेखील नामशेषाच्या दिशेने सुरू झाली आहे. मात्र, चित्त्यांच्या आंतरराष्ट्रीय आणि सिंहांच्या आंतरराज्यीय स्थलांतरणासाठी एकाच ठिकाणावर शिक्कामोर्तब झाले आहे. चित्त्यांचे आगमन याच महिन्यात होणार असल्याने या स्थलांतरणावर विविध तर्कवितर्क लढवण्यात येत आहेत. सुमारे नऊ वर्षांपूर्वी २०१३मध्ये उच्च न्यायालयाने गुजरात सरकारला आदेश दिला होता, की आशियाई सिंहांमधील काही शेजारच्या मध्य प्रदेशात पाठवण्यात यावेत. त्यावर गुजरात सरकार सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर त्यांनीदेखील हाच निर्णय कायम ठेवला. मात्र, अजूनपर्यंत या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. जागतिक पातळीवर आता आशियाई सिंह गुजरातमध्येच उरले आहेत. गेल्या २५ वर्षांपासून त्यांच्या अस्तित्वावर 'कॅनाईन डिस्टेम्पर व्हायरस' या संसर्गजन्य विषाणूचे सावट आहे. या विषाणूची लागण झाल्यास भारतातच नव्हे तर जगभरातून ही प्रजाती पूर्णपणे नाहीशी होऊ शकते. २०१८ साली २३ सिंहांचा याच विषाणूमुळे मृत्यू झाला होता. आशियाई सिंहासाठी कुनो राष्ट्रीय उद्यानावर शिक्कामोर्तब झाले असताना त्याच प्रस्तावित अधिवासात आफ्रिकन चित्त्यांचे स्थलांतरण करण्याचा प्रस्ताव केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीसमोर ठेवण्यातच आला नाही. येथे चित्ता आणण्यापूर्वी कोणताही तपशीलवार अभ्यास करण्यात आला नाही. त्याचे ते ऐतिहासिक निवासस्थानदेखील नाही. त्यामुळे सिंहाचे संरक्षण हीच प्राथमिकता असायला हवी. या प्रकल्पावर केंद्र सरकार तसेच मध्य प्रदेशने कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. चित्ता प्रकल्प हा खरेच विज्ञानावर आधारित संवर्धन उपक्रम आहे की महागडा निरर्थक प्रकल्प आहे, असा प्रश्नही या अभ्यासकांनी उपस्थित केला आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण व केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात चित्त्यांच्या येण्याचा सिंहांच्या स्थलांतरणावर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले. सिंहाच्या स्थलांतरणाला उशीर झाल्यामुळेच चित्त्यांचा विचार करण्यात आल्याचे त्यांनी यात म्हटले आहे. कृती आराखड्यातील अंदाजानुसार कुनो राष्ट्रीय उद्यान, ज्याची निवड अफ्रिकेवरून आणण्यात येणाऱ्या चित्त्यांना स्थापित करण्यासाठी करण्यात आली, त्या उद्यानाचा विचार केला तर संरक्षण, शिकार व अधिवासाच्या पातळीवर केवळ २१ चित्ते येथे राहू शकतात. १५ वर्षांत ते येथे स्थिरावले तर हा अधिवास त्यांनी स्वीकारला हे स्पष्ट होईल आणि असे झाल्यास ३०-४० वर्षांत ही संख्या २१ वरून ३६ पर्यंत जाऊ शकेल असा अंदाज आहे.**

# प्रिय बापू



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482


आधुनिक केसरी

**प्रिय बापू, मी आज आवर्जून पत्र लिहायला घेतलं आहे. तुम्हाला माहिती नसेल कदाचित स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आम्ही साजरा करीत आहोत. म्हणून तुमच्या कानावर घालावं. कदाचित तुम्हालाही आनंद वाटेल. खरं सांगू बापू आपली भारतभूमी जगाला नवल वाटावी. जगाला भूल पडावी इतकी समृद्ध होती आणि ती आजही आहे. या देशात सोन्याचा धूर निघत होता, असे म्हणतात. याचा अर्थ मी समृद्ध, विकसित झालेला, महाकाय भारत देश असाच घेतो. सर्व जगाला भारताचे आकर्षण होते. म्हणून परदेशातल्या लोकांनी खूप वेळा चढाया, लढाया केल्या.**

बापू, सम्राट अशोकाच्या काळात या देशाचं जगाला आकर्षण होतं. सत्तेच्या, पदाच्या, पैशाच्या लालचेपोटी अनेक वेळा आक्रमणे झाली. पण इथला दऱ्या खोऱ्यातला प्रत्येक माणूस लढला. लाखो पिढ्या लढता लढता समर्पित झाल्या.

त्यानंतर इंग्रज या देशात आले. त्यांनी जातीचा आणि धर्माचा अभ्यास केला. जाती जातीत आणि धर्मा धर्मात तेढ निर्माण केली. आणि त्यांनी एक युद्धनीती आखली. ती म्हणजे फोडा आणि झोडा. या कुठील नीतीचा अवलंब करून दीडशे वर्षे देशावरती इंग्रजांनी राज्य केलं.इथल्या प्रत्येक माणसाला हातबल केले. अन्याय, अत्याचार केले. या अत्याचाराला कंटाळून देशाला स्वातंत्र्य मिळायला हवं. म्हणून इथल्या प्रत्येक माणसांच्या मनामध्ये चिढ पेटत गेली. त्या हतबल झालेल्या मातृभूमीतील प्रत्येक माणसाच्या मनामनामध्ये स्वातंत्र्याची चिंगारी आपण पेटविलात. आणि तुमच्या एका हाकेला इथला माणूस स्वतंत्र्यासाठी गोळ्या झेलायला तयार झाला. हुतात्म्य पत्करायला तयार झाला. पाहता- पाहता लोखो लोकांनी आपल्या देहाच समर्पण केलं. इथे स्वतंत्र्यासाठी रक्ताचे पाठ वाहिले. बापू तुमचे आणि सुभाष चंद्र बोस यांचे विचार प्रवाह कदाचित वेगळे असतीलही पण, त्यांचेही खूप मोठे योगदान भारताच्या स्वातंत्र्यासाठी, आपल्या देशासाठी होतं. एका बाजूला रक्तरंजित क्रांती आणि दुसऱ्या बाजूला अहिंसेचा सत्याग्रह या दोन्हीही मार्गाने आपण इंग्रजांच्या विरोधात लढलो बापू.!!! तुम्हा दोघांचे विचार इथल्या माणसाला पेटवित राहिले. लाखो लोकांनी सत्याग्रह केले.तेंव्हा इंग्रजांची त्रिधा तिरपट उडाली. भयभित झालेला इंग्रज शेवटी शरण आला.आणि 1947 ला भारत देश स्वतंत्र झाला. खरं सांगू बापू तुम्ही नसतातना तर कदाचित आजही भारत पारतंत्र्यात, गुलामगिरीत राहिला असता. तुमच्या सत्याग्रहाचे विचाराचे आज जगभर कौतुक होत आहे.ज्या देशांनी तुम्हाला विरोध केला. त्याच लोकांनी आपल्या देशातल्या लेकरा बाळांच्या अंगावरती रणगाडे फिरवले. संगिनी वरती लेकरा बाळांचे देह नाचविले गेले. आज त्याच देशाने तुमच्या मृत्यूनंतर सन्मान केला.आज तुमचे पुतळे जगभर उभा केलेत. तुमचे विचार जगातल्या प्रत्येक माणसांच्या ओठावरती आहेत बापू.!!! आज तुम्ही अजरामर झाला आहात.!!!

आणखीन एक महत्त्वाच सांगायचं आहे मला. पण दुःख सांगण्याचा दिवस नाही.आणि सांगितल्यावाचून रहावतही नाही. मी नाही सांगितलं तर तुम्हाला तरी कसं समजेल. देशाचे गरीबी, दारिद्र्य ,उच्चाटन व्हायला हवं, म्हणून तुम्ही अंगावरची कपडे उतरवीलात. आणि शपथ घेतली .या देशातली गरिबी संपणार नाही तोपर्यंत कपडे घालणार नाही.म्हणून तुम्ही उर्वरित आयुष्य पंचा आणि धोतर यावरती काढलं.तो विचार आज आमच्या रोमा रोमांमध्ये सळसळतो आहे. भारत छोडो हा नारा त्या बुलंद आवाजाणे इंग्रजांना सळो की पळो करून सोडलं. आणि शेवटी देश स्वतंत्र झालाच. आज 75 वी आम्ही मिळून साजरी करताना तो तुमचा विचार सतवतो आहे. या देशात अजूनही तेच दारिद्र्य दिसतं आहे. दलित, भूमीहिन,आदिवासी, शेतकरी विकासापासून



कोसो दूर आहे. इंग्रज गेले पण इंग्रजाचे कुटील डाव आज आमचे राजसत्तेतील लोक खेळत आहेत.एका बाजूला प्रचंड श्रीमंती. तर दुसऱ्या बाजूला फुटपाथवर झोपायलाही जागा नाही. ही विषमतेची दरी अजूनही संपलेली नाही बापू.!!!!

हे पत्र वाचून कदाचित तुम्हाला दुःख वाटेल. पण माझाही नावीला आहे. माझ्या पत्राची दखल घेणारा आज कोणी दिसत नाही.

खरंतर इथे राजकारण करणाऱ्या राजकर्त्यांना एक विनंती करून मला जायचं आहे बापू.!!!

आम्ही नसुच जेंव्हा स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा होईल. तो क्षण इथला प्रत्येकाला आनंद देणारा असेल. इथल्या प्रत्येक माणसाला माणसासारखं जीवन जगण्याचं स्वातंत्र्य मिळालेलं असेल. इथे कोणाचेही शोषण होणार नाही.प्रत्येक मुलाला शिक्षण मिळेल. जातीय आणि धार्मिक सुलोखा देशात प्रस्थापित होईल. प्रत्येकाला घर असेल. आणि घरावर राष्ट्रध्वज सन्मानाने फडकत असेल. शोषण विरहित समान- समाज व्यवस्था निर्माण झालेली असेल. असा देश तुम्हालाही पाहायला आवडेल.

बापू आणखीन एक शेवटी सांगायचं आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचेही खूप मोठे उपकार या भारत देशावर झालेले आहेत. जगाला हेवा वाटावा, एवढे तत्वज्ञान, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला दिले. स्वातंत्र्य, समता, न्याय, आणि बंधुत्व या विचारावरती आधारित भारतीय संविधान भारताला समर्पित केलं. म्हणून आम्ही शिक्षण घेऊ शकतो. बोलू शकतो. देशात कुठेही राहू शकतो. सपत्ती ग्रहण करू शकतो. हक्कासाठी आवाज बुलंद करू शकतो. ह्या संविधानाचा आता आम्ही धर्म म्हणून स्वीकारही केला आहे. इथला प्रत्येक माणूस बाबासाहेबांच्या विचारावरती चालतो आहे. याचाही आम्हाला अभिमान वाटतो. बापू तुमच्या आशीर्वाद आम्हा भारतीयांच्या पाठीशी असू द्या. शेवटी तुम्हालाही अमृत महोत्सवाच्या शुभेच्छा अर्पण करतो. समर्पित करतो....

**तुमचा**
**भूमिपुत्र वाघ**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अखंड भारताचा संकल्प आवश्यक



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**ज्या समाजाला विभाजनामुळे दुःख भोगावे लागले त्या बांधवांच्या दुःखात आम्ही सहभागी असण्याची आवश्यकता आहे. जे लोक यशस्वीपणे भारतात परत येऊ शकले इथे राहू शकले व प्रगती करू शकले त्या लोकांचा ही सत्कार होणे आवश्यक आहे. जे लोक भारतात आले त्यांचे भारतात येण्याचे कारण म्हणजे हा हिंदुस्थान आहे. ही हिंदू लोकांची भूमी आहे. हे त्यांचे माहेरघर आहे. म्हणूनच ते आले आहेत. आणि आजही पाकिस्तान मध्ये बांगलादेशात ज्या हिंदूंवर अत्याचार होतात ते आजही भारताकडेच मोठ्या आशेने बघत आहे त्यांना सामावून घेणे ही आमची जबाबदारी आहे. कारण त्यांच्याही पूर्वजांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपले बलिदान केलेले होते. यासाठी इतिहास जिवंत ठेवणे त्याचे स्मरण ठेवणे, पुन्हा यापुढे कधीही देश तुटणार नाही याचा संकल्प करणे आवश्यक आहे.**

15 ऑगस्ट 1947 साली देश स्वतंत्र झाला. हजारो क्रांतिकारकांचे आणि लाखो जनतेचे स्वप्न पूर्ण झाले. परंतु भारताला जे स्वातंत्र्य मिळाले ते खंडित स्वातंत्र्य होते. हजारो वर्षांपूर्वीपासून जो भारत एकसंघ होता तो भारत खंडित झाला होता. ज्या भारताला अकबर, औरंगजेब हे सुद्धा कधी विभाजित करू शकले नव्हते तो देश विभाजित झाला होता. भारत मातेचे दोन तुकडे झालेले होते. हजारो क्रांतिकारकांचे भारत मातेला अखंडित स्वतंत्र पाहण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही. लाखो जनतेने कधीही विचारही केला नसेल की या देशाचे दोन तुकडे होतील व त्यातून पाकिस्तान नावाचे नवीन मुस्लिम राष्ट्र जन्माला येईल. परंतु आज ते सत्य झालेले होते. जे कधी स्वप्नातही पाहिले नाही ते सत्यात उतरले होते. हजारो क्रांतिकारकांचे स्वप्नभंग भावले होते. ज्याचा स्वप्नातही विचार केला नव्हता ती गोष्ट आज प्रत्यक्षात उतरलेली होती. कोणाचेही मन ही गोष्ट मान्य करायला तयार नव्हते. पण तरीही वास्तविकता हीच होती. भारताचे विभाजन झाले होते. लाखो भारतीयांनी ज्या भारत मातेला देवी मानलेले होते त्याच देवतेच्या अंगभंगातून पाकिस्तान नावाचे राष्ट्र जन्माला आलेले होते. ज्याचा विचार भारताच्या नेतृत्वाने कधी केला नव्हता, देशातील लाखो जनतेने कधी केला नव्हता, क्रांतीकारकांनी कधी केला नव्हता, ते सत्य कसे काय झाले? ते प्रत्यक्षात कसे काय आले याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. या विभाजनामध्ये दोन पक्ष होते एक होता मुस्लिम लीगचा ज्याचे नेते होते बॅरिस्टर मोहम्मद अली जिना व दुसरा पक्ष होता काँग्रेसचा ज्याचे नेते होते महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल. इंग्रज भारत सोडून जाणार हे निश्चित झालेले होते. परंतु हा देश सोडून जाताना इंग्रजांच्या मनात होते की हा देश नेहमी करता पंगू झाला पाहिजे. व जगाच्या रंगमंचावर याची काहीच भूमिका असायला नको. त्यासाठी त्यांनी मुस्लिम लीगला आपल्या हाताशी धरले. मुस्लिम लीग ला सुद्धा हे माहीत होते की इंग्रज आज ना उद्या हा देश सोडून जाणार आहेत परंतु ते देश सोडून जात असताना मुस्लिम लीगचा कसा अधिकाधिक फायदा होईल याचाच मुस्लिम लीग विचार करीत होती. आणि म्हणून विभाजनाच्या ज्या कल्पनेला काँग्रेस विरोध करत होती, महात्मा गांधी तर म्हणायचे की माझ्या शरीराचे दोन तुकडे झाले तरी चालेल परंतु भारताचे विभाजन होऊ देणार नाही. पंडित नेहरूंनी तर भारत विभाजनाच्या कल्पनेला "नॉन्सेन्स" असेच म्हटले होते. डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी तर भारताचे विभाजन कसे निरुपयोगी आहे याबद्दल एक ग्रंथ लिहिलेला होता. असे असताना सुद्धा विभाजन झाले. मुस्लिम लीग देशभरातील मुसलमानांमध्ये पाकिस्तान नावाचे नवे राष्ट्र उदयाला येऊ शकते या संकल्पनेला रुजवण्यात यशस्वी झाली. मुस्लिम लीगला अर्थातच साथ होती इंग्रजांची. डायरेक्ट ॲक्शन या नावाखाली मुस्लिम लीगने सीमावर्ती प्रदेशात म्हणजे जो आजचा पाकिस्तान आहे व जेथे जेथे मुस्लिम बहुसंख्या आहेत अशा गावांमध्ये दंगे धोपे सुरू केलेले होते. गावागावातून हिंदूंना पिटाळून भारताकडे पळवून लावण्याचे कारस्थान मुस्लिम लीग व त्याच्या गुंडांनी सुरू केलेले होते. इंग्रज मुकदर्शक बनून हिंदूंवरचे हे अत्याचार व कत्तली बघत होते. पाहता पाहता देशाचे वातावरण खूपच बिघडले. व सर्वत्र दंगे सुरू झाले. काँग्रेस असहाय्यपणे हे सर्व बघत होती. ती जनतेला केवळ शांततेचे आवाहन करू शकत होती. परंतु मुस्लिम लीग च्या पाठीमागे सर्व मुसलमान समाज त्यावेळेला जमा झाल्यासारखा होता. त्यामुळे काँग्रेसचे आवाहन फक्त हिंदूंसाठीच होते व हिंदू दंगे करतच नव्हते ते तर दंग्यांचे बळी ठरत होते. दंगेखोर उत्साहित होते व हिंदू भयग्रस्त. शेवटी काँग्रेसच्या नेतृत्वाने भारताचे विभाजन स्वीकार केले. 1930 साली लाहोर येथे ज्या रावी नदीच्या किनाऱ्यावर संपूर्ण स्वातंत्र्याची शपथ घेतल्या गेली ती शपथ आज काँग्रेस विसरली होती. विभाजनापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये देशातील जनतेने अखंड भारत राहावा यासाठी काँग्रेसला मतदान केले होते व काँग्रेस निवडूनही आलेली



होती. परंतु काँग्रेस देशातील जनतेला दिलेले वचन विसरली व त्यांनी विभाजनाला मान्यता दिली.हा तर देशाच्या जनतेसोबत केलेला विश्वासघातच होता. लाखो लोक अंगावरच्या नेसत्या वस्त्रानिशी आपल्या बायका मुलानीशी पायी ,बैलगाडीने, मोटार गाडीने, ट्रकने, ट्रेनने भारताकडे येण्यासाठी निघाले.भारताकडे निघालेल्या जथ्थ्यांवर गावोगावी मुसलमान गुंडांकडून हल्ले केले जात होते. त्यांच्याजवळ असलेले पैसेअडके, संपत्ती बायका, यांना लुटण्यात येत होते. अत्याचाराचा कहर झालेला होता. स्त्री-पुरुष मुलं कोणीही सुरक्षित नव्हते. शेकडो स्त्रियांना पळविण्यात आले. शेकडोंना दासी म्हणून ठेवून घेण्यात आले. सर्वत्र क्रूरतेचा नंगा नाच सुरू होता. भयभीत भेदरलेल्या मनांना काँग्रेसचे नेतृत्व शांततेची अपील करीत होते. इंग्रजांचे सैनिक मुकदर्शक म्हणून राहिलेले होते. लाखो लोकांना आपला देश सोडावा लागला. हजारोंना आपले प्राण गमवावे लागले. हजारोंना आपल्या बायका मुलांना गमवावे लागले. लाखो लोक बेघर झाले. एका अज्ञात भविष्याच्या दिशेने त्यांचा प्रवास त्यांना करावा लागला. व आयुष्याच्या अनेक वर्ष त्यांना शरणार्थी म्हणून भारतामध्ये जीवन कंठावे लागले. हे हिंदू समाजावरचे फारच मोठे जीवघेणे संकट होते.

आज देशाच्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झालेले आहेत. म्हणजेच देशाच्या विभाजनाला सुद्धा 75 वर्ष पूर्ण झालेले आहेत. देशातील भोळ्याभाबड्या जनतेने जर नेतृत्वावर अंधविश्वास टाकला तर किती मोठे संकट उद्भवू शकते याचा प्रत्यय देशातील जनतेला विभाजनाच्या समस्येच्या निमित्ताने झालेला आहे. आजच्या पाकिस्तान मध्ये मुस्लिमांची संख्या जास्त होती म्हणून त्यांना देश तोडून देण्याचे काहीच कारण नव्हते. फार फार तर आज देश अखंडित राहिला असता तर ज्या समाजाचे लोक अधिक राहिले असते त्या समाजाचे खासदार त्या भागातून अधिक निवडून आले असते. परंतु तरीही संपूर्ण देशांमध्ये हिंदूंचीच बहुसंख्यता असल्यामुळे हिंदूंचे खासदार अधिक निवडून आले असते व देशावर हिंदूंचाच वरचष्मा राहिला असता. भारतमाता ही फक्त हिंदूंचीच माता होती का? ही तर इथे राहणाऱ्या मुसलमानांची पण माता होती. मग भारताचे विभाजन मुसलमानांना तरी कसे काय स्वीकार राहू शकले असते? मुस्लिमांमध्ये राष्ट्रीय विचाराचा प्रचार प्रसार कमी व धर्मांध कट्टरवादी मुस्लिम लीगचा प्रचार जास्त अशी परिस्थिती झाल्याने सुद्धा मुस्लिम समाजाची दिशाभूल झाली. भारतापासून तुटून वेगळा निघालेला पाकिस्तान आज अतिशय दुखद परिस्थितीत जीवन जगत आहे. त्या पाकिस्तानची आज संपूर्ण वाताहात झालेली आहे. येथील जनता अतिशय बेकारीचे जीवन जगत आहे. त्यांना देश तोडून काय मिळाले हा प्रश्न तेथील जनतेला ही आहे. या उलट भारताने जीवनाच्या सर्व क्षेत्रात प्रगती केलेली आहे. भारत जर अखंडीत राहिला असता तर आजचा पाकिस्तान सुद्धा या प्रगतीचा सुद्धा वाटेकरी राहिलेला असता. आज भारत पाकिस्तान हे दोन वेगवेगळे जरी देश असले व त्यांच्या मध्ये कट्टर शत्रुत्व जरी असले तरी सुद्धा दोघांमध्ये सांस्कृतिक एकता राहिली पाहिजे हे आवश्यक आहे. अखंड भारताचे स्मरण आम्ही मनामध्ये कायम ठेवणे आवश्यक आहे. कारण देशाचे आयुष्य हे शेकडो वर्षांचे असते. समाजाचे आयुष्य सुद्धा शेकडो वर्षांचे असते. एखादा परिस्थितीमध्ये उद्भवलेल्या समस्या या काही चिरकालिक राहतीलच अशातला भाग नाही. म्हणून आम्ही जे गमावले आहे त्याचा त्याचे स्मरण आमच्या मनात राहणे आवश्यक आहे. आज जग भारताकडे मोठ्या आशेने बघत आहे. कदाचित उद्या पाकिस्तानला सुद्धा भारताकडेच बघावे लागेल. परंतु विभाजनाचा इतिहास, स्वातंत्र्याचा इतिहास आमच्या नेतृत्वाच्या चुका व जनतेच्या समाजाच्या सुद्धा चुका जोपर्यंत समाजामध्ये जागृत राहत नाही, तोपर्यंत त्यातून बोध घेणे व शिकणे ही प्रक्रिया होऊ शकत नाही. नवीन पिढीला हा इतिहास सांगण्याची गरज आहे.

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करताना..!



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ साली भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली. यावर्षी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे ७५वा स्वातंत्र्य दिन भारतभर मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचे सरकारी पातळीवर ठरविले आहे. त्याचप्रमाणे सरकारी पातळीवरून विविध कार्यालयात विविध कार्यक्रमाद्वारे हा अमृत महोत्सव दिन साजरा करण्यात येत आहे. भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करून हर घर तिरंगा(काही ठिकाणी तिरंग्यावरील अशोक चक्र गायब केले आहे) म्हणूनही आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. खरंतर स्वातंत्र्य हे अनेक लाखो लोकांच्या बलिदानातून मिळाले आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त केले. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात देशाविषयी आणि स्वातंत्र्यवीरा विषयी कृतज्ञतेची भावना आहे. ती असली ही पाहिजे.**

त्याचबरोबर भारताने या ७५ वर्षात नानाविध क्षेत्रात नेत्रदीपक अशी कामगिरी केल्याची दिसून येते. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, रस्ते, वीज अशा विविध क्षेत्रात भारताने खूप प्रगती केली आहे. आज भारत सुजलम सुफलम करण्यासाठी अनेक राज्यकर्त्यांनी, स्वातंत्र्यसैनिकांनी, तरुणांनी आपले योगदान दिले आहे, हे नाकारता येण्यासारखे नाही, त्याचबरोबर भारताने काय कमावले आणि काय गमावले याचाही विचार होणे गरजेचे आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीच्या खाईतून भारत देश मुक्त झाला. भारतीयांच्या डोक्यावरील विविधांगी ओझे कमी झाले. अनेकांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. आनंदाचे भाव दिसू लागले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा करताना अनेक शाळांमध्ये गावातून फेरी काढली जाते. भारत माता की जय.. हम सब एक है... जोडो जोडो भारत जोडो, जात-पात के बंधन तोडो भारत जोडो.. अशा घोषणा दिल्या जातात. गुरूजी शाळेत भाषण करतात. मुलांना आणि जमलेल्या गावकऱ्यांना स्वातंत्र्याचा थोडक्यात तोडका मोडका इतिहास समजून सांगतात. या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक जणांनी बलिदान दिले आहे. तोही इतिहास मनापासून आणि खरा सांगताना नाहीत. त्यामधील दलित, आदिवासी, भटक्यांचे योगदान सांगत नाहीत. तसे तर तोही इतिहास त्यांना माहित नसतो. आम्ही अशा अनेक गोष्टी हातचे राखून सांगत असतो. पुढे २६ जानेवारी १९५० रोजी भारत देशाने लोकशाहीचा स्विकार केला. सगळ्यांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचे तत्व आले. ज्यांना माणूस म्हणून जगू दिले जात नव्हते,मानवी अधिकार नाकारले होते, शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते, विषमतेने वागवले जात होते.त्या सर्वाला संविधानामुळे चपराक बसली.त्यामुळे अनेकांचे जीवन बदलले. प्रगतीपथावर वाटचाल करू लागले. जात-धर्म, स्त्री-पुरुष, गरीब - श्रीमंत, आपला - परका, याला कुठेही थारा नव्हता. माणूस महत्त्वाचा होता. संविधानानेही माणूस महत्त्वाचा मानला. त्यामुळेच माणूस प्रगती करू लागला. चंद्र, सूर्यावर जावू लागला.कारण संविधानाने सगळ्यांना अधिकार दिला म्हणून.

पण आज हा स्वातंत्र्यदिन साजरा करताना सर्वांनी विचार करायला हवा की आपण भारत देशाला कोणत्या प्रगतीपथावर घेऊन जात आहोत? जात धर्मांच्या नावावर राजकारण करून सामान्य माणसांचे खच्चीकरण करत आहोत. प्रगतीपथावर नेलेल्या भारताला खाली खेचत तर नाहीत ना? असे असंख्य प्रश्न डोळ्यात अंजन घालणारी आहेत? पण याबाबत कुणी बोलायला तयार नाही? लिहायला तयार नाही? आवाज उठवायला तयार नाही? हे खरं आहे. कारण आमचं स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. अन्याय अत्याचाराची दखल घेतली जात नाही. सामान्य माणसाला न्याय मिळवून दिला जात नाही. सगळ्यांना दडपणाखाली जीवन जगावं लागत आहे. बोलायला लिहायला बंदी असल्यासारखी. सगळी मुस्कटदाबी चालू आहे. शेतकरी आत्महत्या करतो आहे. खरे बोलणा-यांना, लिहिणारांना इथे जीवानशी संपवले जात आहे. स्त्रीयांवर अन्याय अत्याचार केले जात आहेत. दलितांच्या जीवनांची राखरांगोळी केली जात आहे. खोट्यांना साथ दिली जात आहे. भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात आहे. अन् जो लढतो, ख-यांची बाजू घेतो त्याला मात्र त्रास दिला जातो. खोटे मात्र राजरोसपणे उथळ माथ्याने फिरत आहेत. हे कुठेतरी थांबायला हवे. आम्ही शिकणारांनी या गोष्टींचा विचार करून या स्वातंत्र्याची होत असलेली गळचेपी थांबवायला हवी. सत्याच्या बाजूने उभे राहायला हवे. अनेक लेखक, कवी, साहित्यिक, विचारवंत सत्याला भिडताना किंवा कवेत घेताना दिसत नाहीत. उलट पद, प्रतिष्ठा मिळवण्यासाठी खोटा मान, सन्मान मिळवण्यासाठी खोट्यांच्या गोठ्यात जाऊन बसणे पसंत करत आहेत. खरे तर शिकलेल्या लोकांकडून, साहित्यिक, विचारवंताकडून ही अपेक्षा नाही. उलट त्यांनी सामान्याला न्याय मिळवून देण्यासाठी, भ्रष्टाचार रोखण्यासाठी, स्वातंत्र्यावरील होत असलेल्या हल्ल्याच्या विरूद्ध आवाज उठविण्यासाठी आपली लेखनी झिजवायला हवी. पण आजची अवस्था भयानक आहे. शिकलेल्या लोकांकडून, विचारवंत, साहित्यिकांकडून, अधिका-यांकडून, लोकप्रतिनिधीकडून या स्वातंत्र्याची पायमल्ली होताना दिसते आहे . संविधानाप्रमाणे कारभार करताना दिसत नाहीत. त्यांनी स्वातंत्र्याची मूल्य समाजात स्वार्थासाठी पेरलीच नाहीत . ते संविधानाने घालून दिलेल्या नियमाने वागताना दिसत नाहीत. माणसांचा उदोउदो करण्याऐवजी भलत्याच गोष्टीचा उदोउदो केला जात आहे. हे भयानक आहे. भगवंत देशमुख नावाचा कवी म्हणतो की,

" वाटले होते की,
स्वातंत्र्याच्या वातावरणात
गाव मोकळा श्वास घेईल
लोकशाहीचे वारे पिऊन
आकाशात झेप घेईल ."

आजही स्वातंत्र्याच्या वातावरणात माणूस मोकळा श्वास घेईनासा झाला आहे. त्याला घेऊ दिला जात नाही हे वास्तव सुर्यप्रकाशाइतके सत्य आहे. जिकडे तिकडे माणसांची अडवणूक आणि फसवणूक केली जात आहे. माणूस मारला जात आहे. जाती, धर्माला प्रोत्साहन दिले जात आहे. घोषणेच्या नावाखाली माणसं मारली जात आहेत. तरीही सगळी यंत्रणा मूग गिळून गप्प बसली आहे? कुणी बोलत नाही? आवाज काढत नाही?कारवाई केली जात नाही. उलट पाठिशी घातले जात आहे.कुणी लिहितही नाही?जिकडे तिकडे असहिष्णू वातावरण. हे पारतंत्र्य नव्हे काय? हुकूमशाही नव्हे काय? बोटावर मोजण्या इतक्या माणसांकडेच देशाची संपत्ती आहे.गरीब भुकेने मरत आहे. मंदीर - मस्जिद च्या नावाने राजकारण चालू आहे. असे अनेक प्रश्न मनात आणल्याशिवाय राहत नाहीत. पण हे देशहितासाठी धोकादायक आहे. मानवतेसाठी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी धोकादायक आहे. अण्णा भाऊ साठे म्हणाले होते की,

'ये आजादी झुठी है!
देश की जनता भुखी है!'

हे लक्षात घ्यायला हवे. कारण आजही देशातील बहुतांशी जनता अन्न अन्न करून कुपोषणाच्या विळख्याने मरत आहे. त्यात पुन्हा कोरोनाची जास्तीची भर पडली आहे.सामान्य ,गरीब माणुस भेदरून गेला आहे. पूर परिस्थितीमुळे अनेक जण हैराण झाले आहेत. अनेक गावं उद्ध्वस्त झाली आहेत. अनेकांचा संसार उध्वस्त झाला आहे. रोजगार नाही. नोक-या नाहीत. स्वातंत्र्याचा अर्थ त्यांच्यापर्यंत पोहचू दिला जात नाही.शिक्षण बंद केले जात आहे. शिष्यवृत्ती बंद केली जात आहे. जाती - जातीत, धर्मात तेढ निर्माण केली जात आहे. तरीही आम्ही सारे सहन करतो आहे. आजही खोटा इतिहास तरूणांच्या माथी मारला जातो आहे . त्याला भरकटविले जाते. हे कुठेतरी थांबायला हवे. आजच्या तरूणांनी सत्य इतिहास जाणून घ्यायला हवा. मोठ्या कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचा अभ्यास करून, लोकशाही मूल्याची जपणूक करण्यासाठी झगडायला हवे.याविषयी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश एन.व्ही.रमणा यांनीही खंत व्यक्त केली आहे. ते म्हणतात की," स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही मोजक्या नागरिकांना आपल्या संविधानिक अधिकाराची माहिती आहे, हे देशाचे दुर्दैव आहे, पाश्चात्य देशात लहान शाळकरी मुलगाही तिथल्या संविधान आणि कायद्याबद्दल जागरूक असतो, ही संस्कृती आपल्याकडे असायला हवी."खरे तर ही संस्कृती आपल्याकडे रुजविण्यासाठी शासकीय पातळीवर कुठल्याही प्रकारचे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. लोकप्रतिनिधी ही उदासीन दिसतात. उलट त्यांनाच संविधानाचा अर्थ कळलेला नसतो. ते संविधानाच्या विरोधातच वागताना दिसतात. तेच नियमाचे उल्लंघन करताना दिसतात हे वाईट आहे.हे जर असे असेल तर मग तिरंगा रॅली काढून , हर घर तिरंगा लावून काय उपयोगाचे? उलट तिरंगा वरील अशोक चक्र बाजूला काढून संविधानाची पायमल्ली केली जाते. त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही ही शोकांतिका आहे. शासनाने समाजहित आणि देशहितासाठी कार्य करून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करायला हवी. असहिष्णू वातावरण नाहिसे करायला हवे. जात धर्मापेक्षा माणूस महत्त्वाचा मानायला हवा. या सगळ्या गोष्टींचा विचार आम्ही देशाचे नागरिक म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करताना करायला हवा. यातच देशाचे भले आहे.

# सदैव अटल



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**१६ ऑगस्ट २०१८ रोजी भारत मातेच्या मुकुटातला हिरा शेवटला निखळला. अटल युगाचा अंत होतांना प्रत्येक भारतीय हळहळला. भारत सरकारने अटलजींना १९९२ साली पद्म विभूषण तर २०१५ ला भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविले आहे. त्यांच्या स्मरणार्थ 'सदैव अटल' नावाचे स्मारक बांधण्यात आले आहे. भारतीय राजकारणात आपल्या आचरणाद्वारे लोकशाही मूल्यांची पुनर्स्थापना करणाऱ्या प्रखर राष्ट्रवादी 'भारतरत्न' अटलबिहारी वाजपेयीजी यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र आदरांजली.**

आपल्या चाहत्यांसोबत विरोधकांचेही मन जिंकणारे राष्ट्रपुरुष भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांनी देशाची दिशा आणि स्थिती बदलणाऱ्या अनेक गोष्टी केल्या. त्यांचे तेजस्वी व्यक्तिमत्व, स्वभाव, विनोदबुद्धी, प्रखर आवाज, त्यांचे योगदान, यांच्या माध्यमातून ते सदैव देशवासीयांच्या स्मरणात आहेत. २५ डिसेंबर १९२५ रोजी मध्यरात्री प्रभू येशूचा जन्म सोहळा साजरा असतांनाच ग्वाल्हेर संस्थानातील लोकप्रिय कवी कृष्ण बिहारी वाजपेयी यांचे घरही पुत्र आगमनाने आनंदात फुलून गेले होते. या मुलाचं नाव अटल बिहारी असे ठेवले गेले. 'अटलबिहारी' पुढे नावाप्रमाणेच अटल म्हणजे कधीही न ढळणारा, ठाम असलेला; तर बिहारी म्हणजे सर्वत्र विहार करणारा निघाला.

ग्वाल्हेरला जन्म झाला असला तरी अटलजींचे मूळचे घराणे आग्रा जिल्ह्यातील बटेश्वर या गावचे होते. पूर्वी केव्हातरी त्यांच्या पूर्वजांनी वाजपेय यज्ञ केला होता, तेव्हापासून त्या घराण्याला लोक वाजपेयी या नावाने ओळखू लागले.

शिस्तप्रिय, उत्कृष्ट वक्ते, कवी आणि उत्कट देशभक्त असलेल्या वडिलांचे संस्कार अटलजींवर वर झाले. शिक्षणाबरोबरच अटलजी संघाचेही काम करू लागले. नागपूरच्या शिबिरात त्यांनी प्रथमच आपली कविता म्हणून दाखवली.

**हिंदू तन मन, हिन्दु जीवन**
**रग रग हिन्दु मेरा परिचय !**

अगदी पहिल्यांदाच ते ही कविता म्हणत होते. तेव्हा ते दहावीत होते. नंतरच्या काळात हीच कविता अनेक स्वयंसेवकांची प्रेरणा बनली. संघाच्या अनेक शाखांवर या कवितेचे गायन होऊ लागले. लहानपणापासूनच अटलजी मुद्देसूद बोलायचे, त्यामुळे संघ शाखेवर एखाद्या विषयावर बोलण्याचे काम त्यांच्याकडेच यायचे.

देशात स्वातंत्र्याचे रणकुंड धडाडून पेटले होते. गांधीजींच्या चले जाव आंदोलनाने सारा देश जागृत झाला होता. इंग्रजांचे तुरूंग स्वातंत्र्यप्रेमी माणसांनी भरून गेले होते. जो-तो आपल्या परीने स्वातंत्र्य - कुंडात समिधा टाकत होता. अटलजींचे रक्तही स्वातंत्र्याच्या उर्मीने सळसळू लागले होते. वेळ पडली तर तुरुंगात जायची त्यांची तयारी होती. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याबद्दल अटलबिहारी वाजपेयी यांना २३ दिवस तुरुंगवास भोगावा लागला.

अटलजी ग्वाल्हेरच्या राणी लक्ष्मीबाई कॉलेजात इंग्रजी हिंदी व संस्कृत घेऊन शिकून बी.ए. पास झाले. त्यांना शिष्यवृत्तीही मिळाली. एम.ए चा अभ्यास करण्यासाठी ते कानपूरला आले. त्याच वेळी ते कायद्याच्या अभ्यासासाठी एल.एल.बी. शिकू लागले, परंतु त्याच वेळी स्वातंत्र्य चळवळीला वेगळेच वळण लागले होते. काही मुस्लिम बांधवांना वेगळे राष्ट्र हवे होते, अशा वेळी अटलजी सारखा राष्ट्रभक्त केवळ शिक्षणातच रमण्यासारखा नव्हता. त्यामुळे त्यांचे एल. एल.बी.चे स्वप्न अपूर्णच राहिले. एम. ए. पास झाल्यावर ते कानपूर सोडून लखनौला आले.

स्वातंत्र्याची चाहूल लागली. भारतमातेच्या पायातील गुलामगिरीच्या बेड्या निखळून पडतील, असे वाटू लागले. पण त्याचवेळी भारत मातेच्या लेकरांत हेवेदावे सुरू झाले. मला या घरात राहायचे नाही, मला माझा वाटा द्या, मी स्वतंत्रपणे राहील असे एका भावाने म्हणावे असे या सारखे झाले. हे भाऊ एकत्र नांदू शकणार नाही अशी भावना होताच, घराची वाटणी होऊन एका घराची दोन घरे व्हावी तशीच देशाची अवस्था झाली. अखंड भारत विभागला गेला. भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. देशभर दंगली, जाळपोळीला ऊत आला. कोणाचे प्राणी हिरावले गेले तर कोणाच्या घरादाराची राख झाली.

अटल बिहारींनी आपले एल.एल.बी आणि पीएच. डी. ची स्वप्न सोडून ते समाजाचे मनोधैर्य टिकवण्यासाठी व राष्ट्राच्या नवनिर्माण कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. लोकांच्या मनात राष्ट्राभिमान, धर्माभिमान, राष्ट्रीय अस्मिता आणि सामाजिक बंधुभाव वाढवण्यासाठी तसेच आपली संस्कृती आपल्या परंपरा जनमाणसात रुजवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले.

त्यानंतरच्या काळात ते 'राष्ट्रधर्म' नावाच्या मासिकाचे ते संपादक झाले. गांधीजींची हत्या झाल्यावर संघावर सरकारने बंदी घातली. राष्ट्रधर्माच्या कार्यालयाला टाळे लागले. दीनदयाळ उपाध्याय यांना सरकारने अटक केली तेव्हा अटलजी भूमिगत झाले. भूमिगत राहून ते संघाचे कार्य करू लागले, अतिशय हलाखीत त्यांचे दिवस जात होते तरी त्यांनी घेतलेला वसा सोडला नाही. राष्ट्रकार्याच्या उच्च भावनेने प्रेरित झालेल्या अटलजींना टाकीचे घाव सोसावे लागत होते परंतु राष्ट्र उभे करण्यासाठी, संस्कृतीचे जतन संवर्धन करण्यासाठी अटलजींनी जणू सतीचे वाण घेतले होते.

'जानवे माझ्यात आणि इतर हिंदूंत भेदभाव निर्माण करते' असे अटलजींचे विचार होते म्हणून त्यांनी जानव्याचा त्याग केला. जात-पात, भेदभाव, दुजाभाव अशा विचारांपासून अटलजी नेहमीच दूर राहिले.

**हम पडाव को समाझे मंजिल।**
**लक्ष्य हुआ आँखो से ओझल।**
**वर्तमान मोहजाल में।**
**आने वाला कल न भुलाएँ ।**
**आओ फिर से दिया जलाएँ।**

अर्थात चुकीचा समज झाल्यामुळे योग्य ठिकाणी जाण्याऐवजी भलतीकडेच जावे असे आयुष्यात कधीतरी घडते. त्यामुळे आपले ध्येय दूर गेल्यासारखे वाटते, म्हणून काय झाले? मोहात गुंतले की असेच होते. तरी मोहात न गुंतता भ्रमात न राहता, उज्वल भविष्य विसरू नये. विझलेले दिवे पुन्हा प्रकाशित करता येतात. वाट चुकलेल्या मनाला आवरून जीवनात नवा प्रकाश निर्माण करा. असे अटलजी आपल्या कवितेतून जीवनाचे तत्वज्ञान सुंदर रीतीने सांगतात.

पत्रकार तसेच उत्तम नेता असलेल्या अटलजींचे भाषण म्हणजे जणू मोहिनी, लोकांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचणारे दुसऱ्या बद्दल आदर वाढवतील असे त्यांचे शब्द असायचे. कधी काव्यपंक्ती तर कधी हलका विनोद , राष्ट्रभक्ती-राष्ट्रप्रेम त्यांच्या शब्दाशब्दांतून जाणवत असे.

सत्य विचार लोकांच्या घशाखाली उतरत नसतात, पण अटलजींच्या हतोटीच वेगळी! कडु गोळी साखरेचे आवरण घालून द्यावी तसे त्यांचे शब्द गोड साखरेसारखे! आपल्या गुणवैभवामुळे एक



असामान्य फर्डे वक्ते म्हणून अटलजी नावारूपास आले.

दिल्लीला आल्यावर त्यांची आणि जनसंघ या नव्या पक्षाची स्थापना केलेले राष्ट्रीय नेते श्यामाप्रसाद मुखर्जी यांची ओळख झाली. श्यामाप्रसादजींना हुशार आणि राष्ट्रप्रेमी मदतनीसाची गरज होती. अटलजी त्यांना मदत करू लागले, त्यामुळे अटलजींच्या आयुष्याचा सांधा बदलला त्यांच्या आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळाली. १९५७ साली लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. अटलजी निवडणुकीला उभे राहिले. सायकलवरून प्रचार करत, लोकांच्या अडीअडचणी समजावून घेण्यामुळे ते लोकसभेला निवडून आले. त्यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली. राजकारण करायचे, ते जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी; केवळ मिरवण्यासाठी नव्हे, अशी अटलजींची विचारसरणी होती. आपल्या कार्याने आणि हजरजबाबीपणा मुळे ते लोकसभेत आपली छाप पाडू लागले. १९५८ साली अटलजी जनसंघाचे अध्यक्ष झाले. देशाच्या तळा-गाळातल्या लोकांपर्यंत जाऊन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे प्रश्न सोडवण्याला त्यांनी प्राधान्य दिले. देशाच्या कामासाठी त्यांनी सरकारला नेहमीच पाठिंबा दिला. जेव्हा जेव्हा देशाच्या हिताविरुद्ध व जनतेच्या हिताविरुद्ध सरकारची पावले पडू लागली तेव्हा त्यांनी आपल्या धारदार भाषणांनी सरकारला त्यांच्या चुका दाखवून दिल्या. शेतीविषयी, परराष्ट्रसंबंध, उद्योगधंदे, अर्थसंकल्प अशा विविध विषयांवर त्यांचा गाढा अभ्यास होता. आपल्या सुंदर भाषणांनी अटलजींनी देशाच्या संसद सभागृहावर कायमचा ठसा उमटवला. सर्वोत्कृष्ट संसदपटू म्हणून अटलजींच्या गौरव झाला आहे. १९७७ साली देशात प्रथमच विरोधी पक्षाचे जनता सरकार सत्तेवर आल्यावर मोरारजी देसाई पंतप्रधान झाले तर अटलजी प्रथम देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणून काम करू लागले. जगभरात त्यांनी भारताबद्दल विश्वास निर्माण केला. एक खरा मित्र अशी भारताची प्रतिमा परदेशात निर्माण केली. चिघळत पडलेले अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले. अनेक देशांना भेटी देऊन मित्रत्वाचे संबंध जोडले. अटलजी परराष्ट्रमंत्री असताना संयुक्त राष्ट्रसंघात भाषण करण्याची संधी मिळाली असता कडव्या देशप्रेमी अटलजींनी हिंदीतून भाषण करून हिंदी भाषेचा ध्वज प्रथमच राष्ट्रसंघात फडकवला.

१९९६ साली पंतप्रधान पद त्यांच्याकडे चालून आले; परंतु त्यावेळी त्यांना या पदावर जास्त काळ काम करता आले नाही. १९९९ साली ते पुन्हा भारताचे पंतप्रधान म्हणून निवडून आले. पंतप्रधानपदावर येताच त्यांनी आपला देश बहुधर्मी असून सर्व धर्म समान आहेत, तेथील विविध धर्मांची प्रार्थनास्थळे ही आपल्या निधर्मी परंपरेचे प्रतीक असून हि परंपरा जपण्याचा आग्रह केला. देशाचा सर्वांगीण विकास, भूक, भय आणि भ्रष्टाचार हे देशापुढिल महत्त्वाचे प्रश्न दूर करण्याचे शक्य ते प्रयत्न करत लोकांना दिलासा दिला. भारतातील गरिबी दूर करण्याचे मोठे आव्हान त्यांनी स्वीकारले ग्रामीण भागात नवे उद्योग-धंदे, शेतीची सुधारणा, सरकारी मदत गोरगरिबांपर्यंत पोहोचण्याची योजना करून त्यांनी काम केले. देशातील अशिक्षित लोकांना साक्षर करणे, अन्नधान्याचे उत्पादन वाढवणे, स्वदेशी वस्तूंबद्दल जनतेच्या मनात प्रेम निर्माण करणे, गरिबांसाठी घरे बांधणे अशा अनेक लोकोपयोगी कामे त्यांनी सुरू केली.

अटलबिहारी वाजपेयीजी पंतप्रधान असतांना भूमिगत अणुचाचण्या करून आपल्या देशाला अणुशक्ती संपन्न देश बनवले. या धाडसी पावलामुळे आपल्या देशाला एक वेगळी ओळख दिली. १०० वर्षांहून अधिक जुना कावेरी पाण्याचा वाद अटलजींच्या सरकारमध्ये मार्गी लावल्या गेला.

भारत पाकिस्तान मधील परस्पर संबंध सुधारण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला, दिल्ली ते लाहोर बससेवा सुरू केली. दुःखद घटनेने व्याकुळ होणारे अटलजी कविमनाचे असले तरी प्रसंगी कणखर बनत. १९९९ मध्ये पाकिस्तानी लष्कर आणि दहशतवाद्यांनी कारगिल परिसरात केलेल्या घुसखोरीला प्रत्युत्तर म्हणून अटलबिहारीजींच्या सरकारने ठोस पावले उचलली आणि भारतीय लष्कराला उघडपणे पाठिंबा दिला. त्यामुळे आपल्या सैन्याने पाकिस्तानी सैनिकांना हुसकावून लावले.

५० वर्षांपेक्षा जास्त वर्षे राजकारणात असल्यावरही अटलजी कमलपुष्पाप्रमाणे चरित्रवान होते. ते हिंदुत्ववादी असले तरी त्यांचा दृष्टिकोन नेहमी मानवतावादीच राहिला आहे. सुसंस्कृत व शिस्तप्रिय असलेले अटलजी विनोदी कोट्या करून ते गंभीर वातावरणातील ताण हलका करत लोकहितवादी अटलजींना जनतेच्या मनात सदैव व आदराचे स्थान प्राप्त झाले आहे. निर्भय वृत्ती, कमालीचा आत्मविश्वास आणि आशावादी मनोवृत्ती हीच अटलजींची खरी ओळख आहे. अटलजी म्हणत 'आदमी की पहचान उसके पद से या धन से नहीं होती, उसके मन से होती है, मन की फकीरी पर तो कुबेर की संपदा भी रोती है।'

आपल्या जीवनकाळात अटलजी ३ वेळा पंतप्रधान झाले. देशातील ६ राज्यांतील वेगवेगळ्या लोकसभा मतदारसंघातून विजयी झालेले ते एकमेव नेते होते.

# मोहम्मद रफी : मोठ्या मनाचा माणूस




सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

**मोहम्मद रफी पंजाब मधील अमृतसर जिल्ह्यातील सध्याच्या मजिठा जवळील कोटला सुलतान सिंग गावचे होते. हाजी अली मोहम्मद यांना जन्मलेल्या सहा भावांपैकी दुसऱ्या क्रमांकाचे मोहम्मद रफी हे होत. त्यांनी आपल्या मूळ गावी कोटला सुलतान सिंगच्या रस्त्यावर फिरणाऱ्या फकीराच्या गाण्याचे अनुकरण करून गाणे सुरू केले आणि चित्रपट सृष्टीतील "तानसेन" बनले. मोहम्मद रफी हे भारतीय उपखंडातील महान आणि प्रभावी गायकांपैकी एक मानले जातात. त्यांच्या आवाज, अष्टपैलुपणा आणि श्रेणीसाठी उल्लेखनीय होते; त्यांच्या गाण्यांमध्ये वेगवान पेपी नंबर ते देशभक्तीपर गीते, दर्द असणारी गाणी , अत्यंत रोमँटिक गाणी , कव्वाली ते गझल आणि भजनांमध्ये शास्त्रीय गाणी अशी विविधता होती.**

मुकेश, किशोर, रफी हे समकालीन गायक. गायकीच्या बाबतीत या तिघात कधीच तुलना होऊ शकत नाही. स्वभावाबद्दल बोलायचे झाले तर रफी कधी ही उजवे पडतील. मोहम्मद रफी हे खूप चांगल्या, मोठ्या मनाचे, शांत, लाजरे आणि विनम्र होते. आपल्यामुळे कुणाला त्रास होईल, असे ते कधीच वागले नाहीत. ते आपल्या सहकाऱ्यावर कधीच चिडले नाहीत उलट समजून घेतले आहेत. अशीच एक घटना आहे मनहर उदास बाबतीत. शशी कपूर अभिनित फिल्म "राजाबाबू" च्या गाण्याचे रेकॉर्डिंग चालू होते आणि कोरस मध्ये मनहर उदास होते. दोन तीनदा टेक झाल्यानंतर रफीच्या सांगण्यावरून संगीतकार कल्याणजी आनंदजी यांनी मनहर उदासला कोरस मधून बाहेर काढलं. मनहर उदासला काय झालं काहीच कळेनासं झालं. जेंव्हा रफी गाणं रेकॉर्डिंग करून निघाले तेंव्हा कल्याणजी आनंदजी कडून मनहर उदासला कळलं की रफीला त्याचा आवाज आवडल्यामुळे याच गाण्यातला एक अंतरा गाण्यासाठी मनहर उदाससाठी रफीने ठेवला आहे आणि निघते वेळेस कल्याणजी आनंदजीला सांगितले की याचा आवाज कोरससाठी नाही. अशाप्रकारे मोहम्मद रफी कडून मनहर उदासला पार्श्वगायक म्हणून पहिली सुवर्णसंधी मिळाली ते ही रफी सोबत गायनाची. मोहम्मद रफी हे चांगल्या कलाकाराचे कदरदान होते. पुढे जाऊन मनहर उदास हे मोठे गायक बनले, हे आपल्याला माहीतच आहे.

मोहम्मद रफी यांचे व्यक्तिमत्व खूप शांत, संयमी आणि विनम्र होते. जेंव्हा त्यांचे निधन झाले. तेंव्हा आक्खी चित्रपटसृष्टीच्या डोळ्यात अश्रू होते. एवढ्या स्वच्छ मनाचा माणूस क्वचितच चित्रपटसृष्टीला पाहायला मिळाला असेल. जितेंद्र यांची निर्मिती असलेला "दीदार ए यार" चित्रपट फ्लॉप झाल्याने जितेंद्र मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला होता. तेंव्हा मोहम्मद रफीने "दीदार ए यार" चित्रपटातील गायनातून मिळालेला आपला मोबदला जितेंद्र यांना परत केला होता. चित्रपटसृष्टीत असा एकमेव कलाकार असेल, ज्यांनी आपला मोबदला परत केला असेल. अशा बऱ्याच आर्थिक अडचणीत आलेल्या निर्मात्याच्या पाठीशी मोहम्मद रफी उभे राहिले. रॉयल्टी वरून असाच एक वाद मोहम्मद रफी आणि लता मंगेशकर यांच्यात झाला होता. मोहम्मद रफी हे निर्मात्याची बाजू घेत होते तर लता मंगेशकर ही गायकाची बाजू घेत होत्या. मोहम्मद रफी यांचं म्हणणं होतं की निर्माता हा चित्रपट बनविण्यासाठी आर्थिक जोखीम घेत असतो. गायकाला आपले मानधन मिळालेले असते. त्यामुळे परत निर्मात्याच्या नफ्यात वाटा मागणे योग्य नाही. निर्मात्याकडून जाण्यासाठी ठरलेले मानधन मिळाल्यानंतर इतर पैशावर आपला हक्क राहत नाही अशी भूमिका मोहम्मद रफी यांची होती तर गायकांच्या नावामुळेच रेकॉर्ड विकले जातात म्हणून त्या गाण्याच्या नफ्यातून अर्धा वाटा गायकाला मिळावा अशी भूमिका लता मंगेशकर यांची होती. यासाठी रफी यांनी समर्थन द्यावे अशी त्यांची इच्छा होती पण रफी यांनी समर्थन नाही दिले. त्यावेळी रफी हे चित्रपट क्षेत्रातील अग्रगण्य गायक होते. चित्रपट क्षेत्रातील "तानसेन" म्हणून त्यांची ओळख होती. त्यावेळी ते दिलीप कुमार, देवानंद, शम्मी कपूर, राजेंद्र कुमार यांच्यासाठी गाणे गायचे.



मोहम्मद रफी पंजाब मधील अमृतसर जिल्ह्यातील सध्याच्या मजिठा जवळील कोटला सुलतान सिंग गावचे होते. हाजी अली मोहम्मद यांना जन्मलेल्या सहा भावांपैकी दुसऱ्या क्रमांकाचे मोहम्मद रफी हे होत.

त्यांनी आपल्या मूळ गावी कोटला सुलतान सिंगच्या रस्त्यावर फिरणाऱ्या फकीराच्या गाण्याचे अनुकरण करून गाणे सुरू केले आणि चित्रपट सृष्टीतील "तानसेन" बनले. मोहम्मद रफी हे भारतीय उपखंडातील महान आणि प्रभावी गायकांपैकी एक मानले जातात. त्यांच्या आवाज, अष्टपैलुपणा आणि श्रेणीसाठी उल्लेखनीय होते; त्यांच्या गाण्यांमध्ये वेगवान पेपी नंबर ते देशभक्तीपर गीते, दर्द असणारी गाणी , अत्यंत रोमँटिक गाणी , कव्वाली ते गझल आणि भजनांमध्ये शास्त्रीय गाणी अशी विविधता होती. एखाद्या अभिनेत्याच्या व्यक्तिरेखेवर आणि शैलीनुसार आपला आवाज काढण्याच्या क्षमतेसाठी, चित्रपटात स्क्रीनवर गाण्याचे लिप-सिंक करून दाखवणासाठी प्रसिद्ध होते. त्यांनी हिंदी भाषा, उर्दू, पंजाबी, मराठी आणि तेलुगू भाषांमधून गाणी गायली, पण ते आपल्या हिंदी चित्रपटांतील गाण्यांसाठी अतिशय प्रसिद्ध आहेत. त्यांची गाणी भारतात, तसेच भारताच्या बाहेर स्थायिक असलेल्या भारतीयांमध्ये लोकप्रिय आहेत. त्यांनी दिलीप कुमार, देवानंद शम्मी कपूर राजेंद्र कुमार राजेश खन्ना धर्मेंद्र अमिताभ बच्चन जितेंद्र अशा जवळपास सगळ्याच सुपरस्टार ना रफीचा आवाज मिळाला. तसेच एस. डी. बर्मन, शंकर जयकिशन, रवी, मदन मोहन, कल्याणजी आनंदजी, लक्ष्मीकांत प्यारेलाल, आर डी बर्मन अशा नामवंत संगीतकारासोबत त्यांनी काम केलं.

मोहम्मद रफी यांच्या स्वच्छ चांगल्या स्वभावामुळे संपूर्ण चित्रपटसृष्टी तर रडलीच पण त्यांच्या शत्रूंच्याही डोळ्यात अश्रू आले, अशा या चांगल्या आणि मोठ्या मनाच्या माणसाला माझा सलाम.

# तिरंगा ध्वज, संघ आणि स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ।



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी हे तर आमचे राष्ट्रीय सण आणि त्यामुळे त्या दिवशी ध्वज उंच उंच आकाशात फडकताना सर्वांचा उत्साह द्विगुणित होतो आणि या वर्षी तर अधिक उत्साहाचे वातावरण आहे. काहीजण याने का दुःखी होत आहेत? खरोखर संशोधनाचा विषय आहे! काहींचे म्हणणे लोकांना घरे नाही ध्वज कुठे उभारणार? देशाला स्वातंत्र्य मिळल्यावर ज्यांनी सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली, त्यांचे हे अलीकडेच नवीन मित्र आहेत आणि तो प्रश्न त्यांना ते विचारण्याचे धाडस करू शकत नाहीत म्हणून या प्रेरणादायी कार्यक्रमाला अपशकुन करत आहेत की काय अशी शंका घ्यायला जागा आहे. काही जणांना यामुळे आपला जणू रॉयल्टी असलेला राजकीय धंदा संपल्याचा भास होत आहे त्यामुळे इतर वेळी चिनी मालावर बहिष्काराला स्वदेशीचा संघीय कार्यक्रम म्हणून हिणवणारे ध्वज हा चीन मधून येतो आहे असे सांगत काळजी करत आहेत. काँग्रेसचा खानदानी आणि पारंपरिक अधिकार हिरावला जातो आहे अशी राजपुत्राला काळजी पडली आहे म्हणून ट्विट करून मोदींजींच्या हेतुबद्दल शंका उपस्थित करत आहे. या सगळ्यात काही जणांना विनाकारण संघाला यात ओढायचे आहे. संघाने स्वातंत्र्य लढ्यात काय योगदान दिले हा एक नेहमीचा प्रश्न विचारण्यात येत आहे आणि दुसरा प्रश्न असतो संघाच्या कार्यालयावर राष्ट्रध्वज कधी फडकणार? यातील काही जण खरोखरच अज्ञानी आहेत तर काहींना मुद्दाम बुद्धिभेद निर्माण करायचा आहे . मुळात संघ सुरू झाला त्यावेळी प्रत्येक संघटनेचा जसा स्वतंत्र ध्वज त्याची ओळख असते त्या प्रमाणे भगवा ध्वज हा संघाची ओळख बनला . त्यावेळी राष्ट्रध्वज कुठला हे ठरले नव्हते पण काँग्रेस ही स्वातंत्र्याची आम चळवळ बनल्याने त्या संघटनेचा ध्वज हा राष्ट्रध्वजा इतकाच सन्मानित होता.**

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव दोन दिवसांवर आला आहे. देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री श्री नरेंद्रजी मोदी यांनी तीन दिवस सर्वांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवण्याचे आवाहन केले आहे आणि मोदींजींच्या या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद लोक देताना दिसत आहेत. देशात जणू चैतन्याची लाट सर्वत्र पसरली आहे. तिरंगा यात्रा, तिरंगा सेल्फी पॉईंट आशा उपक्रमात तरुणाई उत्साहाने भाग घेत आहे. प्रोफाइल फोटो म्हणून सोशल मीडियात विविध पद्धतीने लोक अभिमानाने तिरंगा ध्वज ठेवत आहेत. ध्वज हे हजारो वर्षापासून मनुष्य समूहाचे एक प्रतीक राहिले आहे. सुरुवातीला जमाती, टोळ्या मग त्यातून राज्य , राष्ट्र असा प्रवास करीत मानव समूह स्थिरावला आणि राष्ट्राच्या प्रतिकात ध्वजाला महत्वाचे स्थान मिळाले. युद्ध , खेळ या प्रसंगात ध्वज अभिमानाने उंचावताना लोकांचे उर भरून येताना आपण बघतो अगदी दुसऱ्या ग्रहावर जाताना पण देशाचा अभिमान ध्वजाच्या रुपात व्यक्त होताना आपण बघतो.

आमच्या देशात पण, प्राचीन इतिहासात वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या राज्यात ध्वज असायचे ते बहुसंख्य केसरिया, भगवे किंवा जरी पटका असे असायचे. त्या ध्वजावर चिन्ह किंवा मुद्रा या मात्र वेगवेगळ्या जनपदांच्या असायच्या. छत्रपती शिवराय किंवा राणा प्रताप किंवा कृष्णदेवराय कमी अधिक फरकाने भगवा हाच ध्वज त्यांचा होता. देशाच्या स्वातंत्र्याच्या निर्णायक लढाई नंतर देशाचा ध्वज अशोक चक्र असलेला तिरंगा नक्की झाला आणि आम्ही राष्ट्रध्वज म्हणून तो स्वीकारला नव्हे त्याचा गौरव वाढवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केला. खेळ, कला, युद्ध या सर्व ठिकाणी भारताचा राष्ट्रध्वज भारतीयांनी उंचावण्याचा प्रयत्न केला. १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी हे तर आमचे राष्ट्रीय सण आणि त्यामुळे त्या दिवशी ध्वज उंच उंच आकाशात फडकताना सर्वांचा उत्साह द्विगुणित होतो आणि या वर्षी तर अधिक उत्साहाचे वातावरण आहे.

काहीजण याने का दुःखी होत आहेत? खरोखर संशोधनाचा विषय आहे! काहींचे म्हणणे लोकांना घरे नाही ध्वज कुठे उभारणार? देशाला स्वातंत्र्य मिळल्यावर ज्यांनी सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली, त्यांचे हे अलीकडेच नवीन मित्र आहेत आणि तो प्रश्न त्यांना ते विचारण्याचे धाडस करू शकत नाहीत म्हणून या प्रेरणादायी कार्यक्रमाला अपशकुन करत आहेत की काय अशी शंका घ्यायला जागा आहे. काही जणांना यामुळे आपला जणू रॉयल्टी असलेला राजकीय धंदा संपल्याचा भास होत आहे त्यामुळे इतर वेळी चिनी मालावर बहिष्काराला स्वदेशीचा संघीय कार्यक्रम म्हणून हिणवणारे ध्वज हा चीन मधून येतो आहे असे सांगत काळजी करत आहेत. काँग्रेसचा खानदानी आणि पारंपरिक अधिकार हिरावला जातो आहे अशी राजपुत्राला काळजी पडली आहे म्हणून ट्विट करून मोदींजींच्या हेतुबद्दल शंका उपस्थित करत आहे. या सगळ्यात काही जणांना विनाकारण संघाला यात ओढायचे आहे. संघाने स्वातंत्र्य लढ्यात काय योगदान दिले हा एक नेहमीचा प्रश्न विचारण्यात येत आहे आणि दुसरा प्रश्न असतो संघाच्या कार्यालयावर राष्ट्रध्वज कधी फडकणार? यातील काही जण खरोखरच अज्ञानी आहेत तर काहींना मुद्दाम बुद्धिभेद निर्माण करायचा आहे . मुळात संघ सुरू झाला त्यावेळी प्रत्येक संघटनेचा जसा स्वतंत्र ध्वज त्याची ओळख असते त्या प्रमाणे भगवा ध्वज हा संघाची ओळख बनला . त्यावेळी राष्ट्रध्वज कुठला हे ठरले नव्हते पण काँग्रेस ही स्वातंत्र्याची आम चळवळ बनल्याने त्या संघटनेचा ध्वज हा राष्ट्रध्वजा इतकाच सन्मानित होता.

संघाचे पूजनीय संस्थापक सरसंघचालक डॉक्टर हेडगेवार हे स्वतः काँग्रेसचे कार्यकर्ते. अनुशिलन समितेचे सदस्य होते. त्यांच्या स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य किंवा स्वकीय ,परकीय याबद्दल काही ठाम कल्पना होत्या . त्यांचे मूलभूत चिंतन होते आणि केवळ इंग्रज येथून जाऊन नव्हे तर आपण मानसिक दृष्ट्या पण स्वतंत्र झालो पाहिजे हा त्यांचा आग्रह होता आणि जे या भूमीसाठी लढतील ते सगळेच हिंदू आणि बंधू ही त्यांची धारणा होती त्यामुळे त्यांचे संघटन महत्वाचे आहे हा त्यांचा विचार होता. त्यामुळे भगवा ध्वज हा राष्ट्रध्वज असावा असा संघाचा आग्रह होता . पण तिरंगा ध्वज राष्ट्रध्वज ठरवल्यावर त्याबद्दल सर्व स्वयंसेवकांच्या मनात नितांत श्रद्धा होती ,आहे आणि राहणार आहे . स्वातंत्र्याची दुर्दम्य आकांक्षा हाच संघस्थापन करण्यामागचा प्रेरणा स्रोत होता आणि म्हणूनच डॉक्टर हेडगेवार यांनी संघ स्थापन केल्यावरही जंगल तोड सत्याग्रहात भाग घेतला होता . डॉक्टर मुंजे आणि अन्य सहकाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी होते. त्यांच्या मनातील स्वातंत्र्याची उर्मी अपघातातून आलेली नव्हती तर ती जन्मजात होती हे त्यांचे ज्यांनी चरित्र वाचले आहे त्यांना समजू शकेल.

देशासाठी काही करणे, त्यासाठी कारावास भोगणे किंवा अन्य हालअपेष्टा सहन करणे हे स्वतःच्या आईची सेवा करण्याइतके नैसर्गिक असावे त्याचा प्रचार करणे, त्याचे अवडंबर माजवणे किंवा तसे करून त्यातून काही लाभ मिळवणे ही संघाची कधीच कल्पना नव्हती. म्हणून स्वातंत्र्याचया चळवळीत सहभागी झालेले अनेक स्वयंसेवक अनामिक राहिले. त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात त्याचा कुठला लाभ पण घेण्याचा प्रयत्न केला नाही. किंबहुना शासकीय कार्यालय , शाळा , कॉलेज आणि अन्यान्य सार्वजनिक व्यवस्थेत जेथे जेथे राष्ट्रध्वजाचे आरोहण करण्यात येथे तेथे त्याचे पावित्र्य टिकवण्यात संघाचे स्वयंसेवकच पुढे असायचे, असतात हे उघड सत्य आहे . पण संघाने जपलेल्या तत्वज्ञानात त्याची प्रसिद्धी बसत नव्हती.



दादरा नगर हवेली, गोवा मुक्ती संग्राम , मराठवाडा मुक्ती संग्राम या सर्व आंदोलनात संघाचे कार्यकर्ते आघाडीवर होते. फाळणी च्या काळात आजच्या पाकिस्तानात हिंदु भगिनीना आधार केवळ संघाच्या कार्यकर्त्यांचा होता हे उघड सत्य आहे. (असे संघाच्या पद्धतीत बसत नाही , मीच फक्त मातृभक्त ! असे स्वयंसेवकाना कधीच वाटत नाही.) फाळणी नंतरही विस्थापित बंधूंच्या छावण्या चालवणारे संघ स्वयंसेवकच होते . काश्मीर वर झालेल्या आक्रमणात संघ स्वयंसेवकांनी केलेली मदत इतिहासाक्षी आहे. भारत -चीन युद्ध प्रसंगी अनेक स्वयंसेवक सैन्याच्या सेवेत काम करत होते . याने पंडित नेहरू , जनरल करिअप्पा पण प्रभावित झाले होते . लालबहादूर शास्त्री यांनी ६५ च्या युद्धात सर्वपक्षीय बैठकीत पूजनिय गुरुजी याना बोलावले होते आणि मार्गदर्शन घेतले होते . हे सगळे जे काही स्वातंत्र्य नंतरच्या कालखंडात करणारे स्वयंसेवक या देशावर प्रेम करण्याच्या संस्कारातूनच करत होते ना ? करत आहेत ना ? तिरंग्याला अभिमानाने फडकत राहण्यासाठीच हे सगळे आहे.

तिरंग्यासाठी प्राण अर्पण करणारे अगणित स्वयंसेवक कार्यकर्ते होते .पण संघावर बेलगाम आरोप करणारे , ' 'किसन राजपूत आणि फैजपूर अधिवेशन ' ही कथा सोयीस्कर पणे विसरतात किंवा त्यांना माहीत नाही . काँग्रेसच्या त्या अधिवेशनात ध्वज फडकवताना दोरीत अडकला आणि एक अरूण वयातील मुलगा तत्परतेने जीव धोक्यात टाकून पोल वर चढला त्याने ती गाठ सोडवली आणि तिरंगा दिमाखाने गगनात फडकू लागला. पंडित नेहरू यांनी पण त्याची पाठ थोपटली होती त्याला कुतूहलाने जेव्हा तुला ही प्रेरणा कुठून मिळाली? हा प्रश्न केला तेंव्हा त्याने संघशाखेतून ही प्रेरणा घेतली हे सहज पणे सांगितले.

जो पर्यंत काँग्रेस एक चळवळ होती, स्वातंत्र्याच्या आकांक्षेची प्रतीक होती तो पर्यंत अनेक तात्विक मतभेद असूनही अनेक जण स्वातंत्र्याच्या चळवळीत काँग्रेस व्यासपीठावरून सहभागी होत होते . स्वातंत्र्या नंतर काँग्रेस हा एक पक्ष बनला आणि स्वातंत्र्याचे श्रेय लाटताना क्रांतीकारकांचा सहभाग पण नाकारू लागला आणि मग त्यांचेच आजचे अनुयायी संघाला प्रतिप्रश्न विचारू लागले . त्यात ज्यांच्या वैचारिक प्रेरणाच परकीय आहेत असे डावे पण सामील होऊन ' होलियर दॅन दाऊ ' असा आव आणू लागले . संघाने याला कधी उत्तरे दिले नाहीत ! संघ व्यक्तिनिर्माणाचे अखंड काम करत राहिला . सकारात्मक दृष्टिकोनातून काम करताना स्वयंसेवकाने दिखाऊ भाव कधी जागवला नाही आणि त्यामुळेच आज समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात संघाचा स्वयंसेवक खऱ्या अर्थाने नेतृत्व करण्यास सिद्ध झाला.

या वर्षी अमृत महोत्सवाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचे नियम थोडे शिथिल झाल्यामुळे त्या राष्ट्रध्वजाचा छायेत तीन दिवस या ध्वजाला वंदन करताना बलिदान देणाऱ्या लक्षावधी क्रांतिकारकांची प्रेरणा जागवायची आहे . देशाच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी ला अखंड भारत पुन्हा निर्माण करण्याचा संकल्प सोडताना फाळणीच्या वेदना पण लक्षात ठेवून या आत्मनिर्भरतेच्या अमृत वर्षावात नाहून निघायचे आहे.

पक्षभेद, मतभेद, जातीभेद याच्या पलीकडे बंधुभाव जागवणारा एक सेतू आमच्यात विराजमान आहे. तो सेतू उभा करण्याचे संघ गेली ९७ वर्षे काम करत आहे. या निमित्ताने प्रतिप्रश्न विचारण्यापेक्षा देशात अस्तित्वात असलेली संघासारखी एक सकस वैचारिक, राष्ट्रीय चळवळ समजून घेण्यासाठी पण एक संधी म्हणून प्रामाणिक पणे चर्चा, विचार विनिमय करण्यासाठी पक्ष, जात, उपासना पद्धत्ती बाजूला ठेवून पुढे येण्याची गरज आहे.

अमृत महोत्सवी वर्षात वैचारिक विकृतीतून प्राकृतिक अवस्थेकडे जाऊ या आणि त्यातून भारतीय सांस्कृतिक राष्ट्रवाद जोपासू या ! बहुतेक तो परम प्रिय तिरंगा फडकत असताना आम्हाला हेच सांगत असेल ! त्यातील भगव्याचा त्याग, पांढऱ्या रंगातील समृद्धी आणि हिरव्या रंगातील पर्यावरण पूरक व्यवहार आम्ही जोपासला तर अशोक चक्राचा प्रभाव सम्पूर्ण विश्वाच्या आसमंतात पसरल्याशिवाय राहणार नाही ! गरज आहे त्यासाठी दृढ संकल्पाची !

# शोध नात्याचा!

आधुनिक केसरी

**रोज पहाटे उठल्या उठल्या बागेतील फुलांचे फोटो कौतुकाने टाकण्याची सवय लागली आहे. चांगली आहे का नाही ते आता कळेनासे झाले आहे. वाईट नक्कीच नाही. पण कधी कधी विचार करावा यावर असे वाटते. त्याचे असे झाले. परवा सकाळी एक मेसेज पाहिला "तू रोज पहाटे फुले पाठवतेस मला. ते मित्र म्हणून? एक आवडती व्यक्ती म्हणून? का एक साहित्यिक जाणकार म्हणून? "मी कधी या गोष्टीचा विचारच केला नव्हता कधी.एखाद्या व्यक्तीची ओळख होते. तीही फॉरवर्ड मेसेज पाठवते. आपणही काहीतरी पाठवत राहतो. कधी आपण लिहिलेलेही. त्यांचे अभिप्राय आपल्याला आवडतात. मग हे सुरूच राहते. यात आपल्याला आतून त्या व्यक्तीविषयी नक्की काय वाटते याचा विचार कुठे करतो आपण? तशी कधी गरजच वाटलेली नसते आपल्याला. काही व्यक्तिविषयी आपुलकी वाटते मनातून, अनेक कारणांमुळे. पण त्यासाठी नेमक्या नात्यावर शिक्कामोर्तब करणे गरजेचे असते काय? त्यासाठी मनाची चिरफाड करीत बसावे का? मनाची उकल करीत बसावे आणि हातात काहीच नाही लागले तर? त्या बिंदूवर सोडून नाही का देता येत स्वतः ला तसेच. पण नाही. काहींना नेमके नाते हवे असते. तर त्यांचे त्यांनी स्वतःतच शोधावे ना?**

काही प्रश्न जेव्हा आपणाला दुसऱ्यांना विचारावे वाटतात तेव्हा आपण आपले स्वतः चे आणि समोरच्या व्यक्तीचे वय विचारात घ्यावे आधी. कारण आपल्या बरोबर त्या प्रश्नाचे वय ही वाढत जाते. आणि वयस्कर प्रश्नांमधे काही अर्थच उरलेला नसतो. हो खरंच नसतो. नात्याबाबत तरी. सगळीच नाती विस्तारून एकाच बिंदूवर येऊन थबकतात. आता माझ्याबरोबर ते प्रश्नही वयस्कर झालेत. काठी टेकत त्यांची उत्तरे शोधायला आत बाहेर डोकवायचे तर कसरतच करत बसावी लागेल. आणि तो आटापिटा करूनही हाती काहीच लागले नाही तर कशासाठी तो आटापिटा करायचा मग? मन शरीर अजुनही ताजे तवाने जरी वाटत ही असेल वरून तरी शरीर आतून सूचना देतच असते त्याच्या वयाची आणि पर्यायाने त्याच्या मर्यादेची.


म्हणून आता असले प्रश्न कुणी कुणाला विचारू नयेत आणि विचारले तर नेमक्या उत्तराची अपेक्षा कुणी कुणाकडून करू नये. हेच रास्त ठरेल.

एक आपुलकीचे नाते असतेच की. किमती. ते महत्वपूर्ण नसते का कधी? उगाच तिऱ्हाईत व्यक्तीविषयी आपुलकी आपणास वाटते का? नाही असे कधीच होत नाही. ज्यांच्याविषयी वाटते ती खासच असतात आपल्यासाठी. मग एक हे आपुलकीचे नाते पुरेसे नसते काय पडावं टाकायला कुठेही? एकदा भावविव्हल अवस्थेत नेमका मला त्याचं व्यक्तीला फोन करावा वाटला होता. आणि मी बराच वेळ बोलत राहिले काहीसे असंदिग्ध. वाटले होते त्यांना ही माझी अवस्था कळेल. एक साहित्यिक म्हणून तरी. माझे भावविश्व व्यापून टाकणारी व्यक्ती या जगात अस्तित्वात आहे ही जाणीव माझ्या लिखाणातून, बोलण्यातून त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा तो माझा असफल प्रयत्न होता तर! काही हरकत नाही. कित्येक असे प्रयत्न वांझ ठरतात.

पण मी पराभूत झाल्याची जाणीव आज मला छळते आहे प्रामुख्याने. ते एकच.. नाते फक्त महत्त्वाचे असते काय? त्याचाच जोगवा माणसं आयुष्यभर मागत फिरतात काय? कधी याला तर कधी त्याला? हे असेच चालू राहणार काय माणसाच्या अंतापर्यंत? आदिमानवाच्या अवस्थेतून आपण बाहेर पडलोच नाही काय अजून?

अनेक प्रश्न मलाच डंख मारतायत आज हे. पण दुसऱ्या बाजूने विचार केला तर वाटते आहे इतरांना काय वाटते याचा विचार करून कशाला आपण आपल्याला जाळत रहायचे आहे आणखी स्वतः ला. माझी मुलगी लहान असताना मला तिने प्रश्न विचारला होता एकदा, "आई, जळून जे मरतात त्यांना पुन्हा अग्नी देतात का ग शेवटी?" आज मला हा प्रश्न पडलाय पुन्हा माझ्याच बाबतीत. ही अनेक जीवंत मरणं भोगून झालीत माझी. आता त्या चितेची भिती नाही उरली मनात. राख सतत साठत राहते आहे मनात तिचे काय करायचे एवढाच गहन प्रश्न उरला आहे आजतरी मनात.

विधिज्ञा शुभदा कुलकर्णी





श्रावण गिरी
संपर्क क्र : ९५२७५४०१६८

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होताना...

आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्य लढयातील सैनिक, हुतात्मे, महात्मे, साहित्यिक, विचारवंत आणि समाजसेवक या सर्वांनी देशनिष्ठा जागवत, प्रसंगी प्राण्यांच्या आहुती देत स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात स्वतःला झोकून दिले. बाराशे वर्षे किंबहुना त्याहून अधिक काळ मुघलांनी, सुमारे दिडशे वर्षे ब्रिटिशानी, काही काळ डच, पोर्तुगीज आदी विविध राजसत्तांनी भारतावर राज्य करीत पारतंत्र्याच्या गुलामीत लोटून अन्याय, अत्याचार केले.**

स्वातंत्र्याचे हे समर सुरु झाले १८५७ साली. राणी लक्ष्मीबाईंचे दत्तक विधान नामंजूर करुन झाशी संस्थान ब्रिटीश राज्यात विलीन करण्यात आले. लॉर्ड डलहौशी यांनी तसा फतवाच काढला. मेरी झांशी नही दूंगी, या शब्दात राणी लक्ष्मीबाई यांनी या निर्णयाला विरोध दर्शविला. तात्या टोपे, नानासाहेब पेशवे बहादूर शहा, अवधचा नवाब आदींसोबत विचार विनिमय करून राणी लक्ष्मीबाईंनी बंड केले. पुढील काळात आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, भगतसिंग राजगुरू, सुखदेव, चाफेकर बंधु, लाला लचपतराय, बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आदींनी या आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला. प्रत्यक्ष १९४७ ला आपला देश स्वतंत्र झाला असला तरी हुतात्म्यांच्या त्यागाची, बलिदानाची खूप मोठी परंपरा त्यामागे आहे. १९४२ च्या चले जाव घोषणेने ही चळवळ पुन्हा पेटली. गोवालिया टैंक मैदानावरील 'करेंगे या मरेंगे' घोषणेतून गांधीजींनी प्रत्येकाला नेता बनण्याचे आवाहन केले. परिणामी भल्या पहाटे बिर्ला हाऊसमधून गांधीजींसह कस्तुरबा, महादेव देसाई, मिराबेन यांना ताब्यात घेण्यात आले.

महात्मा गांधी आणि त्यांच्यावरील दृढविश्वासाने साहेबांच्या गाडीसमोर आडवे होऊन प्राण त्यागणारे हुतात्मा बाबु गेणू ही मंडळी राजकीय स्वातंत्र्यासाठी लढली. एकीकडे हा मुक्तीचा लढा सुरु असतानाच राजाराम मोहन रॉय, म.जोतिबा फुले, न्या.महादेव गोविंद रानडे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी सामाजिक समतेसाठी केलेले कार्यही अत्यंत प्रेरक आहे. भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही कारगील युध्द असो वा संसद भवनावर आणि इतर बॉंबस्फोट प्रकरणात आणि देशाचे संरक्षण करताना तैनात असलेला शूर राष्ट्रभक्तांना मी अभिवादन करतो.

**महापुरुषांची गाऊ गाथा**
**आदराने टेकऊ माथा**
**सैनिक आम्ही या देशाचे**
**एकसंघ भारताचे**

याचे भान ठेऊन आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना हुतात्म्यांच्या स्मृती जागवायच्या आहेत. पुढच्या पिढीला त्यातून प्रेरणा मिळतील, हे निर्विवाद आहे. या नेत्यांनी भारतीय माणसांची गरिबी, लाचारी, अन्यायी जीवन आणि दमकोंडी पाहिली होती. आपला स्वाभिमान जपत स्वातंत्र्याचा श्वास घेण्यासाठी या विचारवंतांनी अहोरात्र कार्य केले. महात्मा गांधीसारख्या निधड्या छातीच्या युगपुरुषाने विनाशस्त्र बंदुकधारी राजसत्तेला नमवले. त्यावेळी कॉंग्रेस अधिवेशनातील जवळपास सर्वच नेत्यांना अटक झाली. महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, महादेव भाई देसाई आणि मिराबेन यांना गुप्त ठिकाणी हलवले तरी ते जनतेला कळले. गाधीजींना आगाखान पैलेसमध्ये, नेहरू, पटेल, आझाद यांना अहमदनगर येथे पाठवण्यात आले. त्यामुळे जनता भडकली. जाळपोळ, लाठीचार्ज, अश्रुधूरांनी वातावरण



धुमसत-पेटत होते. ब्रिटिश सत्तेच्या विरोधात जनआंदोलन चांगलेच पेट घेत होते. शंकर दयाळ मिश्रा यांनी मोडेल पण वाकणार नाही, अशी ताठर भूमिका घेतली. ब्रिटिशांनी मिश्रांना अटक केली. काही दिवसातच त्यांचा मृत्यू झाला. हा सर्व इतिहास स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना डोळ्यापुढून सरकता सरकत नाही.

**व्यर्थ न हो बलिदान**

भारतीय स्वातंत्र्याची मागणी केली आणि ते पदरात पडले इतक्या सहज मिळालेली ही उपलब्धी नाही. त्या अग्नी दिव्यातून गेलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करतांना आपले हक्क, कर्तव्य आणि देशाप्रती आदरभाव तितकाच महत्त्वाचा आहे. मला काय वाटते यापेक्षाही चूक थांबवण्यासाठी माझे योगदान काय, हे अधिक महत्त्वाचे आहे. प्रेयसीला विमान भेट देणाऱ्या श्रीमंतीचं प्रदर्शन सुरु असतानाच किती लोकांना राहायला स्वतःचे घर आहे, हे पाहण्याची गरज आहे. गगनचुंबी इमारतीच्या बाजूला झोपडपट्टीही दिसते. कोणी उपासपोटी तर कोणी अवकाशात स्पेस शोधतो आहे. कित्येकांच्या अन्न, वस्त्र, निवारा; या मुलभूत गरजा पूर्ण होत नाहीत. तर कोणी संपत्तीचा हिशोब लपविण्याचा आटापिटा करतोय. सर्वत्र ही भयावह विषमता पहायला मिळते. प्रत्येक जातीच्या नावाने, धर्माच्या नावाने प्रतिनिधित्व करीत मत-मतांतरे मांडत आपला दबाव गट निर्माण करणारी मंडळी सर्वत्र दिसते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही मूलभूत प्रश्न मिटले नाहीत. हे सुरु असताना स्वातंत्र्य प्राप्तीनंतर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांना यह आझादी झूठी है, देश की जनता भूखी है म्हणत मोर्चा काढावा लागला, हे वास्तव विसरता येणार नाही.

मूल्य व्यवस्थेसमोर आजही अनेक आव्हाने उभी आहेत. १९४७ च्या फाळणीची वेदना आपण पाहिली. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश ब्रम्हदेश आदींना तुटून स्वतंत्र होताना पाहिले. धर्म-जातीसाठी मर मिटेंगे म्हणणारांसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना "या भारतात नित्य बंधुभाव वसू दे, दे वरची असा दे", अशी प्रार्थना लिहावी लागली. भारत हा कोणत्याही भेदाविना अर्थात कोणत्याही धर्म जाती प्रांतांच्या समान अधिकाराचा स्वीकार करणारा देश आहे. सौहार्द जपणारा शांतताप्रिय असा हा देश आहे. परंतू वाढत्या स्वार्थी वृत्तीमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हा देश हुकूमशहाच्या स्वाधीन होऊन, गुलामगिरीच्या गर्तेत जातो की काय, असे भयानक चित्र पहायला मिळते. न्यायव्यवस्था आणि तत्सम यंत्रणांचा पडद्याआडून सर्रास गैरवापर होऊन चोर सोडून संन्यासी फासावर जाण्याची भीती निर्माण होत आहे. संविधानाचे संरक्षक कवच तुटले जाण्याची भीती वाटत आहे. सर्वांनीच याकडे डोळेझाक केली तर येणारा काळ आपणास क्षमा करणार नाही. अर्थात असे असले तरी समृध्दीचाही यशस्वी टप्पा आपण गाठला, हे कसे नाकारता येईल? विकासाच्या बाबतीत परावलंबी असलेला आपला देश आज स्वतंत्र उपग्रहाची निर्मिती करतो. अन्नधान्य निर्यात करतो. आर्थिक आणि शारीरिक प्रगती बरोबरच आपलं आयुर्मान दुपटीपेक्षा अधिक वाढले आहे. साक्षरतेचा दर 12% वरून 74% पर्यंत पोहोचला. म्हणून तर वाटतं की, यशसिध्दीकडे जाताना समन्वयाची नितांत आवश्यकता आहे. समाजातील जातीय तेढ आणि विषमता पिच्छा सोडत नाही. आजही बेरोजगारीचा भयावह प्रश्न आहे. पदव्युत्तर शिक्षण घेऊनही तरुणांच्या हाताला काम मिळत नाही. यातील बहुतांश शक्ती जयहो करीत कोणाच्याही मागे जाऊन विध्वंसक मार्गाकडे वळताना दिसते. खरं तर शिक्षणातून तयार होणाऱ्या अशा मणुष्यबळाचा भौतिक प्रगतीच्या कामी कसा हातभार लावता येईल हेही पाहणे गरजेचे आहे. उदारीकरणाचा वेग झपाट्याने वाढत जाऊन अब्जावधी डॉलरहून अधिक उलाढाल असलेल्या कंपन्या भारतात आल्या. आर्थिक उन्नतीचा टप्पा दिवसेंदिवस पूर्ण केला जातोय. याचवेळी सीमेभोवती पाकिस्तान, चीन किंवा तत्सम शक्तींना आवर घालण्यासाठी तैनात व्हावे लागते. हे सर्व पाहता अगदी युक्रेनचे उदाहरण डोळयासमोर ठेऊन लढण्यासाठी आपल्यालाच सज्ज व्हावे लागेल, असे दिसते. बंधुभाव जपण्यासाठी आजही प्रबोधनाची आवश्यकता आहे. धर्म, जात, वंश, परंपरेतून मतांच्या राजकारणाची आणि स्वतंत्र सांस्कृतिक वर्चस्ववादाची निर्मिती होत आहे. तथापि सक्षमपणे अर्थकारण ते आरोग्यापर्यंत बदलाची आणि सर्व भेदाच्या पलीकडे जाऊन मूल्याधिष्ठित समाज रचना तयार करण्याची अजूनही नितांत गरज आहे. तरच सुजलाम सुफलाम अशा वैभव संपन्न भारताचं अमृत महोत्सवी स्वातंत्र्य काळात बलस्थान कायम राहील, असे मला वाटते.

### भारत आमुचा देश

धर्म, जात, पंथ, प्रदेश; भिन्न भाषा वेश
एकमुखी संदेश हा की, भारत आमुचा देश।।धृ।।

अभिजन, बहुजन गाती सारे या भूमीचे गान
हिंदू, मुस्लिम, शीख होती तिरंग्याची शान
तथागतांनी, महाविरांनी दिले अहिंसा दान
कुराण, गीता, बायबल करीती शांतीचा जयघोष।।१।।

एकसंघ होऊ सारे दूर ठेऊ इर्षा-अभिलाषा
या देशाच्या ध्येयपूर्तीची आम्हीच ठरवू दिशा
स्वहित रक्षण बचावाची आम्हास ठाऊक भाषा
एकमेका सोबत राहू नको मनी लवलेश।।२।।

सत्तेवर कुरघोडी करतो विरोधी झंजावात
विकासाहूनसरस वाटते पुढाऱ्यांची बात
कुंपन खाते शेत सारे किती असावे निवांत?
सोडा वाटा, दिसतील वाटा; प्रगतीचा संदेश।।३।।



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# पंचाहत्तर वर्षांचा आर्थिक प्रवास

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्याला पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. भारताने गेल्या काही वर्षांमध्ये खूप मोठा पल्ला गाठला आहे. या साडेसात दशकात भारताच्या आर्थिक स्तरावरच्या उत्कृष्ट यशाचे रहस्य वेळोवेळी केलेले भक्कम आर्थिक नियोजन हे आहे. याची सुरुवात पंचवार्षिक योजनांपासून झाली, जी हळूहळू आर्थिक विकासाची मुख्य आधारशिला बनली. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत भूतकाळातील योजनांचे मूल्यमापन आणि भविष्याची रूपरेषा अशा प्रकारे वेळोवेळी आर्थिक धोरणांमध्ये योग्य ती सांगड घालण्यात आल्याने भारताने प्रत्येक आव्हानाला मोठ्या धीराने तोंड दिले आणि आज जागतिक स्तरावर वेगाने उदयास येणारी शक्ती म्हणून भारताला ओळखले जाते. एक काळ असा होता जेव्हा अन्नपदार्थांची तीव्र टंचाई होती आणि भारत परदेशी मदतीसाठी प्रामुख्याने अमेरिकेवर अवलंबून होता.**

पण साठच्या दशकाच्या उत्तरार्धात हरित क्रांती घडवून भारताने अन्न उत्पादनात स्वयंपूर्णता मिळवली. आज भारत अन्न उत्पादनात जगातील सर्वोत्तम आणि सर्वात मोठा निर्यात करणारा देश मानला जातो. एका अहवालातील आकडेवारीनुसार, भारताने गेल्या सहा वर्षांत कृषी उत्पादनांच्या निर्यातीत 16.3 अब्ज अमेरिकी डॉलरची वाढ नोंदवली आहे.हरित क्रांतीनंतर भारताने श्वेतक्रांतीकडे आपली वाटचाल वाढवली आणि दूध उत्पादनातही स्वयंपूर्णता मिळवली. या क्रांतीमुळे गेल्या चाळीस वर्षांत भारतातील दूध उत्पादन पाच पटीने वाढले आहे. 2020-21 या आर्थिक वर्षात दुधाचे उत्पादन 2.10 अब्ज टन इतके होते. 1947 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा जीडीपी 2.7 लाख कोटी इतका होता, जो आज 2022 मध्ये 236.65 लाख कोटी झाला आहे. यावरून हे स्पष्ट होते की या पंचाहत्तर वर्षांत भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार जवळपास नव्वद पटीने वाढला आहे. परकीय चलन संचयन आज 571 अब्ज अमेरिकन डॉलर इतके आहे, जे जगातील पाचव्या क्रमांकाचे सर्वात मोठे आहे. यावरून हे स्पष्ट होते की, सामान्य भारतीयाचे आर्थिक जीवन सातत्याने सुधारत आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षांत अनेक वेळा असे आमूलाग्र बदल आर्थिक धोरणांमध्ये झाले आहेत, ज्याचे सकारात्मक परिणामही झाले आहेत आणि अशा अनेक समस्याही निर्माण झाल्या आहेत, ज्या अद्याप सुटलेल्या नाहीत.

स्वातंत्र्याच्या वेळी अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे योगदान सुमारे पंचावन्न टक्के होते, ते आज केवळ पंधरा टक्के राहिले आहे. त्याचे योगदान सातत्याने कमी होत गेले. ही खूपच चिंतनाची बाब आहे. आजही या देशातील सुमारे ऐंशी टक्के ग्रामीण लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे, पण आता शेती आर्थिकदृष्ट्या अजिबात परवडणारी नाही. या कारणास्तव, अर्थव्यवस्थेचा आकार सतत वाढत असतानाही, शेतकरी गरीब होत चालला आहे. हेही खरे आहे की, आज भारत गरीब देश आहे, तो इथल्या गरीब शेतकऱयांमुळे आहे हे त्यामागचे कारण आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कृषी क्षेत्राने केवळ तीन ते चार टक्के वार्षिक विकास साधला आहे, जो चिंताजनक आहे. शेतकऱ्याचे जीवन आर्थिक कर्जाच्या ओझ्याने दबले आहे. आजही शेती मान्सूनवर अवलंबून आहे, कारण कृषी क्षेत्रात फारसे वैज्ञानिकीकरण झाले नाही. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भावही मिळत नाही. या सर्व निराशेमुळेच दरवर्षी शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. आज जर भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, तर या परिवर्तनाचे खरे श्रेय सेवा क्षेत्रालाच जाते. गेल्या तीन दशकांपासून सेवा क्षेत्राने भारतीय अर्थव्यवस्थेचा लगाम सक्षमपणे हाताळला आहे.

गेल्या आर्थिक वर्षातही या क्षेत्राचा वार्षिक विकास दर 10.8 टक्के होता. तीन दशकांपूर्वी झालेल्या आर्थिक सुधारणांमुळे खाजगीकरणाला प्रोत्साहन मिळाल्याने सेवा क्षेत्राने देशाला झपाट्याने आर्थिकदृष्ट्या समृद्ध केले आहे. आज सेवा क्षेत्रांतर्गत माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, वाहतूक, बँकिंग, विमा इत्यादी क्षेत्र अतिशय वेगाने विकसित होत आहेत. गेल्या दोन दशकांपासून आरोग्य सुविधांनीही झपाट्याने आपले स्थान बळकट केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून, सेवा क्षेत्राने भारतातील एकूण परकीय गुंतवणुकीत सर्वाधिक वाटा आकर्षित केला आहे. कोरोनाचा फटका बसूनही 2021-22 या वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वाधिक परकीय चलन गुंतवणूक सेवा क्षेत्रात झाली. सध्या देशातील 23 टक्के लोकसंख्येला केवळ सेवा क्षेत्रातच रोजगार मिळतो. याशिवाय भारताच्या एकूण निर्यातीत सर्वाधिक वाटा सेवा क्षेत्राचा आहे. 2025 पर्यंत, विविध भारतीय माहिती तंत्रज्ञान कंपन्यांचे जागतिक बाजार मूल्य सुमारे 20 अब्ज अमेरिकन डॉलर इतके असेल. यामुळे भविष्यात भारत आर्थिकदृष्ट्या अधिक समृद्ध होईल हे नक्की.



भारतीय अर्थव्यवस्थेच्या पंचाहत्तर वर्षांच्या या प्रदीर्घ प्रवासाने अतिशय सुखद परिणाम दिले आहेत, तर काही समस्या मात्र तशाच आहेत. बांधकाम क्षेत्राच्या योगदानात न वाढणारी वाढ ही देखील एक मोठी समस्या आहे. भारतातील बेरोजगारीच्या समस्येला सामोरे जाण्यासाठी बांधकाम क्षेत्राला पुढे यावे लागेल, अन्यथा ही समस्या आणखी बिकट होत जाईल. याशिवाय कृषी क्षेत्रातील जे शेतकरी दिवसेंदिवस गरीब होत चालले आहेत, त्यामागे त्यांच्या मालकीच्या जमिनीचे छोटे छोटे तुकडे हे मुख्य कारण आहे, त्यांनाही हे क्षेत्र आर्थिक मदत करू शकते. बांधकाम क्षेत्र आज जागतिक स्तरावर ठसा उमटवू शकले नाही याला कारण त्याचा जास्त खर्च आणि कमी दर्जा हे आहे. या कारणास्तव हे क्षेत्रही फारशी विदेशी गुंतवणूक आकर्षित करू शकत नाही. तथापि गेल्या काही वर्षांत ऑटो आणि फार्मा क्षेत्रांनी स्वतःची जागतिक ओळख निर्माण केली आहे आणि दोन्हीही वेगाने विकसित होत आहेत. याशिवाय कच्च्या तेलाची आयात हे देशाच्या इतर आर्थिक समस्यांपैकी एक मोठे संकट आहे. देशांतर्गत बाजारातील महागाई वाढण्यामागील एक प्रमुख कारण म्हणजे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढणे. आज भारत सुमारे ऐंशी टक्के कच्चे तेल आयात करतो. विविध कारणांमुळे जेव्हा जेव्हा भारतीय रुपया जागतिक बाजारपेठेत कमकुवत होतो तेव्हा देशाचे आयात बिल खूप वेगाने वाढते आणि त्यातही कच्च्या तेलाची खरेदी मोठी भूमिका बजावते. उत्पादन क्षेत्रातील देशाने निर्यातीत आपले योगदान वाढवले तरच या समस्येवर तोडगा निघणे शक्य आहे.हे सर्व असूनही, विविध जागतिक अहवाल मान्य करतात की भारताचे आर्थिक भविष्य अतिशय समृद्ध आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची आजची सर्वात मोठी ताकद ही तिची प्रचंड उपभोग क्षमता आहे. त्यामुळे भारताला जगातील सर्वात मोठी बाजारपेठ असेही म्हटले जाते. सकारात्मक बाजू अशी आहे की आजकाल भारतात तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यवसायाची कामे वेगाने वाढत आहेत. 2017 मध्ये करप्रणालीत आमूलाग्र बदल केल्यानंतर तंत्रज्ञानाद्वारे जीएसटी संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे.आता भारतातील सुशिक्षित तरुण उद्योजक बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असून आधुनिक तंत्रज्ञानाने जास्तीत जास्त स्टार्टअप्स चालवले जात असल्याचेही दिसून आले आहे. त्यामुळे आगामी काळात भारत आर्थिकदृष्ट्या अधिक समृद्ध होईल आणि प्रत्येक व्यक्तीचे जीवन आर्थिकदृष्ट्या अधिक उंचावेल, असा विश्वास व्यक्त करायला काहीच हरकत नाही.

# लोकशाही टिकवण्यासाठी सारे प्रयत्न करूया...

आधुनिक केसरी



केवल जीवनतारे

स्वातंत्र्याचा सूर्य बघितला तो दिवस १५ ऑगस्ट १९४७. या दिवसासाठी १८५७ च्या पुर्वीपासून हा स्वातंत्र्य लढा सुरू झाला. तो १५ ऑगस्ट १९४७ रोजी थांबला. या काळात असंख्य स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानांचे सार्थक झालेला हा दिवस. भारताला पारतंत्र्यातून मुक्तता मिळून स्वातंत्र्य मिळाले, त्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव येत्या काही दिवसात आपण साजरा करणार आहोत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या क्रांतिवीरांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले अशा सर्वांना वंदन करण्याचा हा दिवस आहे. या दिवसाची गंभीरता ७४ वर्षे जोपासली आहे. राष्ट्रभिमान जोपासला. यामुळेच खादीचा तिरंगा झेंडा आसमंतात लहरतो, त्यावेळी अंगात एक नवीन उर्जा निर्माण होते. त्यातच यावेळी प्रथमच पॉलिस्टरच्या झेंड्याला परवानगी देऊन झेंड्याच्या विक्रीचा नवा फंडा म्हणजे स्वातंत्र्य दिनाचा इव्हेंट साजरा करण्याचा प्रयत्न आहे, तो मनाला न भावनारा. विविधतेने नटलेल्या देशात स्वातंत्र्यांनंतर भारत एकसंध राहावा आणि देशाचे आणि देशातील लोकांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहावे, याकरिता भारताला सक्षम राज्यघटनेची गरज होती. ती गरज योग्यरित्या मांडण्याची जबाबदारी घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पेलवली. आणि २६ जानेवारी १९५० रोजी ही घटना लागू केली. देशातील विविध जाती, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषा यांना संविधानतून एक संघ बांधण्याचे कार्य बाबासाहेबांच्या या घटनेतून सुरू आहे. संघराज्य अधिक बळकट करण्यावर




बाबासाहेबांनी भर दिला. यासाठी जगभरातल्या राज्यघटनांचा अभ्यास केला. यानंतर एक सक्षम असा भारतीय संविधानाचा दस्ताऐवज देशाला बहाल केला. यात दुबळया समूहाच्या हिताबरोबरच राष्ट्राच्या एकसंधतेवर अधिक भर देण्यात आला. यामुळेच आज ७५ वर्षानंतरही भारत एकसंघ आहे. मात्र मागील आठ वर्षात अर्थात २०१४ पासून या देशात एका समुहाचा द्वेष करून दुसऱ्या समूहाला धर्मशास्त्रानुसार संघटित करण्याचा घाट घालून स्वतःचा अजेंडा सत्ताधारी राबवत आहेत. एका समाजाचा द्वेष केल्यास दुसरा समुह विरोधासाठी आपोआपच संघटित होतो, हे चित्र स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात दिसत आहे. जे आगामी काळासाठी घातक ठरण्याची भीती आहे. भाषा, धर्म, प्रांत यांचा अभिमान निश्चित असावा, मात्र सत्तेसाठी अहंकारातून याचा वापर होत आहे, हे घातक आहे. यामुळे जात-धर्म-पंथ बाजूला ठेवून 'मी भारतीय' अशी एकच शपथ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात घेऊन देशातील लोकशाही टिकवण्यासाठी आपण सारे प्रयत्न करू या, हीच इच्छा.

**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**

# उद्धव ठाकरेंची सावली अजितदादांवर पडलेली दिसत आहे

आधुनिक केसरी

**बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत उठाव झाला तो नेतृत्वा विरोधात. उठाव करणारे सर्व स्तरातील शिवसैनिक हे कट्टर बाळासाहेब ठाकरे यांचे पठ्ठे, अनुयायी, शिष्य आणि वैचारिक वारसदार आहेत. पण सत्ता, पद, उत्पन्न आणि लोभ कोणालाच चूकला नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी देखील अनेकवेळा परिस्थिती पाहून स्वार्थी किंवा आपल्या ध्येयधोरणांविरोधात निर्णय घेतले. बाळासाहेब इंदिरा गांधी यांचे सुरूवातीला प्रशंसक होते. आणीबाणी लागल्यावर थोडी मते बदलली त्यांची इंदिराजींबाबत. बऱ्याचवेळा त्यांनी महत्वाच्या पदांसाठी आणि विधानपरिषद, राज्य सभेसाठी पक्षा बाहेरील लोकांना मदत केली. प्रतिभाताई पाटील शेखावत, प्रणव मुखर्जी यांना कॉंग्रेस चे उमेदवार असून ही पाठिंबा दिला. हे करताना त्यांनी आपला मराठी माणसांचा कैवारी आणि हिंदू धर्म रक्षक ह्या भूमिकांना तिलांजली दिली नाही कधीही. पण राजकीय लाभ, नुकसान याचा विचार करतच वेळोवेळी वेगवेगळे निर्णय घेतले.**

तोंडाने फटकळ तरीही सडेतोड बोलण्याची हिंमत त्यांच्यात होती. त्यांनी असंख्य शिवसैनिक घडवले परंतू या गडबडीत आपल्याच मुलांवर, पुतण्यांवर, लहान भावांवर संस्कार करण्याचे विसरले. घरोघरी मातीच्या चुली प्रमाणे ठाकरे परिवारात, घराण्यात वाद आहेतच. घर फिरले की घराचे वासेही फिरतात तद्वत उध्दवजींचे झाले आहे. इतक्या दिवसाच्या बेगडी आणि आभासी सत्ता आणि पक्ष प्रमुख पद याच्या जोरावर ते तरूण गेले होते. ते बाळासाहेबांच्या नावामुळे. पण पक्षात सच्चा शिवसैनिकांनी नेतृत्वा विरोधात उठाव करताच उध्दवजी गोंधळले, बावरले, सैरभैर झाले. मुळातच नेतृत्व गुणांचा अभाव, त्यात प्रकृतीच्या तक्रारी, आणि अष्टप्रधान सल्लागार मंडळाची उणीव जाणवत आहे. एक सल्लागार बोलघेवडा, भ्रष्टाचारी, शिवसेनेचे नावाने, आपले स्तोम माजवलेला, संपादक संजय राऊत. ज्याने आयुष्यात कधीही कोणतीही निवडणूक लढवलेली, जिंकलेली नाही.

पक्षनेतृत्वाचे मेहरबानीवर सतत राज्यसभा खासदारकी मिळत गेली. दुसरे अत्यंत खोल, गहन, धूर्त, राजकीय डावपेचाचे माहीर खेळाडू, तेल लावलेले पहिलवान, मुत्सद्दी, ज्यांचा अंदाज येणेच दुरापास्त असते असे कायमचे भावी पंतप्रधान आणि भावी राष्ट्रपती, कळीचे नारद,श्रीयुत आदरणीय, हरहुन्नरी नेते शरद पवार साहेब. हे दोघे उध्दवजींचे जवळचे सल्लागार, मार्गदर्शक. संजय राऊत आधी सामना दैनिकात प्रसिद्धी देतो आणि नंतर उध्दव ठाकरेंना कळवतो. तर साहेब इतका अनाकलनीय सल्ला देतात की तो उध्दवजींच्या डोक्यावरून जातो. मग माणूस अर्ध ज्ञानातून बकवास करत राहतो. आणि स्वतःच स्वतःची पाठ थोपटून घेऊन कशी जीरवली समोरच्याची या भ्रमात आनंदी राहतो. काल उध्दवजी म्हणाले, भाजपाला प्रादेशिक पक्ष संपवायचे आहेत याचाच अर्थ त्यांना संघराज्य पध्दती मान्य नाही. ते हुकूमशाही कडे वाटचाल करत आहेत. कारण ते नरेंद्र मोदींना अजिबातच ओळखु शकलेले नाहीत. वयाच्या पंच्चाहत्तर वर्षा नंतर राजकीय जीवनातून, सक्रिय राजकारणातून निवृत्त व्हावे हा दंडक नरेंद्र मोदी यांनीच घालून दिलेला आहे. यालाच अनुसरून भाजपचे लोहपुरूष लालकृष्ण अडवाणी, मुरली



मनोहर जोशी, सुमित्राताई महाजन आदी बीन्नीच्या आणि थोर नेत्यांना त्यांनी मार्गदर्शक मंडळात बसवले आहे. तोच नियम स्वतःला ही लागू आहे हे त्यांना ज्ञात आहे. मग जे पी नड्डा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष बिहार मध्ये म्हणाले की प्रादेशिक पक्ष संपतील, कॉंग्रेस संपल्यातच जमा आहे. जे घराणेशाही मानणारे प्रादेशिक अथवा राष्ट्रीय पक्ष आहेत ते संपतील. असे त्यांनी म्हणाले होते. पण उध्दव ठाकरेंना त्यांच्या बोलण्यात फक्त शिवसेनाच दिसली.

घराणेशाही जोपासणारे राजकीय पक्ष केवळ आणि केवळ सर्व सत्तापदे घरच्याच लोकांना आणि जनतेच्या डोळ्यात धूळ फेकायची म्हणून जवळच्या नातेवाईकांनाच देतात, आडनावहे सत्य नजरेआड करता येत नाही. एकाही मोठ्या नेत्याच्या अकस्मात, अपघाती, प्राणघातक हल्ला होवून झालेल्या मृत्युची भारतात चौकशीच होत नाही. थातूरमातूर फार्स करून कोणाला तरी बळीचा बकरा बनवायचा आणि फाईल गुंडाळून टाकायची. बरे राजकारणाची, सत्तेची आणि पैशाची हाव याची गंमत अशी असते की मृत नेत्यांचे वारसदार किंवा कुटूंब सदस्य चौकशीची मागणी लावून घरत नाहीत याचे कायम आश्चर्य वाटते. नेताजी सुभाषचंद्र बोस, लालबहादूर शास्त्री, ग्यानी झैलसिंग, फक्रुद्दीन अली अहमद, राजेश पायलट, माधवराव सिंधिया, प्रमोद महाजन, गोपिनाथ मुंढे, हे भारतभर प्रसिद्ध असलेले नेते, शिवाय इंदिराजी, राजीवजी, यांच्या हत्या आणि संजय गांधी चा अपघाती मृत्यू ही ठळक उदाहरणे आहेत. यातील इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांचे हत्यारे सापडले. इंदिराजींचे हत्याचे फाशी गेले आणि राजीवजींच्या हत्याऱ्यांना माफी द्यावी अशी मागणी प्रियंका गांधी वड्रा यांनीच केली.

मुळ मुद्दा हा की महाराष्ट्रातील शिवसेनेच्या आमदार खासदार पक्षनेते यांच्या उठावा नंतर उध्दव ठाकरे बिथरलेत आणि शरद पवार, अजितदादा, सुप्रिया सुळे यांना सोडून भारतीय राजकारणातील सर्वच पक्ष आणि नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी हे आपले दुश्मन आहेत असे गृहीत धरून, कोणी काहीही बोलले तरी ते आपल्यालाच बोलले असा ते गृह करून घेतात आणि मग अनशन बकत राहतात, टीका करीत राहतात. उध्दव ठाकरेंना आणि आदित्य ठाकरेंना अजूनही आपण आपल्याच पक्षाच्या माणसांशी अडीच वर्षे गद्दारी केली, संपर्क तोडला, तुच्छ वागणूक दिली, दुर्लक्षित केले, भेटीसाठी वेळ दिला नाही यात काहीच गैर वाटत नाही आहे. त्यांना काडीचाही पश्चाताप झालेला नाही आहे. अगदी तसेच अजितदादा गेली महीनाभर वागत आहेत. उपमुख्यमंत्री असूनही मुख्यमंत्र्याचे सर्व अधिकार हाती असल्याने मनमानी केली आणि आता सरकार गेले तर ते ही फाफळले आहेत. उठसूठ मंत्रीमंडळाचा विस्तारच होत नाही. शेतकऱ्यांना कोणी वालीच राहीला नाही. सरकारच अस्तित्वात नाही, मंत्रीमंडळ विस्तार झाला तर, खाते वाटपच झाले नाही, हे सरकार टिकणारच नाही. मध्यावधी निवडणूका होतील. असे सतत बोलत आहेत.

आपण काय केले होते सत्तेत आल्यावर, किती दिवस पाचच मंत्र्यांवर सरकार चालवले, सरकारमधील भागीदार पक्षाच्या मंत्र्यांना, आमदारांना कसे उपाशी मारले, त्यांचे कोणतेही काम तातडीने केलेच नाही. बहूतेक तर कोणतेही काम केलेच नाही. या सर्व गोष्टींचा दादांना सोयीस्कर विसर पडला आहे, असे दिसते.

**उध्दव ठाकरे यांची सावली पडली आहे दादांवर**

आत्ता हाती आलेल्या बातमी नुसार खाते वाटप जाहीर झाले असून महा विकास आघाडी सरकारने खेळखंडोबा करून ठेवलेले महत्वाचे गृह खाते, तसेच आजितदादांकडे होते ते वित्त ( अर्थ ) खाते आणि विजेचा लपंडाव पून्हा सुरू करून शेतकऱ्यांना आणि जनतेला भारनियमन चे चटके देणारे उर्जा खाते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे देण्यात आले आहेत.

अनिल देशमुख आणि दिलीप वळसे पाटील यांनी लावलेले दिवे, केलेला दुरूपयोग, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र पोलीस खाते यात घातलेला गोंधळ, सर्व बदल्यांची करामत, भ्रष्टाचार आता रडारवर येईल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खंबीरपणे, न दबता, न घाबरता आणि निरपेक्षपणे ही खाती स्वच्छ करतांना सर्व गैर प्रकार बाहेर काढतील.

**पीपीएम**

# हर्षी येथील शिवमंदिरात भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज




**पुसद :** परिसरातील हर्षी येथील महादेवांचे पुरातन काळातील हेमांडपंथी शिव मंदिर आहे. हे मंहादेव मंदिर गावाबाहेर एका अतिशय उंच टेकडीवर असून निसर्गसौदर्याने नटलेल्या परिसरात आहे. महादेव मंदीराच्या या टेकडीला कैलास पर्वत नावाने ओळखले जाते. श्री महादेवांच्या दर्शनासाठी दर सोमवारी शिवभक्त येतात. परंतू श्रावण महिन्यात भक्तांची वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरु असते. जणू भक्तांची मांदीयाळी असते. दर श्रावण सोमवारी अन्नदात्या कडून अन्नदान केल्या जाते. या टेकडीवर श्री महादेवासह, पार्वती मंदिर आहे. मंदिरात कासवाची मूर्ती मंदिरासमोर एक मोठा नंदी गणपती मंदिर, बजरंगबली मंदिर, श्री विठ्ठल रुख्मीणी माता मंदिर, तुळजाभवानी भैरव बळी राजा आदी छोटी मंदारे आहेत. वर्षभरदर सोमवारी भक्तगण येतात पण श्रावण महीन्याच्या प्रत्येक सोमवारी विदर्भ सह शेकडो भक्त या हर्षीच्या महादेव मंदीरावर दर्शनासाठी येतात. दर्शनासोबत आजूबाजूच्या निसर्गाचा आनंद लुटतात.

# देवदर्शनासाठी निघालेल्या दोन भाविकांवर काळाचा घाला; ट्रकने चिरडल्याने जागीच मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील आर्वी शिवारात असलेल्या श्री. रोकडोबा हनुमान मंदिरावर दर्शनासाठी पायी जाणाऱ्या दोन भाविकांना एका ट्रकने चिरडल्याची घटना पहाटेच्या सुमारास घडली आहे. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून अपघातानंतर फरार झालेल्या ट्रक चालकाला महामार्ग सुरक्षा पथकाने मालेगाव येथून ताब्यात घेतले आहे.

धुळे शहरातील गल्ली क्रमांक सहा मध्ये नवभारत चौकात राहणारे राजू वाघारे आणि मनमाड जिन मधील रहिवासी आणि शिवसेनेचे नेते तथा माजी उपमहानगर प्रमुख बबन थोरात यांचे लहान बंधू किशोर थोरात हे दोघेही हनुमान भक्त असून ते श्रावण मासामध्ये धुळे तालुक्यातील आर्वी शिवारात असलेल्या रोकडोबा हनुमान मंदिरात पायी दर्शनासाठी जात होते.

नेहमीप्रमाणे आज देखील ते मंदिरात दर्शनासाठी जात असताना धुळ्याकडून मालेगाव कडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका ट्रकने त्यांना पाठीमागून धडक देऊन चिरडले.

हा अपघात अवधान शिवारातील वासवा टायर जवळ घडला. या अपघातानंतर ट्रक चालकाने भरधाव वेगाने ट्रक मालेगावच्या दिशेने पळवून नेला. दरम्यान अपघात झाल्याची माहिती



मिळाल्यानंतर धुळे टोल नाक्यावरील रुग्णवाहिकेने राजू वाघारे आणि किशोर थोरात या दोघांना हिरे वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी हलवण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच राजू वाघारे यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. तर खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलवलेल्या किशोर थोरात यांचा देखील मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दरम्यान, या अपघाताची माहिती पोलीस पथकाला मिळाल्यानंतर त्यांनी तातडीने महामार्ग पथकाला ही माहिती कळवली. त्यानुसार मालेगाव शिवारातून महामार्ग पथकाने MP 09 AH 9361 क्रमांकाचा ट्रक ताब्यात घेतला आहे. याप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.

# भारत भू साठी लोककलावंताचे योगदान सर्वश्रेष्ठ...

आधुनिक केसरी

भारतीय स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षात आपण पदार्पण करतोय, याच वर्षांमध्ये येत्या 13 ते 15 ऑगस्ट 2022 रोजी आपण आजादी का अमृत महोत्सव साजरा करतोय. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्या पद्धतीने समाज सुधारक, स्वातंत्र्य सैनिक, राजकीय पुढारी, यांनी आपले योगदान दिले. त्याच पद्धतीचे योगदान लोककलावंतांनी भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात दिले. स्वतंत्र पूर्व काळात शाहीर सिद्राम मुचाटे, शाहीर लहरी हैदर शाहीर पठ्ठे बापूराव या कलावंतांचे योगदान नाकारून चालणार नाही भारतीय स्वातंत्र्याचा गण लिहिताना शाहीर पठ्ठे बापूराव म्हणतात "आधी नमो हिंदू माता चरणी ठेवून या माथा, आज नमिला राष्ट्राचा ध्वज हा जी, राष्ट्र देवता हो राष्ट्र देवता, अधि नमो भारत माता जी,"याच परंपरेचा धागा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर शाहीर, आत्माराम पाटील, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर चंदू भरडकर, शाहीर कृष्णकांत जाधव, शाहीर जंगम स्वामी, शाहीर सेनापती बापट, सेवा दलाचे शाहीर लीलाधर हेगडे, यांनी भारतीय स्वतंत्र प्राप्ती समयाला आपल्या रचनांनी भारत मातेचे गुणगान केलेले आपणास आठवते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे म्हणतात विश्व व्यापी जण गणा, तुझ करून वंदना आज नमीला राष्ट्राचा ध्वज हा जी राष्ट्र देवता हो राष्ट्र देवता आधी नमो भारत माता जी, ज्याने केली तुझी भक्ती झाली आजरामर कीर्ती टिळक, महात्मा फुले ज्योती, आंबेडकर आले उदयाला, हो उदयाला हो उदयाला, पारतंत्र गेले विलयला जी जी आम्ही कलेचे हो दास करू अज्ञानाचा नाश हाच एक मनी ध्यास वाहुनी कलाकार्याला हो अण्णाभाऊ साठे हो अण्णाभाऊ साठे भूषविति लोकनाट्यला जीजी" स्वातंत्र्यपूर्वकाळात एकीकडे ब्रिटिशांपासून आपली सुटका व्हावी म्हणून मोठा लढा सुरू होता अठराशे सत्तवंन ला सुरू झालेली मोहीम 15 ऑगस्ट 1947 ला फत्ते झाली. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले एकीकडे भारत देश स्वतंत्र होत होता तर दुसरीकडे निजामाच्या तावडीतून मराठवाडा मुक्त होण्यासाठी गोविंद भाई श्रॉफ, बाळाराम काबरा, दगडाबाई शेळके, माणिकचंद पहाडे, गोविंदराव पानसरे, इत्यादी स्वातंत्र्यसैनिक वंदे मातरम चा नारा देत निजाम शहीशी झुंज देत होते. शेवटी 17 सप्टेंबर 1948 ला मराठवाडा प्रांत निजामाच्या हुकमी राजवटीतून मुक्त झाला. याच दरम्यान मराठी भाषेच्या अस्मितेचा लढा सुद्धा सुरू होता तर, दुसरीकडे जातीअंताची लढाई डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने सुरू झाली होती जातीयवाद स्वतंत्रपूर्वकाळात फोपावत चालला होता. मंदिर प्रवेश, चवदार तळ्याचे पाणी प्रशन आंदोलन, महिलांवर आणि दलितांवर होणारे अन्याय अत्याचार, ब्रिटिश राजवटीत खुलेआम चालले होते. अशा मध्ये शाहीर लोककलावंत या समाजाला भेडसावणाऱ्या समस्या आणि प्रश्नांवरती आपल्या रचनांच्या माध्यमातून मार्मिक भाष्य करू लागले. शाहरी करू लागले. हरिहरराव सोनुले पतीत पवन दास, केरूबा गायकवाड, केरुबा घेगडे, भीमराव कर्डक, वामनदादा कर्डक या शाहिरांनी हातात डफ उचलले म.फुले यांच्या विचारांनी प्रभावित होऊन सत्यशोधक समाजाने सत्यशोधकी जलसे उभे केले. तर बाबासाहेबांच्या विचारांनी प्रभावित होन लोकलांवनातानी आंबेडकरी जलसे साकारले. इतकेच नाहीतर अनेक तमाशा कलावंतांनी आपल्या वगनाट्याच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या विरोधात समाज जनजागृतीचे कार्य केले. त्यातून अनेक कलावंतांना जेलची काळ कोठडीची हवा सुद्धा खावी लागली. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात लोककलावंतांनी दिलेले योगदान हे वाखनन्याजोग आहे. या 75 व्यां स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने "आजादी का अमृत महोत्सव "साजरा करत असताना सर्व स्वातंत्र्य सेनानी, लोककलावंत, समाज सुधारक, राष्ट्रपुरुष, राजकीय नेते यांना विनम्र अभिवादन.



प्रा.डॉ.गणेश चंदनशिवे




**(शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद)**


# विनायक मेटेंचे अपघाती निधन; मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर भातान बोगद्याजवळ शिवसंग्राम पक्षाचे नेते, आमदार विनायक मेटे यांच्या कारला भीषण अपघात झाला. यामध्ये त्यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली होती. पनवेलच्या एमजीएम रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी मेटे यांना मुंबईला हलविण्याबाबत डॉक्टरांशी चर्चा केली. मात्र, डॉक्टरांनी त्यांना निधन झाल्याची कल्पना दिली. डॉ. धर्मांग यांनी मेटे यांचे निधन झाल्याचे जाहीर केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एमजीएमला पोहोचणार आहेत. विनायक मेटेंच्या पत्नीलाही याबाबत कळविण्यात आले आहे. एका अज्ञात वाहनावर मागून मेटेंची गाडी धडकल्याचे चालकाने सांगितले. अपघात एवढा भीषण होता, की मेटे बसलेली डावी बाजू पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. अपघाताचे वृत्त समजताच भाजपाचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर पोहोचले आहेत. मेटे यांची कार बीडकडून मुंबईकडे येत होते. या दरम्यान, मेटेंच्या कार चालकाने गंभीर आरोप केले आहेत. राम ढोबळे पोलीस बॉडीगार्ड गंभीर जखमी आहेत.

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर भातान बोगद्याजवळ पहाटे पाच वाजता विनायक मेटे यांचा अपघात झाला. यानंतर सुमारे तासभर वैद्यकीय मदत मिळाली नसल्याचा आरोप मेटेंचा चालक एकनाथ कदम यांनी केला. त्यांनी मी रस्त्यावर गाड्या थांबविण्यासाठी झोपलो पण होतो, पण गाड्या थांबल्या नाहीत. मला मुका मार लागला आहे. गार्डना थोडा मार बसला आहे. एअरबॅग होत्या म्हणून आम्ही वाचलोय, असे कदम म्हणाले. छोटा टेम्पो चालकाने मदत केली. दरेकरांच्या बॉडीगार्डला फोन केला आणि तेव्हा यंत्रणा हलल्याचे चालकाने सांगितले. त्याच्यानंतर आम्हाला रुग्णालयात आणले गेले, असे कदम यांनी सांगितले.







# भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव वर्षानिमित्त नागसेन मागासवर्गीय औद्योगिक संस्थेतर्फे झेंडावंदन व फळेवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील सामाजिक न्याय विभागातर्फे विशेष घटक योजने अंतर्गत लाभार्थी नागसेन मागासवर्गीय औद्योगिक संस्थेतर्फे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव वर्षानिमित्त नागसेन प्रिंटेकच्या  दिवशी पिंपळगाव ता गंगापूर जि औरंगाबाद येथील युनिटवर झेंडा वंदन करण्यात आले त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष महादेव साबळे यांच्या हस्ते येथील गरीब ग्रामस्थांना फळाचे वाटप करण्यात आले.त्यावेळी अनेक ग्रामस्थ उपस्थीत होते. यावेळी गावातील काही जेष्ठ नागरिकांचा सत्कारही करण्यात आला.

15 ऑगस्ट हा भारताचा स्वातंत्र्य दिन व हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष  आपण हा आनंद वेगवेगळ्या आठवणींमधून साजरा करित आहोत. स्वाभाविकही आहे. लाल किल्ल्यापासून ते गाव खेड्यापर्यंत देशभक्तीचा महापूर नेहमीप्रमाणेच ओसंडून वाहत आहे. या वर्षी हर घर तिरंगा सर्व भारतात राबविल्या जात आहे, देश किंवा मातृभूमीविषयीची ही विलक्षण आस्था खूप महत्त्वाची आहे. म्हणजे या दिवशी आपण किमान 'भारतीय' म्हणून एक होत असतो. 'एकतेचं' यापेक्षा वेगळे दर्शन एरवी आपल्याला पाहायला मिळत नाही असे यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष महादेव साबळे यांनी आपले मत व्यक्त केले.

यावेळी किशोर दामोदर, विषभूषण नीचले, मिलिंद सुर्यवंशी, समाधान भालेराव, किरण कोमवाड, कारभारी घिटरे, प्रथमेश साबळे, गौतम खिल्लारे, रवी ठोंबरे, तुपे, दादासाहेब साबळे, हिरालाल साबळे, रेखा महादेव साबळे, सरनाम महादेव साबळे, मानस महादेव साबळे व अनेक गावकरी उपस्थित होते.

# वेदांत सांस्कृतिक मंचतर्फे निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा सन्मान व राष्ट्रवंदना

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त वेदांत संस्कृतिक मंचातर्फे कर्वेनगर येथे वास्तव्य असलेल्या निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांचा सत्कार आणि राष्ट्र वंदना हा देशभक्तीपर गीतगायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

पुण्यातील युवा वैद्यांनी साकारलेली देशभक्तीपर गीत्यांची सुरेल मैफिल आयोजित करण्यात आली होती.

वैद्यकीय क्षेत्रातील संगीत उपासकांनी जोशपूर्ण गीतांचा हा कलाविष्कार सादर केला. वैद्य सुश्रुत गाडगीळ, देवाशीष उंब्रजकर, शुभदा कुलकर्णी, शमीका खापरे, कल्याणी संत, प्रतीक्षा वहातुळे हे कलाकार गायक होते तर त्यांना संवादिनी केतन कुर्तकोटी, सिंथेसायझर वर अथर्व जोशी, आशुतोष जातेगावकर यांचे बासरी, ऋटेश दामले, पखवाज वर आशुतोष जिरे, तालवाद्य वर शौनक साने हे होते.

कर्वेनगर मधील वेदांत मंगलम सभागृहात हा कार्यक्रम झाला.

**माजी लष्कर अधिकाऱ्यांचा सन्मान**

कर्वेनगर स्थित माजी लष्करी अधिकारी एअर मार्शल प्रदीप बापट, एअर व्हाइस मार्शल जयंत इनामदार कमोडोर उदय तळवेलकर, चीफ पेटी ऑफिसर सुमेशकुमार बेरी, मेजर जनरल सोहोनी, मेजर जनरल संजय भिडे, ब्रिगेडिअर प्रकाश भट, कर्नल बसरगेकर, कर्नल शशांक उमाळकर, लेफ्टनंट कर्नल वैद्य, मेजर मिलिंद वाठारे DRDO मधील असिस्टंट डायरेक्टर अनिल मोरगावकर इत्यादींचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी माजी आमदार मेधाताई कुलकर्णी, कर्वेनगर मधील माजी नगरसेवक राजाभाऊ बराटे, वृषाली चौधरी, शिवराम मेंगडे, स्वप्निल दुधाने, कुलदीप व मिताली सावळेकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजिरी जोशी यांनी केले. विनायक बेहेरे, सतीश आठवले, सतीश घारपुरे, रश्मी तुळजापूरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आयुर्वेदिक वैद्य होणाऱ्या विद्यार्थ्यांनी हा वाद्यवृंद बसविला असून त्यात मराठी, हिंदी, कोकणी भाषेतील देशभक्तीपर गीते सादर केली.

# ॲड.निशा शिवूरकर यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कृतिशील आणि अभ्यासू कार्यकर्त्या ॲड.निशा शिवूरकर यांचे एकल महिलांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन येत्या १६ ऑगस्ट २०२२ रोजी शहरातील स्वामी रामानंद तिर्थ सभागृह, नागेश्वरवाडी येथे दुपारी ३ ते ६ यावेळेत करण्यात आले आहे.

सजग महिला संघर्ष समिती, समविचारी संघटना, महिला पत्रकार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. आणीबाणीच्या काळात समाजवादी चळवळीत कार्यरत झालेल्या निशा शिवूरकर गेली चारेक दशके विविध आंदोलनांत सक्रिय आहेत. राष्ट्रसेवा दल, समाजवादी जनपरिषद अशा समाजवादी परिवारातील संघटना, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, हिमालय मोटर रॅलीविरोधी वा एन्‍रॉनविरोधी आंदोलन, लोकशाही समाजवादावरील निर्लेप निष्ठेने ॲड. शिवूरकर यांचा सहभाग लक्षवेधी ठरला आहे.

या व्याख्यानाचा लाभ शहरवासियांनी घ्यावा असे आवाहन मंगल खिवंसरा, रश्मी बोरीकर, पद्मा तापडिया, डॉ.स्मिता अवचार, ताराबाई लड्डा, डॉ.आरतीश्यामल जोशी, मनोरमा शर्मा, शकीला पठाण, विद्या गावंडे, सरस्वती जाधव, सुनिता जाधव, कल्पना राजपूत, निर्मला जाधव, सुलभा खंदारे आदींनी केले आहे.

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव: नतमस्तक व्हावी अशी वाटचाल...

### देशाप्रती कृतज्ञा टिकली पाहिजे



भारत ही कलावंताची अस्सल खाण आहे. या भूमित अनेक लोककला आपले वैभव टिकवून आहेत. हाच रसिक मायबाप आमच्यावर अखंड प्रेम करतो. या कलेतून आम्ही कलावंत मंडळी देशाची शान आणि देशाचा मान टिकवून ठेवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहतो. देशाच्या पंचाहत्तरी नंतरही प्रगतीने भरारी घ्यावी. कलावंतांना भरभरून प्रेम मिळो हीच अपेक्षा आजच्या सुदिनी व्यक्त करावीसी वाटते. म्हणूनच देशाचे संविधान आणि त्याप्रती कृतज्ञा सर्वांनी ठेवणे याक्षणी खूप मोलाचे आहे.

मंगला बनसोडे
प्रसिद्ध तमाशा कलावंत

### युवापिढी सजग राहिली पाहिजे



भारत देशात शाहीर आणि लोककलावंत यांची खूप मोठी भूमिका आणि परंपरा राहिली आहे. आम्ही कलावंत समाजप्रबोधन, देशाच्या योजना लोकजागृती करताना यातून देशप्रेम, बंधुता यांचे दर्शन आम्हाला होते. देशाची प्रगती, सांस्कृतिक वाटचाल ही कितीतरी आनंददायी वाटते आहे. युवापिढीने उत्तम कामगिरी करीत व्यसनापासून दूर राहत सकारात्मकतेची कास धरावी. आणि हाच अनमोल ठेवा देशाच्या जडणघडणीत मोलाचा आहे.

शेखर निरंजन भाकरे
प्रसिद्ध भारूडकार

### आधुनिक केसरीस प्रतिभावंत कलावंताच्या प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

देशाचा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना सर्वत्र हर्ष आणि आनंद व्यक्त होत आहे. देशप्रेम, देशाची अखंडता, देशाचा विकास, आणि सर्वत्र सुबत्ता नांदली पाहिजे. अशा प्रतिक्रिया महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलावंतांनी आधुनिक केसरीस दिल्या.



### देशाच्या अखंडतेची जबाबदारी साऱ्यांचीच



अमृतमहोत्सव साजरा होत असताना आम्हाला खूप आनंद होत आहे. कलावंत म्हणून आम्ही देशभर जातो त्यावेळी भारताची विविधता, तिचे वैविध्यपूर्ण कोंदण थुईथुई नाचणारे वाटते. जाणकार रसिक ही भारताची,महाराष्ट्राची खान आहे. पुढील काळात हा सांस्कृतिक ठेवा. समाजप्रबोधनासाठी आणि देशाच्या अखंडेतसाठी कायम स्वरूपी टिकवून ठेवण्यासाठी सर्वांचीच जबाबदारी आहे हा आत्मविश्वास आजच्या सुदिनी वाटतो.

कृष्णा मुसळे
प्रसिद्ध ढोलकीवादक

### देशात सुबत्ता नांदो ही अपेक्षा



स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव प्रसंगी आम्ही कलावंत मंडळी देशात शांतता लाभो, आपल्या विविध कलांची भरभराट होवो अशी अपेक्षा करतो. भारत देश विविधतेतेने नटलेला आणि भाषा, प्रांत, आणि विविध कलाविष्कारांनी तो दिमाखात उभा आहे. आमची कला बघण्यासाठी सामान्य माणूस येतो. त्याच्या खिशात जर पैसेच नसतील तर तो कलाविष्कार बघायला कशाला येईल. म्हणून देशात सुबत्ता नांदली पाहिजे. तळागाळातील, वंचित, शोषित, शेतकरी, शेतमजूर यांच्यावर अन्याय न होता. त्यांचे प्रश्न तातडीने सोडविले पाहिजेत.

विजय चव्हाण
प्रसिद्ध ढोलकी आणि तालसम्राट

### संविधानाची अस्मिता जपली पाहिजे



देशाचे संविधान सर्वोच्च आहे. आणि त्यावरच देशाचा सर्व कारभार चालतो. आम्ही कलावंत मंडळी संविधानाचे महत्व आपल्या कलेच्या माध्यमातून मांडत असतोत. आज देशाने पंचाहत्तरी ओलांडली आहे परंतु आज संविधानाला गालबोट लावण्याचे कार्य होताना दिसत आहे हे अत्यंत खेदजनक आहे. म्हणून संविधानाची अस्मिता आणि तिचे महत्व अबाधित राहिले पाहिजे.

कडूबाई खरात
प्रसिद्ध लोककलावंत



## दि चिखली अर्बन बँकेची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या दि चिखली अर्बन को-ऑप बँकेची ६१ वि वार्षिक आमसभा रविवार १४ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडून सभेसमोरील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येऊन सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

रानवारा कार्यालय येथे पार पडलेल्या आमसभेच्या अध्यस्थानी चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतिशजी गुप्त होते. मंचावर बुलढाणा अर्बन चे अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, आ. श्वेताताई महाले, रा.स्व.संघाचे विभाग सरसंघचालक चित्तरंजन राठी, बँकेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तमजी दिवटे, डॉ. आशुतोषजी गुप्त, बँकेचे संचालक विश्वनाथजी जितकर, राजेंद्रजी शेटे, डॉ. गणेशराव मानटे, राजेशजी व्यवहारे, मनोहरजी खडके, जीवनजी सपकाळे, आनंद जेठाणी, सुधाकर कुलकर्णी, राजेंद्रजी भाला, सुशीलजी शेटे, शैलेशजी बाहेती, शमसुंदरजी पारीख, बँकेच्या संचालिका सौ. सुनीताताई भालेराव, सौ. मंजुताई कोठारी, बँकेचे सरव्यवस्थापक संजयजी भंगिरे आणि बँकेचे शाखा सल्लागार हे प्रामुख्याने उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला बँकेचे अध्यक्ष सतिशजी गुप्त, बुलढाणा अर्बन चे अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, आ. श्वेताताई महाले, चित्तरंजन राठी, बँकेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तमजी दिवटे यांच्याहस्ते श्री लक्ष्मी प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर बँकेचे कर्मचारी यांनी स्वागत गीत सादर केले. सभेमध्ये मागील वर्षांमध्ये दिवंगत झालेले बँकेचे संचालक, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, हितचिंतक, हुतात्मा सैनिक, दिवंगत शास्त्रज्ञ, दिवंगत पत्रकार, कलाकार, साहित्यिक यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

समाज उन्नतीसाठी आर्थिक, शैक्षणिक, सहकार, अध्यात्मिक, वैद्यकीय, क्रीडा यामध्ये अलौकिक कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा बँक जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करते. बँकेच्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा जीवन गौरव गौरव पुरस्कार सहकार क्षेत्रात मोलाची कामगिरी करणारे बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्यामजी चांडक यांना चिखली अर्बन बँकेचे अध्यक्ष सतिशजी गुप्त यांच्या हस्ते सन्मान पूर्वक प्रदान करण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सतिशजी गुप्त म्हणाले, केवळ नफा किंवा बँकेची प्रगती हे डोळ्यासमोर न ठेवता समाजकार्य म्हणजेच आपले समाजाप्रती असलेले देने हे बँक कधीच विसरलेली नाही.

महिला स्वालंबी होण्यासाठी व महिला सबलीकरणाकरिता बचत गटाची स्थापना करून त्यांना कर्जपुरवठा करीत आहे. आजपर्यंत ३५००० पेक्षा जास्त महिलांना बचतगटांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले आहे. बँकेचे ठेवीदार, खातेदार, कर्जदार आणि सभासदांच्या सहकार्याने चिखली अर्बन बँकेने आर्थिक क्षेत्रात सर्वांचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे बँकेची उत्तरोत्तर प्रगती होत आहे. संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रामाणीक कामामुळे बँकेची घोडदोड आज वेगाने सुरू आहे. ३१ शाखा व ६ ग्राहक सुविधा केंद्रे असलेली चिखली बँक आज ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आपण दाखविलेल्या विश्वासाच्या बळावर बँकेची ही यशस्वी व नेत्रदीपक वाटचाल सुरू आहे. यावेळी बुलढाणा अर्बन चे अध्यक्ष राधेश्यामजी चांडक व आ. श्वेताताई महाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

बँकेच्या संचालक मंडळीनी सभेसमोर विषय पत्रिकेतील विषय ठेवले व सभेत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. बँकेचे सरव्यवस्थापक संजयजी भंगिरे यांनी अहवाल वाचन केले. सभेमध्ये १० वी उत्तीर्ण सभासदांच्या पाल्यांना व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचे वाटप बँकेचे अध्यक्ष सतिशजी गुप्त व संचालक मंडळाच्या हस्ते करण्यात आले. सभेमध्ये रक्तदान शिबिराचे देखील आयोजन केले होते. रक्तदान शिबिरात भरपूर जणांनी रक्तदान करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी महिला बचत गटांच्या सभासदांना राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले. सुजित दिवटे यांनी सूत्रसंचालन केले तर अभिजीत देशपांडे यांनी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सीतानाईक तांडा येथे सप्ताहास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील सीतानाईक तांडा येथे गोकुळ अष्टमी उत्सव निमित्ताने प.पू.दगाजी बापु चौपाळा, प.पु लक्ष्मण चैतन्यजी बापु पाल आश्रम, प.पु गोपाल चैतन्यजी बापु यांच्या आशीर्वादाने हभप गोविंद महाराज विठ्ठलवाडीकर, हभप विलास महाराज, हभप राहुल महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाने आणि समस्त ग्रामस्थ बसली. मंडळ सीतानाईक तांडा अमोल योगदानातून अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ दिनांक १२ ते १९ ऑगस्ट ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम सप्ताह सुरू आहे.

हभप जगदीश महाराज मोरदडकर, हभप चैतन्य महाराज आळंदीकर, हभप सुनिता पाटील टाकळीकर, हभप शारदा सुर्यवंशी नाशिककर, हभप पल्लवी मुंडे कल्याणकर, हभप विलास महाराज ओढरेकर, हभप उक्लेश महाराज पाटोंदाकर यांचे कीर्तन होतील. हभप गोविंद महाराज विठ्ठलवाडीकरच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सितानाईक तांडा येथील ग्रामस्थांनी केले आहे.




हर घर तिरंगा अभियान अंतर्गत आज क्रांती चौक वॉर्ड मधील श्रेयनगर येथील शिशु विकास मंदिर प्राथमिक आणि माध्यमिक शाळा उस्मानपुरा येथे मा.नगरसेविका शिल्पाराणी सागर वाडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महिला मंडळ संस्था औरंगाबाद सचिव सुलोचनाताई नाईक, मुख्याध्यापिका कामिनी कुलकर्णी, पर्यवेक्षिका अनिता कुलकर्णी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती काटकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त धुळे जिल्हा सत्र न्यायालय येथे स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त धुळे जिल्हा सत्र न्यायालय येथे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली आहे. सदर ही स्वच्छता मोहीम धुळे जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रमुख मोहम्मद आर.एच. यांच्या उपस्थितीत राबविण्यात आले आहे. यंदा 15 ऑगस्ट 2022 रोजी भारत आपला 75 वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहे. या अमृत महोत्सव वर्षानिमित्त देशात ठिकठिकाणी स्वातंत्र्यमहोत्सवाचा उत्साह पाहायला मिळतो. धुळे जिल्ह्यात देखील विविध ठिकाणी समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहे तर धुळे जिल्हा सत्र न्यायालयाच्या वतीने देखील स्वच्छता मोहीम राबवून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. यावेळी धुळे जिल्हा सत्र न्यायालयाच्या परिसरात न्यायाधीश, वकील, विविध संघटनेचे कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश प्रमुख आर.एच. मोहम्मद, जिल्हा न्यायाधीश १ चे ए.डी.क्षीरसागर, जिल्हा न्यायाधीश 2 चे एफ एम.जे. ख्वाजा, जिल्हा न्यायाधीश 3 च्या श्रीमती वाय.जी. देशमुख व cym च्या व्ही. व्ही. कुलकर्णी व इतर अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.





# जय हो सारखी स्वातंत्र्यावरील नाटिका भावी पिढीसाठी ऊर्जास्रोत : डॉ.उपेंद्र कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** स्वातत्र्यांच्या अमृतमोहत्सवी वर्षात वेगवेगळ्या ठिकाणी देशात उत्साही कार्यक्रम चालू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बीड मध्ये राष्ट्रसंवर्धन संस्था बीड निर्मित जय हो' या नाटीकेचे कार्यक्रम सुरु आहेत. या नाटिकेची निर्मिती दिग्दर्शन व सादरीकरण पाटबंधारे खात्यातील सेवानिवृत्त इंजिनियर कुलदिपक धुमाळे यांचे आहे. त्यात दूसरे कलाकार म्हणून डाक विभागामध्ये निवृत्त अधिकारी दत्ता काळे आहेत. व त्यांना साहय माधव जोशी व बालाजी शिंदे अशी ही कलाकार मंडळी आहेत. आज दीनदयाळ शोध संस्थान संचलित जन शिक्षण प्रशिक्षण केंद्र बीड मध्ये हे सादरिकरण करण्यात आले. ज्यांनी स्वातंत्र लढ्यात भाग घेतला. अश्या मंगल पांडे ते सुभाषचंद्र बोसपर्यत झाशीची राणी, सावरकर, लोकमान्य टिळक अश्या 20 स्वातंत्र्यविरांचा स्वातंत्रसंग्रामतील कार्याचे नाटिकेतुन सादरीकरण अंगावर शहारे आणणारे होते. या नाटकेमुळे नवीन पिढीला स्वातंत्र्यसंग्रामातील भाग घेणाऱ्याची माहिती मिळणार आहे. कार्यक्रमाच्या सुरवातीस मंचावर उपस्थित उपेद्र कुलकर्णी, डॉ.एन.डी. कुलकर्णी मंचावरील सर्वांनी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन केले.

नंतर फाळणीमुळे जो नरसंहार, स्त्री, बालके यांच्यावर अत्याचार झाला त्यावर आधारित विभाजन-विभीषिका अश्या जन शिक्षण संस्था बीडच्या चित्ररूपी प्रदर्शनीचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक मानूरकर यांनी केले. देश हमे देता है सबकुछ, हे गीत केवडकर यांनी सादर केले. उद्घाटन पर संबोधनात डॉ. उपेंद्र कुलकर्णी यांनी प्रदर्शन व नाटिका पुढील पिढीसाठी उर्जास्रोत असल्याचे म्हटले. यावेळी स्वातंत्र्य संग्रामावेळी झळ पोहोचलेल्या पवार व डोके यांचा गौरव करण्यात आला.

जय हो या नाटिकेच्या सादरीकरणावर प्रमोदराव कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जैन यांनी आभार प्रदर्शन केल्यावर राष्ट्रगितानी कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला जनशिक्षण संस्था बीडच्या अध्यक्षा सिमा जोशी, उपाध्यक्षा मनिषा कुलकर्णी व प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करणासाठी गंगाधर देशमुख, पालकर, जाडकर व दीनदयाळ शोध संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# दि. चिखली अर्बन विद्यानिकेतन शाळेमध्ये 'हर घर तिरंगा' मोहिमेनिमित्त झेंडा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** "आझादी का अमृतमहोत्सव" ही संकल्पना सर्वानाच परिचित आहे आणि या निमित्ताने "हर घर झेंडा" ही मोहिम राबविण्यात येत आहे. आणि प्रत्येकाला झेंडा वाटप करावयाचे काम शासनाने हाती घेतले आहे. अशाच प्रकारचे प्रत्येक विद्यार्थ्यांना झेंडा वाटपाचे काम दि चिखली अर्बन विद्यानिकेतन शाळेमध्ये दि.13 रोजी पार पाडण्यात आले. झेंडा वाटप कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे लाभलेले चिखली शहराच्या आमदार श्वेताताई महाले पाटील, शाळेचे अध्यक्ष सतिश गुप्त, डॉ. आषुतोश गुप्ता, शाळेच्या शैक्षणिक संचालिका डॉ. पुजा गुप्ता व संचालक मंडळ व शाळेचे प्राचार्य गौरव शेटे यांची उपस्थिती लाभली होती.

यानंतर शाळेचे सचिव आशुतोष गुप्ता यांनी देखिल विद्यार्थ्यांना "आझादी का अमृत महोत्सव" या विषयी माहिती दिली व या महोत्सवानिमित्त शाळेत खूप अशा नाविन्यपूर्ण व विद्यार्थ्यांमधील उपजत गुणांना वाव देण्यासाठी नवनवीन उपक्रम हाती घेण्यात आले. जसे की "प्रधान मंत्री योजना" या विषयावर राखी बनविण्याची स्पर्धा, रांगोळीची स्पर्धा, विविध विषयावर भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा हे सर्व उपक्रम आझादी की महोत्सव या पार्श्वभूमीवर घेण्यात आले व प्रत्येक विद्यार्थ्याला हा महोत्सव आपल्या घरावर झेंडा लाऊन त्यासोबत फोटो काढून तो मुख्यमंत्री व प्रधान मंत्री यांना TAG करायचे असे आवाहन विद्यार्थ्यांना व पालकांना करण्यात आले. अशा प्रकारे आशुतोष सरांनी आपल्या भाषणात त्यांचे मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी असलेल्या चिखली शहराच्या आमदार श्वेता महाले पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना झेंडा वाटप केला व आपल्या भाषणातुन त्यांनी या मोहिमेविषयी विद्यार्थ्यांना सांगितले. त्यांनी "अमृत" या शब्दाचा अर्थ विद्यार्थ्यांना समजेल अशा सहज व साध्या भाषेत सांगितला व हे अमृत आपल्याला पुढच्या पिढीसाठी त्याचा वारसा पुढे चालवायचा आहे व हे चिमुकले विद्यार्थी हे भावी भारताचे आधारस्तंभ आहे हे त्यांनी आपल्या भाषणातुन सहजगत्या विद्यार्थ्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणिव करून दिली.



# लग्न मंडपात उभे राहून वऱ्हाडी मंडळींनी गायले राष्ट्रगीत

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** सगळीकडे स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवाचा गाजावाजा होत असून हर घर तिरंग्याच्या माध्यमातून घरोघरी तिरंगा  तसेच दोन दिवसापासून उत्साही वातावरण पाहायला मिळत आहे.

निमित्त होते लग्नाचे पैठणच्या शिरसाठ परिवारातील मुलीच्या साखरपुड्याच्या निमित्ताने पाव्हणे मंडळी जमले होते. साखरपुड्याला आलेले वऱ्हाडी मंडळीने लगेच लग्न उरकण्याचा निर्णय घेतला. चि.सौ.का अश्विनी नामदेव शिरसाठ व चि.नितीन सुभाष खाडे यांच्या लग्नाच्या मंगलाष्टका आधी मित्रांनी सुचवले की सध्या स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सव चालु आहे. त्या निमित्ताने आपण राष्ट्रगीत म्हणून अमृत महोत्सवात सामिल होवू सगळ्यांचा होकार येताच वधु वरांना आशिर्वाद देण्यासाठी आलेले सर्वच लग्न मंडपात उभे राहीले अन् एका सुरात सामुहिक राष्ट्रगीत गावुन राष्ट्राविषयी प्रेम व्यक्त केले.

# देवरे विद्यालयात अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**विखरण :** श्री.आप्पासो.आत्माराम धवळू देवरे माध्यमिक विद्यालय विखरण येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त १३ ऑगस्ट 2022 रोजी एस. एस.सी. बोर्ड परीक्षेत विद्यालयातून प्रथम आलेला नाशिंदे गावातील चि.हरिष व पालक प्रविण पाटील सपत्नीक ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर विद्यालयातील हर घर तिरंगा मोहिमेंतर्गत तालुका पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी, पो.हे.कॉ.साहेबराव जाधव, पो.कॉ.अनिल सोनवणे, सरपंच प्रतिनिधी बापू विश्राम पाटील, पोलीस पाटील दिपमाला प्रकाश पाटील, उपसरपंच चंदु कान्हु पवार, माजी सरपंच केशव वामन पाटील, ग्रामसेवक शरद गायकवाड, अरुण पाटील, डॉ.प्रकाश पाटील, प्रशांत पाटील या मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी ध्वज संहितेचे पथनाट्य सादर केले. पो.उ.नि.कमलाकर चौधरी यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांनी दिलेले योगदानाची माहिती सांगून तुम्ही विद्यार्थी भारतीय सुवर्ण महोत्सव काळाचे साक्षीदार आहात. आपण सर्व विद्यार्थी भविष्यात मोठ्या पदावर नियुक्त होऊन देश कार्यात हातभार लावावा, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.डी. साळुंके यांनी प्रमुख मान्यवरांचा सन्मान केला. उपशिक्षक डी.बी.भारती यांनी सुत्रसंचालन तर आभार के.पी.देवरे यांनी मानले. उपशिक्षक एम.डी. नेरकर, वाय.डी.बागुल, व्ही.बी.अहिरे, श्रीम. एस.एच. गायकवाड, आर.एम.पाटील, श्रीम.एम. आर.भामरे, एस.जी.पाटील तसेच विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवपर विविध कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



# सोयगाव कृषी विभाग कार्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने स्थानिक कृषी विभाग कार्यालय येथे 13 ते 15 ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगा अभियान राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने 13 ऑगस्ट ला सकाळी कृषी विभागाच्या पटांगणात ध्वजारोहण तालुका कृषी अधिकारी संगीता पवार यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार रमेश जसवंत, सोयगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, पत्रकार विजय काळे, हेमंत देशमुख (पर्यवेक्षक), अमोल महाजन (पर्यवेक्षक), कृषी सहाय्यक मानसिंग भोळे, कृषी सहायक अर्जुन सुरडकर, मयूर पाटील, विनोद कायस्थ, मयूर बारी, जे.के. जाधव, इंगळे, बी.आर. चौरे व कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर सामूहिक राष्ट्रगीत झाले. याप्रसंगी सर्व ग्रामस्थांनी आपापल्या घरी 13 ते 15 ऑगस्ट दरम्यान तिरंगा झेंडा लावण्याचे व काळजी घेण्याचे आवाहन कृषी अधिकारी संगीता पवार यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मानसिंग भोळे यांनी केले.



शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394

DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.

आपले जीवन आनंदमय जगा....

तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.

कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.

- सेंट्रल अ‍ॅक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
- पासबुक व पावतीची सोय
- लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
- सर्व व्यवहार धनादेशाद्वारे

संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका

आरोग्यम् धनसंपदा

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर





घर संसार

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अ‍ॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# मातोश्रीशी गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही : रहाटे

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** शिवसेनेमुळे ज्यांच्या ओळख आज निर्माण झाली तेच आज स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला आव्हान देण्याचा प्रयत्न करत आहे. शिवसेनेने राज्यात सर्वात अधिक वेळा आपला ए बी फॉर्म कोणाला दिला असेल तर ते खा. प्रतापराव जाधव यांना स्वताला भूमिपुत्र म्हणून घेतात शिवसेनेसोबत गद्दारी करणाऱ्यांनी शिवसेनेला हिंदुत्व शिकवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे बुलडाणा जिल्ह्यसंपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर यांनी आज लोणार येथे आयोजित शिवसेनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात केले आहे.
जिल्ह्यातील दोन आमदार, आणि खासदार यांनी शिवसेनेसोबत बंडखोरी करून शिंदे गटात सहभागी होण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे खिळखिळ झालेल्या शिवसेनेला पुन्हा एकदा सावरण्याचे काम जिल्ह्याचे संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हाध्यक्ष दात्ता पाटिल, जालिंधर बुधवत, वसंतराव भोजने, आशिष रहाटे, छगराव मेहेत्रे यांच्या नेतृत्वात सुरु झाले आहे. मेहकरनंतर आज लोणार येथे शिवसेनेकडून निष्ठावान शिवसैनिक कार्यकर्त्याचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात नरेंद्र खेडेकर यांनी शिंदे गटात गेलेले मतदार संघाचे आमदार, खासदार, जिल्हाप्रमुख यांच्याविरुद्ध टिका केली. सर्वसामान्य शिवसैनिकांमुळे ४० वर्ष ज्यांनी सत्तेचे सुख भोगले त्यांनी आज पक्षाच्याविरुद्ध भूमिका घेवून शिवसेनेला अडचणीत आणण्याचे काम केले आहे. ते निष्ठावान शिवसैनिक येणाऱ्या काळात गद्दारांना त्यांची जागा दाखवल्या शिवाय राहणार नाही. शिवसेनेने ८० च्या दशकात सामान्य कार्यकर्त्यांना आमदार-खासदार केले. आज तीच परिस्थिती पुन्हा आली आहे. सामान्य कार्यकर्त्यांना पुन्हा एकदा संधी निर्माण झाली, असल्याचे आशिष रहाटे यांनी यावेळी सांगितले.
यावेळी दत्ता पाटील, वसंतराव भोजने, छगनराव मेहेत्रे, यांच्यासह मान्यवरांणी टिकेची तोफ डागली. यावेळी तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संखेने उपस्थित होते. या मेळाव्याचे आयोजन संदीप मापारी, असलम खान, श्याम राऊत, नगरसेवक गजानन जाधव, पंकज मापारी, सूदन अंभोरे, कैलास अंभोरे यांनी केले होते.

# देशातील नागरिकांना जगण्याचा हक्क भारतीय राज्यघटनेने दिला : उत्तम कांबळे



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय नागरिकांना जीवन जगण्याचा हक्क डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय राज्यघटनेने दिला आहे, यासाठी भारताच्या जनमाणसात संविधान साक्षरता अत्यंत महत्वाची आहे, असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यीक व विचारवंत उत्तम कांबळे यांनी येथील पंचायत समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त शनिवार रोजी त्यांचे व्याख्यान उपविभागीय अधिकारी, तालुका प्रशासन व वैजापूर पत्रकार संघाने हा कार्यक्रम आयोजित केला होता.
कार्यक्रम अध्यक्षस्थानी उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर होते तर व्यासपीठावर माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, एकनाथ जाधव, डॉ. राजीव डोंगरे, अविनाश गलांडे, सत्र न्यायालयाचे न्यायाधीश यांची उपस्थिती होती. आजच्या पत्रकारितेला त्यांनी संबोधित केले. लेखणी ही प्रखर, सत्य व निःपक्षपाती असावी असेही कांबळे यांनी सुचविले. स्वातंत्र्य पूर्व पत्रकारिता यावरही ते बोलले. आपल्या अध्यक्ष भाषणात माणिक आहेर यांनी वैजापूर शहरात व्याख्यानमाला आयोजित कराव्यात असे आवाहन केले. प्रास्ताविक तहसीलदार राहुल गायकवाड यांनी केले. सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन जेष्ठ साहित्यीक धोंडिरामसिंह राजपूत यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रशांत त्रिभुवन यांनी करून दिला.
याप्रसंगी प्रशांत पा. सदाफळ, धनंजय धोरडे, सुरेश तांबे, दिनेश ढाकरे, प्रभारी गट विकास अधिकारी एच.आर. बोयनार, काशीनाथ गायकवाड, दामोदर पारीख, घनश्याम वाणी, दिगंबर गायकवाड, पत्रकार संघाचे विजय गायकवाड, मकरंद कुलकर्णी, दीपक बरकसे, शैलेश खैरमोडे, गौरव धामणे, ललित काथवटे, विलास म्हस्के, सुनील त्रिभुवन, संजय पगारे, शांताराम मगर, मनसुरअली, अमोल राजपूत, विशाल त्रिभुवन, दीपक थोरे, किशोर साळुंके, थोरात यांच्यासह महसुलचे अशोक तांबूस, अशोक आढाव, माया पगारे यांची उपस्थिती होती.



# पैठण येथील लोक अदालतमध्ये सव्वादोन कोटींची वसुली

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुका विधी सवो समिती व पैठण तालुका वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने दि.१३ रोजी पैठण न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालत आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी पैठण न्यायालयात प्रलंबित असलेल्या व दाखल पुर्व अशी एकुण ६७०९ प्रकरणे लोकअदालतीमध्ये तडजोडीअंती मिटवण्यासाठी ठेवण्यात आलेली होती. त्यापैकी न्यायालयात प्रलंबित अशा प्रकरणात व दाखल पुर्व ५39 प्रकरणात तडजोड होवुन रक्कम रुपये दोन कोटी चौवीस लाख अठरा हजार चारशे तेरा इतकी रक्कम वसुल झाली.
यावेळी तालुका विधी सेवा समितीतर्फे या लोकअदालतीसाठी ३ पॅनल नियुक्त करण्यात आले होते. या पॅनलवर प्रमुख म्हणुन अनुक्रमे न्यायाधीश सचिन ना.भावसार, न्यायाधीश श्रीमती अपर्णा सी. रोकडे व न्यायाधीश गौरव एस. हांगे यांनी काम पाहिले. त्यांना पंच म्हणुन ॲड. धनंजय पी. चव्हाण, ॲड.संदेशकुमार द. शिंदे, ॲड. सदाशिव एस. जाधव यांनी सहाय्य केले. या प्रसंगी संपूर्ण देशभर साजरा होत असलेला स्वातंत्राच्या अमृत महोत्सवानिमित्ताने तडजोड झालेल्या प्रकरणातील पक्षकारांना तालुका विधी सेवा समिती व पैठण वकील संघातर्फे सामाजिक बांधीलकीची जपवणुक म्हणून पर्यावरण समतोल राखण्यासाठी ७५ वृक्ष रोपट्यांची भेट देवून पर्यावरण संरक्षणाचा व शाश्वत विकासाचा संदेश दिला.
ॲड. दादासाहेब एस. दसपुते (ग्रंथालय प्रतिनिधी) ही लोक अदालत यशस्वी होण्यासाठी पैठण न्यायालयातील सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले व पैठण वकील संघाचे अध्यक्ष ॲड. पी.के. वाकडे व कार्यकारणी ॲड. नंदा वी. जाधव, ॲड. शाहीन अ.शेख, ॲड. दादासाहेब एस. दसपुते, ॲड. डी.जे.पहिलवान, ॲड. विजय जे. वैद्य व सर्व वकील सदस्यांनी त्यांना सहकार्य केले.



# तिसऱ्या श्रावण शनिवारी लाखो भाविकांनी घेतले श्री भद्रा मारूतीचे दर्शन

## खुलताबाद नगरी "जय श्रीराम जय हनुमान, जय श्री भद्रा मारूती जय" गर्जनेने दुमदुमली

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथील जागृत देवस्थान म्हणुन प्रसिद्ध असलेले श्री भद्रा मारूती देवस्थान भक्तजनाचे श्रद्धास्थान असल्याने तिसऱ्या श्रावण शनिवार हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी खुलताबाद नगरीत शुक्रवारी मध्यरात्रीपासून येण्यास सुरूवात झाली होती. रात्री अकरा वाजेपासूनच श्री भद्रा मारूती दर्शनासाठी गर्दी झाली होती. सकाळपर्यंत लाखोंच्या संख्येने भाविकांनी दर्शन घेतले असल्याचे संस्थांनच्या वतीने सांगण्यात आले.
लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या दर्शनासाठी श्री भद्रा मारुती संस्थान चे अध्यक्ष मिठू बारगळ व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांनी भक्ताच्या सेवेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. येणाऱ्या भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी, दर्शनासाठी व येण्याऱ्या भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विशेष व्यवस्था केली. मंदीर परीसरात कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली. श्री भद्रा मारूती जागृत देवस्थान असल्याने पर राज्यातील भाविक दर्शनासाठी मोठ्या संख्येने श्रावणी शनिवार दर्शनासाठी येतात त्या बरोबर औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, गंगापूर, कन्नड, सोयगाव, सिल्लोड, नासिक जिल्ह्यातील कोपरगाव, सिन्नर, येवला, अहमदनगर श्रीरामपूर व जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, भडगाव, पाचोरा, इतर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने श्री भद्रा मारूतीच्या दर्शनासाठी येतात. औरंगाबाद जिल्ह्यातून गंगापूर, वैजापूर, कन्नड, फुलंब्री, सिल्लोड व औरंगाबाद शहरातील भक्तगण शुक्रवारी सायंकाळीपासुन पायी येण्याची गर्दी फार असते. श्री भद्रा मारूती संस्थान अध्यक्ष मिठु पाटिल बारगळ व जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्या नेतृत्वाखाली विविध विभाग कर्मचारी यांनी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे व त्याच्या दर्शनासाठी विशेष व्यवस्था ठेवण्यात आले. पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरात कोणत्याही प्रकारची अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून विशेष व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# शासकीय योजनांच्या लाभासाठी ई पीक पाहणी आवश्यक : पेंढारकर

आधुनिक केसरी न्यूज




**शिरपूर :** शेत शिवारातील सातबारावर अचूक माहिती नोंदण्यासाठी ई पीक पाहणी ॲपचा वापर करावा, तसेच पिक विमा, क्रॉप लोन सारख्या शासकीय योजनांसाठी पीक पाहणी आवश्यक असून शेतकऱ्यांनी वेळेवर ई पीक पाहणी नोंदवून घ्या, असे आवाहन शिरपूरचे नायब तहसीलदार ए.बी. पेंढारकर यांनी केले.

होळनांथे येथील खंडेलवाल विद्यालयात आयोजित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून पेंढारकर बोलत होते. याचबरोबर त्यांनी मतदान कार्डशी आधार कार्ड लिंक करण्यासंदर्भातही माहिती दिली. सदर कार्यक्रमात शिरपूर पंचायत समिती सदस्य जितेंद्रसिंग राजपूत, होळनांथे मंडळ अधिकारी अनिल भामरे, होळनांथे सजाचे तलाठी डी.जे. बोरसे, हिसाळे साजाचे तलाठी अमित धनगर, पोलीस पाटील मदनसिंह परदेशी, प्रा.व्ही.जी.बोरसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मंडळ अधिकारी अनिल भामरे, बभळाज सजाचे तलाठी बाळू सानप यांनीही शेतकरी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास यशवंत विकास सोसायटीचे चेअरमन प्रवीण पाटील, भावेरचे सरपंच हिम्मत धनगर, अजंदे बुद्रुक चे माजी उपसरपंच तुळशीराम मराठे, ओमेंद्रसिंग राजपूत, पिंटू सोमवंशी, पोलीस पाटील वासुदेव निकम, पोलीस पाटील बबलू चव्हाण, जयदीप राजपूत, संभाजी पाटील आदिंसह शेतकरी बांधवांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमास प्रा. जी.बी. राजपूत, प्रा. एस.आर. वाडीले, प्रा. एम.एम. शहा, प्रा. बी.एस. ब्राह्मणकर, चिनू चव्हाण, कोतवाल हिंमत रणदिवे आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. के.आर. कुमावत यांनी केले.

# पैठण तालुका सहसचिवपदी रवींद्र गायकवाड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकिन :** पैठण तालुक्यातील बिडकिन येथील रविंद्र गायकवाड यांच्या सामाजिक कामाची दखल घेत राष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्क जनजागृती फाउंडेशनच्या पैठण तालुका सहसचिवपदी वर्णी लागली आहे. मानवी हक्क जनजागृती फाउंडेशन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून संस्थेच्या सामाजिक कार्यात आवड पाहून आपली पैठण तालुका सहसचिव पदी महाराष्ट्र अध्यक्ष सिरिल आशिर्वादम, पुणे शहर युवती अध्यक्ष शिवानी संतोष कांबळे, राष्ट्रीय अध्यक्ष संतोष कांबळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष शिवनाथ दौंड यांच्या सहिनीशी नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. मानवी हक्क जनजागृती फाउंडेशनच्या पैठण तालुका सहसचिवपदी नियुक्ती करत या पदाचा कार्यभार आपण त्वरीत घेऊन संस्थेच्या सामाजिक कार्यात संस्थेच्या वाढीकरिता कामकाज करत अटी व नियमास बांधील राहून कार्यरत व्हावे अशी विनंती केली आहे. गायकवाड यांची पैठण तालुका सहसचिवपदी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.



# राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्यासाठी मानवी साखळीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव (आजादी का अमृत महोत्सव) निमित्त जिल्हा परिषद बीडद्वारा आयोजित राष्ट्रीय एकात्मतेसाठी मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी राधा बिनोद, नागनाथ शिंदे शिक्षणाधिकारी, सारुक व सर्व मान्यवर यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उदघाटन झाले. यावेळी राष्ट्रीय एकात्मता दृढ होणेसाठी मानवी साखळीमध्ये स्वा.सावरकर शैक्षणिक संकुलाचे व भारतीय शिक्षण प्रसारक संस्था पदाधिकारी उमेश जगताप, गजानराव जगताप, प्रा.चंद्रकांत मुळे, प्रमोदराव कुलकर्णी, शिवाजीराव फड, आनंद बार्शीकर, अनिल राजेंद्र, जयश्री नेलवाडकर, गोरक्ष आबुज, मुख्याध्यापक संजय विभुते, प्रदीप जोशी, प्राचार्य देवीदास नागरगोजे व पर्यवेक्षक विठ्ठल काळे, विभागप्रमुख प्रा.बाळासाहेब साळवे व संकुलातील शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी वृंद सहभागी होते. जयश्री नेलवाडकर यांच्या हस्ते स्वा.सावरकर मा. व उ.मा. विद्यालयात ध्वजारोहण संपन्न झाले. अखंड भारतदिनानिमित्त आजादी का अमृत महोत्सवानिमित्त स्वा. सावरकर विद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. बीड शहरातील स्वा. सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वतीने भुअलंकरण चौकाचौकात रांगोळी काढुन सजावट करण्यात आली. यामध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला.

# ज्येष्ठ नागरिकांची भव्य तिरंगा रॅली

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रविवार १४ ऑगस्ट २०२२ रोजी एन ५ येथील गीता भवनपासून सकाळी १० वाजता भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये पुरुष व महिला ज्येष्ठ नागरिक मोठ्या संखेने सहभागी झाले होते. ही रॅली फोस्टर कॉलेज, भोला पान चौक सर्विस रोड मार्गे कल्याण काळे यांच्या घरापासून एन ५ मेन रोड, आनंद तेल भांडार, वेंकटेश ज्वेलर्स, संत तुकाराम नाट्यगृह मार्गे गीता भवन येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅली अत्यंत शिस्तीत रस्त्याच्या डाव्या बाजूने भारतमाता की जय, वंदे मातरम, हम होंगे कामयाब इत्त्यादी घोषणा देत जात होती. ज्येष्ठांचा उत्साह ओसंडून वाहात होता. सर्वांनी पांढरा पोशाख व तिरंगा ध्वज हातात धरला होता. जितके ज्येष्ठ नागरिक तितके तिरंगाध्वज असे विलोभनीय दृश्य दिसत होते. रॅलीमध्ये अध्यक्ष भरत कुलकर्णी, उपाध्यक्ष विभा श्रीवास्तव, सचिव श्रीकांत पत्की, नगरसेवक शिवाजी दांडगे, श्रीराम जोशी, रमेश कुलकर्णी, पी.डी. कुलकर्णी, नंदकुमार पळसकर, प्रेमचंद तुल्ले, प्रमोद बेंडे, दत्तात्रय कुलकर्णी, देवेंद्र श्रीवास्तव, सुरेश जोशी, शैलजा देशपांडे, चित्रा पिलखाने, मीरा पत्की, जयश्री जोशी, शालिनी पांडे, डॉ. अरुणा खारकर, इंदू अरोरा, भारती व्यवहारे, सुवर्णलता शर्मा, रंजना मिरीकर, डॉ. सीमा दहाड इत्त्यादी सभासदांनी उत्साहाने भाग घेतला.



# चिखलीच्या सांस्कृतिक जडणघडणीचा साक्षीदार; राजा टॉवर अमृत महोत्सवी उत्सवात वंचितावस्थेत !

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** जिकडे तिकडे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत आहे. देशभरात उत्साहाचे वातावरण आहे. अशावेळी चिखली चा ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा जपलेल्या ठिकाणी राष्ट्रध्वज सन्मानाने फडकविल्या जायला हवा, अशी जनमानसातील रास्त भावना असतांना चिखली शहरातील मुख्य आणि शहराचा राजकीय पडझडीचा काळ याची डोळा पाहिलेला "राजा टॉवर" हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त वंचितावस्थेत कसा असा प्रश्न प्राप्त परिस्थिती पाहता उपस्थित झाल्या खेरीज राहत नाही.

कधीकाळी "राजा टॉवर" समोरच्या मैदानावरील उपस्थित प्रचंड गर्दीने या सभामंचावरील वकृत्व प्रचार सभा ऐकल्या आहेत. लहान मोठ्या नेत्यांच्या सभा, कार्यक्रमाची रेलचेल. याच ठिकाणी पंचक्रोशीतील माणसांनी अनुभवली आहे. हाच "राजा टॉवर" चिखलीच्या विकासातील महत्वाचा साक्षीदार आहे आणि आज जिथे देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सादर करत आहे तेव्हा याच "राजा टॉवर" ला रोषणाई तर सोडा साधी रंगरंगोटी सुद्धा करण्यात आलेली नसल्याने "नाही चिरा, नाही पणती" अशी अवस्था दिसून येत आहे.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

**गोनोरिया**

हा आजार अमेरिकेत मध्ये जास्त प्रमाणात आढळतो ज्यामुळे स्त्री व पुरुषांमध्ये वंध्यत्व येते. गोनोरिया आजाराची लक्षणे सहसा लवकर दिसत नाहीत.

**लक्षणं :** या आजारामध्ये लिंगातून किंवा योनीतून पूसारखा स्त्राव येणे, लघवीला जळजळ होणे, अंडाशय सुजणे, स्त्रियांना पाळीच्या अगोदर रक्तस्त्राव होणे, वंध्यत्व येणे, रक्त व सांधे यांना प्रादुर्भाव होणे अशी लक्षणे आढळून येतात.

**निदान आणि उपचार :** या आजारामध्येही रक्ताची तपासणी आणि स्त्रियाची तपासणी केल्यानंतरच निदान करण्यात येते. उपचारांमध्ये ॲन्टिबायोटिक्सचा सिंगल डोस द्यावा. यामध्ये दोघांनीही उपचार घ्यावा. पूर्ण बरे होईपर्यंत सेक्स करू नये, कारण त्यामुळे मूत्रनलिका, योनी, तोंड, घसा, ॲनस व डोळे यामध्येही संसर्ग होतो. प्रतिबंध यामध्ये तात्पुरते सेक्स बंद करणे, लॅटेक्स कंडोम वापरणे आणि डेटल डॅम वापरणे हे प्रतिबंधात्मक उपाय सांगता येतील.

**एच.पी.व्ही. (जेनायटल वॉर्टस)**

अतिशय प्रामुख्याने आढळणारे व्हायरल इन्फेक्शन जे ५० टक्के रुग्णांमध्ये आढळते. या आजारामध्ये कॅन्सर होण्याचा धोका सुद्धा असतो. १०० प्रकारचे एच.पी.व्ही. असतात. बऱ्याचदा हा आजार आपोआप सुद्धा बरा होतो.

**लक्षणे :**

लिंगावर, योनीवर लहान लहान कॉलर फॅशनमध्ये वाढ होते. याला व्हिनेगर लावले तर त्यातील ॲसिडिटीमुळे ते पांढरे पडतात व ठळकपणे दिसतात. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# जलपरी मोटर चोरटे एल.सी.बी. शाखेकडून जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील कुसुंबा येथील शेतकरी प्रमोद शिंदे यांनी त्यांच्या शेतातील जलपरी मोटर अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याबाबत फिर्याद दिल्याने धुळे तालुका पोस्टे गुरज कलम 379 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानीक गुन्हे शाखेकडुन सुरु असताना पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना सदर गुन्हा हा अविनाश सुरेश चव्हाण, य. शितल कॉलजी, महिंदळे याने त्याच्या साथीदारा समिळुन केला असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने अविनाश सुरेश चव्हाण व त्याच्या अल्पवयीन साथीदाराला महिंदळे गावातुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस करता त्यांनी गुन्ह्याची कबुली देवुन जलपरी मोटर काढून दिली आहे. 5000 रुपये किंमतीची हिरव्या रंगाची पाण्याची जलपरी मोटर दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आली असुन आरोपी अविनाश सुरेश चव्हाण व एका विधीसंघर्षग्रस्त बालकास पुढील कारवाई कामी धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास धुळे तालुका पोलीस स्टेशन करीत आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक प्रविणकुमार पाटील यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्वाश धुळे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउनी योगेश राऊत, श्रीकांत पाटील, प्राभाकर बैसाणे, राक पठाण, पोना योगेश चव्हाण, पोशि कमलेश सुर्यवंशी, राहुल गिरी, सागर शिर्के अशांनी केली आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in